
# मेहता मराठी ग्रंथजगत

डिसेंबर, २०१८ • पृष्ठे १३२ • किंमत :₹ १५
वर्ष अठरावे । अंक बारावा


## नाताळ व नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!



### आवर्जून वाचावे














# आवर्जून वाचावे



चहा साखरेचा
नाताळ
जेन जॉली • रॉबर्ट इंगपेन



नववर्षाची
अनपेक्षित भेट!



रेडिओ रेस्क्यू !
जेन जॉली • रॉबर्ट इंगपेन


रात्रीचे
राक्षस


अकबर बिरबल
बुद्धिमान
बिरबल
निर्मला सारडा


अकबर बिरबल
चतुर
बिरबल
निर्मला सारडा


अकबर बिरबल
लाजवाब
बिरबल


अकबर बिरबल
विनोदवीर
बिरबल
निर्मला सारडा


आईची
तळमळ
इतर कथा

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ डिसेंबर २०१८ ◆ वर्ष अठरावे ◆ अंक बारावा

**संपादक :**
सुनील मेहता
**कार्यकारी संपादक :**
शंकर सारडा
**संपादन साहाय्य :**
अंजली पटवर्धन
**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.
**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस
**मांडणी-अक्षरजुळणी**
*मेहता पब्लिशिंग हाऊस*


*— अनुक्रमणिका —*


| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **साहित्यवार्ता** | १० |
| **श्रद्धांजली** | १३ |
| **दिनविशेष** | १४ |
| **मागोवा** | २० |
| **विशेष लेख** | ३० |
| **पुस्तक परिचय** | |
| नाथ हा माझा | ३८ |
| अँजेलाज ॲशेस | ४६ |
| नागासाकी | ५६ |
| कवडसे | ६६ |
| जॉर्जेस सिक्रेट की टू द... | ७८ |
| लाइफ विदाउट लिमिट्स | ८४ |
| चेस युअर ड्रीम्स | ९२ |
| सीक्रेट्स ऑफ द लाइट | १०४ |
| फिश! | ११४ |
| **अभिप्राय** | १२२ |



**संपादक-मुद्रक-प्रकाशक :** सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे-४११ ०३० फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक सुनील अनिल मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून मेहता होम, १व२ मजला, १९४१, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - सुनील अनिल मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Sunil Anil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at Mehta Home, 1 & 2 Floor, 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Sunil Anil Mehta.

# संपादकीय



## ...आकांक्षांपुढति जिथे गगन ठेंगणे

सर्वसामान्य माणूस चाकोरीबद्ध जीवन जगत असतो. चाकोरीबद्ध जीवनात संकटं, आव्हानं समोर उभी ठाकत नाहीत, असं नाही. आपल्यापरीने त्या संकटांना, आव्हानांना तोंड देण्याचा प्रयत्न तो करत असतो; पण काही माणसं अशी असतात, की आकांक्षांचे पंख लावून, जीवनाच्या पलीकडे जाऊन असामान्यत्वाचा प्रत्यय देतात. या वेळी 'पुस्तक परिचय'साठी आम्ही ज्या पुस्तकांची निवड केली आहे, त्या पुस्तकांतील काही व्यक्तिरेखा असाच प्रत्यय देणाऱ्या आहेत.

'नाथ हा माझा' हे मनस्वी कलावंत काशिनाथ घाणेकरांचं चरित्र. याच चरित्रावर आधारित 'आणि डॉ. काशिनाथ घाणेकर' हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर तुफान चालला आहे. डॉक्टर असूनही अभिनयाच्या वेडाने झपाटलेला हा माणूस मराठी रंगभूमीवर आला आणि मराठी रंगभूमीची व्यावसायिक गणितं त्यानी बदलून टाकली. त्यांच्या या कलंदरपणाच्या प्रेमात कांचनताई पडल्या आणि त्या प्रेमातील सगळी अवघड वळणं पार करून काशिनाथ घाणेकरांशी विवाहबद्ध झाल्या. तेव्हा 'नाथ हा माझा' ही काशिनाथ घाणेकरांच्या अभिनयवेडाची आणि कांचनताईंच्या प्रेमवेडेपणाची कथा आहे.

दुसरं महायुद्ध सुरू असताना अमेरिकेने जपानच्या हिरोशिमा आणि नागासाकी या शहरांवर बॉम्बहल्ला केला आणि ही शहरं बेचिराख झाली. त्याचे दूरगामी परिणाम तेथील जनतेला भोगावे लागले; पण त्यातूनही फिनिक्स पक्ष्याप्रमाणे भरारी घेऊन जपानने सर्वांगीण प्रगती केली. म्हणून आजही ही दोन्ही शहरं त्यांच्या नकाशावर आहेत. या दोन्ही शहरांतील नागरिकांचं दुसऱ्या महायुद्धाच्या वेळचं जीवन, तरीही त्याला नेटाने तोंड देणारी माणसं, हिरोशिमा आणि नागासाकीवर बॉम्ब पडल्यानंतर झालेला प्रचंड संहार आणि त्यातूनही साधलेली प्रगती याचं वास्तव चित्रण 'नागासाकी'

या पुस्तकात केलं आहे. अर्थातच सर्वसामान्य जनता आणि तेथील राज्यकर्त्यांच्या आकांक्षांचा हा विजय आहे, असं म्हटलं तर ते वावगं ठरू नये.

'अँजेलाज ॲशेस' ही फ्रॅन्क मॅक्कोर्टची कहाणी. विजिगीषू वृत्तीमुळे तो जगण्याची अतिशय अवघड लढाई जिंकतो. पाठचे बहीण-भाऊ अकाली मृत्युमुखी पडतात; पण हा वाचतो. तो लहान भावांना लंगोट म्हणून चिंध्या बांधतो, ख्रिसमस साजरा करण्यासाठी मेजवानी म्हणून डुकराचं डोकं मिळवण्यासाठी धडपडतो, रस्त्यावर पडलेले कोळशाचे तुकडे गोळा करून चूल पेटवतो. गरिबी, उपासमार, शेजाऱ्यांनी आणि नातेवाइकांनी पाठ फिरवलेली..इतकी अवहेलना कुणाच्या वाट्याला येऊ नये! पण हे अनुभव पचवून त्याचं समंजसपणे जीवनाला सामोरं जाणं मनाला भावतं आणि प्रेरणा देऊन जातं.

'कवडसे' हा आहे लेखसंग्रह. शिवाजी सावंतांनी त्यांच्या जीवनात आलेल्या काही प्रसिद्ध/अप्रसिद्ध व्यक्तींवर, काही महत्त्वपूर्ण प्रसंगांच्या निमित्ताने लिहिलेल्या लेखांचा हा संग्रह आहे. या लेखसंग्रहातील 'ना. वा.' हा लेख सावंतांनी त्यांचे परम मित्र ना. वा. देशपांडे यांच्यावर लिहिला आहे. या लेखात गदिमांच्या संदर्भातील एक प्रसंग आहे. गदिमांसारखा कवी स्वत:पलीकडे जाऊन सर्वसामान्य माणसाचं दु:खही किती संवेद्यतेने जाणत होता, याचं मनोज्ञ दर्शन या लेखातून घडतं.

'सीक्रेट्स ऑफ द लाइट' हे खऱ्या अर्थाने जीवनापारची म्हणजे मृत्यूनंतरची अनुभूती कशी असते आणि ती अनुभूती घेतल्यावर डॅनियन यांचं जीवन कसं आमूलाग्र बदलून गेलं, याचं चित्रण आहे. या विशिष्ट अनुभवामुळे त्यांच्यातील नकारात्मकता संपली आणि समाजाचं ऋण फेडायला ते सिद्ध झाले.

'चेस युअर ड्रीम' म्हणचे सचिन तेंडुलकरच्या आकांक्षांच्या परिपूर्तीचं प्रतिबिंब. ते प्रतिबिंब युवा मित्रांना दाखवून, त्यांनी आपल्या ध्येयाकडे कशी वाटचाल करावी, याचं मार्गदर्शन सचिनने केलं आहे.

'लाइफ विदाउट लिमिट्स'च्या शीर्षकातच जीवनाची विशिष्ट चौकट नाकारलेली दिसते. ती चौकट नाकारली आहे एका जन्मत:च हात-पाय नसलेल्या व्यक्तीने. अर्थात त्यासाठी त्याला आपल्या मनाशी झगडा करावा लागला आहे; पण 'आकाश के उस पार भी आकाश है' या विश्वासाने त्याची वाटचाल सुरू आहे. एक अपंग व्यक्ती काय काय करू शकते याचा आश्चर्यकारक प्रत्यय हे पुस्तक देतं.

'फिश' हे पुस्तकही असंच जीवनाच्या पलीकडे बघायला शिकवतं. जीवनाच्या

पलीकडे बघायचं म्हणजे काय करायचं? तर स्वत:मधील दुर्दम्य आशावाद जागवायचा. आपल्या मनावर आरूढव्हायचं. 'फिश' पुस्तकातील मेरी जेन एका प्रथितयश कंपनीत उच्च पदावर आहे. तिच्याच ऑफिसमधील एका अकार्यक्षम विभागाला कार्यक्षम करण्याचं आव्हान तिच्यासमोर उभं  राहतं आणि ती गोंधळात पडते. त्याच मन:स्थितीत फिश मार्केटमध्ये गेली असता तिथल्या उत्साही वातावरणातून तिला एक फॉर्म्युला गवसतो आणि त्याच्या जोरावर ती आपल्या विभागात चैतन्य निर्माण करते.

'जॉर्जेस सीक्रेट की टू द युनिव्हर्स' हे पुस्तक वाचकांना अंतराळात घेऊन जातं. पृथ्वीव्यतिरिक्त अन्य ग्रहावर कुठे मानवाला राहता येईल का, या संशोधनाचा ध्यास लागलेले शास्त्रज्ञ एरिक आणि त्यांच्या शेजारी राहणारा त्यांचा छोटा मित्र जॉर्ज यांच्या विस्मयकारक धाडसाची ही कथा आकाशाला खरंच ठेंगणं करणारी आहे.

तर अशी पुस्तकं तुमच्यात आशावाद जागवू शकतात; पण दुर्दैवाने आज अशी परिस्थिती आहे, की चाकोरीबद्ध जीवन जगण्याची जणू स्पर्धा लागली आहे आणि त्या स्पर्धेमुळे मूल्यं पायाखाली तुडवली जात आहेत. कोणी एखादा चाकोरीबाहेर जाऊ पाहतो; पण या स्पर्धेच्या रेट्यात त्याचं मनोबल खच्ची होतं. अशा मनाला उभारी देण्यासाठी सुरेश भट लिहितात :

गंजल्या ओठांस माझ्या धार वज्राची मिळू दे
आंधळ्या आत्म्यात माझ्या सूर्य सत्याचा जळू दे
पांगळा बंदिस्त माझा जन्म आकाशून जावो
वादळी आवेग माझा चार भिंतींना कळू दे

तेव्हा हे वर्षं सरत असताना आणि नवीन वर्षाच्या उंबरठ्यावर आपण उभे असताना मूल्यांसाठी झगडण्याची इच्छा तुमच्या-आमच्या मनात जागो, ही सदिच्छा!



# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

आमच्या छापील अंकाच्या त्रैवार्षिक आणि पंचवार्षिक वर्गणीत आम्ही १५ ऑगस्ट २०१८ पासून बदल केला आहे,

याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

आमच्या छापील अंकाच्या वर्गणीतील बदल खालीलप्रमाणे

त्रैवार्षिक वर्गणी ४५० रुपये

पंचवार्षिक वर्गणी ६०० रुपये

डिजिटल अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये

पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये

# वाचकांसाठी सुवर्णसंधी!

WORDPOWER

Books | Toys | Stationery | Music | Movies | Games

## बेळगाव / कोल्हापूर

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक,
मूव्ही, गेम्स इत्यादी बरेच काही
आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे.
सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

**बेळगाव, कोल्हापूर येथील वर्डपॉवरचे पत्ते पुढीलप्रमाणे**

कामत टॉवर, पहिला मजला, आरपीडी कॉलेजसमोर,
टिळकवाडी, बेळगाव -५९०००६.
मोबाईल - ७८८८२७७१९०

स्टार बझार, जुना पुणे-बेंगलोर हायवे, कोल्हापूर – ४१६००१.
मोबाईल - ९५१८९१२२६९

**अधिक माहितीसाठी संपर्क**

**wordpowerbookshop@gmail.com**

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

**सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, यूपीएससी, एमपीएससी, सेट-नेट, इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर**

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ **(शनिवारी बंद)**
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१
Email : mehtabooksellers@gmail.com

amazon

GET IT ON Google Play

यांच्या संयुक्त विद्यमाने

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि अॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

**इथे मिळतील ई-बुक्स...**

**eBooks**



**www.amazon.in**

**play.google.com**

**Online पुस्तके खरेदी करा** **www.mehtapublishinghouse.com**

# साहित्य वार्ता



## साहित्य संमेलनाध्यक्षपदी डॉ. अरुणा ढेरे



यवतमाळ - अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या ९२व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ कवयित्री, संशोधक डॉ. अरुणा ढेरे यांची एकमताने निवड करण्यात आली. पुढील वर्षी जानेवारीत यवतमाळमध्ये संमेलन होणार आहे.

जानेवारी महिन्यात ११, १२ व १३ तारखेला येथील पोस्टल मैदानात अखिल भारतीय साहित्य संमेलन पार पडणार असल्याची माहिती डॉ. श्रीपाद जोशी यांनी दिली. १९७३नंतर म्हणजे तब्बल ४५ वर्षांनी यवतमाळला साहित्य संमेलन होणार आहे. त्यासाठी डॉ. वि. भि. कोलते संशोधन केंद्र व वाचनालय आणि विदर्भ साहित्य संघ, यवतमाळ शाखेने पुढाकार घेतला. राज्यभरातून आलेल्या संलग्न व घटक संस्थांच्या १६ प्रतिनिधींनी संमेलनाध्यक्षांच्या नावावर तब्बल चार तास खल केला. यावेळी प्रभा गणोरकर, प्रेमानंद गज्वी, ना. धों. महानोर यांच्या नावावरही चर्चा झाली. घटनादुरुस्तीनंतर निवडणुकीऐवजी प्रथमच एकमताने अध्यक्ष होण्याचा मान डॉ. ढेरे यांना मिळाला. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या इतिहासात आतापर्यंत चार महिलांना संमेलनाध्यक्ष होण्याचा मान मिळाला होता. त्यात कुसुमावती देशपांडे, दुर्गा भागवत, शान्ता शेळके, विजया राजाध्यक्ष यांचा समावेश आहे. डॉ. ढेरे या पाचव्या महिला संमेलनाध्यक्ष असतील.

◆

TBC 27 - ६वे पुस्तक

# ब्लॅक लिस्ट




**ब्रॅड थॉर**

अनुवाद

**बाळ भागवत**

**किंमत : ४५०/-रु.**

**पोस्टेज : ५०/-रु.**

**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

कुठेतरी : अमेरिकन सरकार अत्यंत गुप्तपणे एक यादी बनवत असते. एकदा का यादीवर तुमचे नाव आले की ते काढले जात नाही... तुम्ही ठार होईपर्यंत तरी.

कोणीतरी : दहशतवाद्यांविरुद्ध लढणाऱ्या एजन्ट स्कॉट हॉर्वाथ याचेच नाव त्या यादीत घातले आहे.

कसेतरी : हॉर्वाथने खुन्यांपासून स्वतःचे रक्षण केले पाहिजे. निदान त्यालाच कोणी लक्ष्य बनवले आहे आणि का,

हे कळेपर्यंत तरी.

कुठेतरी, कोणीतरी, कसेतरी : या कोड्याचे तुकडे जुळवू शकत असले, तरी अमेरिकेवर आजपर्यंत न अनुभवलेला असा भीषण प्रकारचा दहशतवादी हल्ला होण्याच्या आत हॉर्वाथला त्या हल्ल्यांच्या सूत्रधाराला गाठणे भाग आहे.

ज्या कुणाला वाटत असेल की भीतीसारखी भीतिदायक गोष्ट नाही, त्यांनी ब्रॅड थॉरला अवश्य भेटायला हवे.

TBC 28 - १ले पुस्तक


# फुल ब्लॅक

**ब्रॅड थॉर**

अनुवाद

**बाळ भागवत**

**किंमत : ४५०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




'न्यू यॉर्क टाइम्स'च्या तडाखेबंद विक्री होणाऱ्या साहसकथांच्या यादीत कायम स्थान मिळविणाऱ्या ब्रॅड थॉर यांची हेरगिरी, विश्वासघात आणि कटकारस्थाने यांच्या काळ्याकुट्ट जगामधील अत्यंत घाबरवून सोडणारी कथा.

श्वास घ्यायलाही फुरसत न देणाऱ्या, उत्कृष्ट तऱ्हेने गुंफलेल्या वेगवान घटना शेवटच्या पानापर्यंत खिळवून ठेवतात. काही कामगिऱ्या इतक्या प्राणघातक ठरू शकतात की, त्यांची कल्पना देशाच्या प्रमुखांनाही दिली जात नाही. काळोखातच आखलेल्या या कामगिऱ्या जशा काही अस्तित्वातच नसतात; पण अशा एका कामगिरीचा जेव्हा बोजवारा उडतो, तेव्हा पूर्वी नेव्ही सील टीम सहाचा सदस्य असणारा आणि अत्यंत गुप्तपणे दहशतवाद्यांचा माग काढणारा स्कॉट हॉर्वाथ आजपर्यंत अमेरिकेला तोंड द्यावे न लागलेल्या, अमेरिकेचा संपूर्ण विनाश घडविण्यासाठी रचलेल्या कटाच्या दहशतवादी सूत्रधारांच्या मागे लागतो.

पण या सूत्रधारांची ओळख हळूहळू पटायला लागल्यावर कुणावर विश्वास ठेवायचा, हे कळेनासे होते.

अमेरिकेला वाचविण्याचा एकच पर्याय त्याच्याकडे शिल्लक राहतो. तो स्वत:च पार नाहीसा होतो.

श्रद्धांजली

## मृणालिनी गडकरी



पुणे - अभिजात बंगाली साहित्याचे दालन मराठी वाचकांसाठी खुले करणाऱ्या ज्येष्ठ अनुवादक डॉ. मृणालिनी गडकरी (वय ६९) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात पती आहेत.

मृणालिनी गडकरी यांचा जन्म १२ जानेवारी १९४९ रोजी झाला. त्यांनी जर्मन भाषेमध्ये पदवी आणि मराठी भाषेत पदव्युत्तर पदवी प्राप्त केली होती. एम.फिल. ही पदवी त्यांनी 'आउटस्टँडिंग' श्रेणीसह प्राप्त केली होती. 'रवींद्रनाथ टागोरांची कविता आणि समकालीन मराठी कविता' या विषयात त्यांनी पीएच.डी.मिळवली.

बंगालीतील सोळा साहित्यकृती त्यांनी मराठीत अनुवादित केल्या. पुणे विद्यापीठाचा मराठी विभाग आणि 'वर्ल्ड बायबल ट्रान्स्लेशन सेंटर' यांच्या सहकार्याने इंग्रजी बायबलचा आधुनिक मराठीत अनुवाद करण्याच्या प्रकल्पात त्यांचा सहभाग होता. विविध नियतकालिकांमधून त्यांचे लेखन व त्यांनी अनुवादित केलेले साहित्य प्रकाशित झाले आहे.

शरच्चंद्र यांच्या 'देवदास' या गाजलेल्या साहित्यकृतीच्या अनुवादासाठी त्यांना साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त झाला होता. 'काबुलीवाल्याची बंगाली बायको' या पुस्तकाला जी. ए. कुलकर्णी उत्कृष्ट अनुवाद पुरस्कार, तर मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे 'नष्ट मेयेर नष्ट गद्य' या पुस्तकाला रणजित देसाई अनुवाद पुरस्कार, 'निर्बाचित कलाम' या पुस्तकाला मातृपितृ पुरस्कार लाभला होता. कोलकाता येथील शरद समितीतर्फे शरद पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले होते. मेहता पब्लिशिंग हाऊस आणि मेहता बुक सेलर्सतर्फे त्यांना विनम्र आदरांजली.

◆

## १६ डिसेंबर २०१८ ते १५ जानेवारी २०१९
## दरम्यानचा दिनविशेष

## दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर ५०टक्क्यांपर्यंत सूट

१६ डिसेंबर - जॅन येगर यांचा जन्मदिन

'वर्क लेस, डू मोअर' या अनुवादित मार्गदर्शनपर पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत - २९५/- । सवलत किंमत २०९/-**

१६ डिसेंबर ते १७ डिसेंबरपर्यंत.

१६ डिसेंबर - विवेक शानभाग यांचा जन्मदिन

'घाचर घोचर' या अनुवादित कादंबरीवर विशेष सवलत.

**मूळ किंमत - १५०/- । सवलत किंमत १०९/-**

१६ डिसेंबर ते १७ डिसेंबरपर्यंत.

१७ डिसेंबर - विश्वनाथ केळकर यांचा जन्मदिन

'द टेस्टामेंट', 'द चेम्बर' या अनुवादित पुस्तकांवर विशेष सवलत.

**मूळ किंमत - ९९०/- । सवलत किंमत ५९९/-**

१७ डिसेंबर ते १९ डिसेंबरपर्यंत.

१८ डिसेंबर - जागतिक स्थलांतर दिन

'ब्लू बर्ड' या अनुवादित आत्मकथनावर विशेष सवलत.

**मूळ किंमत - २२०/- । सवलत किंमत १३९/-**

१८ डिसेंबर ते १९ डिसेंबरपर्यंत.

२१ डिसेंबर - सुधाकर लवाटे यांचा जन्मदिन

'फॉल्स इम्प्रेशन, द सिम्पल ट्रुथ' या अनुवादित पुस्तकांवर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ८४०/- । सवलत किंमत ४९९/-**

२१ डिसेंबर ते २२ डिसेंबरपर्यंत.

२१ डिसेंबर - यू. आर. अनंतमूर्ती यांचा जन्मदिन

'संस्कार, अवस्था' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - २९०/- । सवलत किंमत १९९/-**

२१ डिसेंबर ते २३ डिसेंबरपर्यंत.

२३ डिसेंबर - किसान दिन

शेतीविषयक ११ पुस्तकांवर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - १८८०/- । सवलत किंमत १२२९/-**

२३ डिसेंबर ते २५ डिसेंबरपर्यंत.

२४ डिसेंबर - डॉ. सुरेशचंद्र नाडकर्णी यांचा जन्मदिन

डॉ. सुरेशचंद्र नाडकर्णी लिखित चार पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ७२०/- । सवलत किंमत ४७९/-**

२४ डिसेंबर ते २५ डिसेंबरपर्यंत.

२४ डिसेंबर - भारतीय ग्राहक दिन

'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या सर्व पुस्तकांवर (प्रत्येकी १ प्रत) ४०% सवलत.

**ही सवलत नेट ३०००/- व अधिकच्या खरेदीवर लागू.**

'स्वामी', ' श्रीमानयोगी', 'संभाजी' ह्या कादंबऱ्या समाविष्ट नाही.

२४ डिसेंबर

२५ डिसेंबर - प्रज्ञा ओक यांचा जन्मदिन

प्रज्ञा ओक यांनी अनुवादित केलेल्या ७ पुस्तक संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत १३५५/-। सवलत किंमत ७५९/-**

२५ डिसेंबर ते २६ डिसेंबरपर्यंत.

२५ डिसेंबर - ख्रिसमस

'मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे' प्रकाशित सर्व बालवाङ्मयावर ४०% सवलत.

२५डिसेंबर

२८ डिसेंबर - जॉन ग्रे यांचा जन्मदिन

''स' सुखाचा, तो आणि ती, तुला आठवताना' पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत – ८८५/- । सवलत किंमत ५९९/-**

२८ डिसेंबर ते २९ डिसेंबरपर्यंत.

३० डिसेंबर - सुरेश गुप्ते  यांचा जन्मदिन

‘व्हेण्डेट्टा’या अनुवादित कादंबरीवर विशेष सवलत.

**मूळ किंमत - २४०/- । सवलत किंमत १६९/-**

३० डिसेंबर ते ३१ डिसेंबरपर्यंत.

३० डिसेंबर - नीता गद्रे  यांचा जन्मदिन

नीता गद्रे लिखित ‘जस्ट मॅरिड, प्लीज एक्सक्यूज’या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत - २५०/- । सवलत किंमत १४९/-**

३० डिसेंबर ते ३१ डिसेंबरपर्यंत.

३० डिसेंबर - जयसिंगराव पवार यांचा जन्मदिन

जयसिंगराव पवार लिखित ११ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - १६८०/-। सवलत किंमत १३०९/-**

३० डिसेंबर ते १ जानेवारीपर्यंत.

३१ डिसेंबर - मेगन चान्स यांचा जन्मदिन

‘द स्पिरिच्युॲलिस्ट’ या मेगन चान्स यांच्या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत - ३२०/-। सवलत किंमत १७९/-**

३१ डिसेंबर ते १ जानेवारीपर्यंत.

१ जानेवारी - जागतिक कुटुंब दिन

संच १ : चिकन सूप मालिकेतील १५ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत — २७८५/-। सवलत किंमत १८३९/-**

संच २ : ‘वंशवृक्ष, पितृऋण, अस्तित्व, फॅमिली, मेरा परिवार, माय फॅमिली इज ‘ऑल आय हॅव, अक्षयपात्र’ या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत — १३००/-। सवलत किंमत ९१९/-**

१ जानेवारी ते ५ जानेवारीपर्यंत.

३ जानेवारी - जसवंत सिंग यांचा जन्मदिन

‘ए कॉल टू ऑनर’, ‘जिना-हिंदुस्थान-फाळणी-स्वातंत्र्य’ या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत — ९००/-। सवलत किंमत ४४९/-**

३ जानेवारी ते ५ जानेवारीपर्यंत.

३ जानेवारी - सावित्रीबाई फुले यांची जयंती

'महात्मा (जोतिराव फुले), मी मलाला, स्टोन्स इन्टू स्कूल्स, थ्री कप्स ऑफ टी' या पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत – १४४५/-। सवलत किंमत ८४९/-**

३ जानेवारी ते ५ जानेवारीपर्यंत.

३ जानेवारी - सुषमा लेले यांचा जन्मदिन

'समीपा' या अनुवादित पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत – २२०/-। सवलत किंमत १३९/-**

३ जानेवारी ते ४ जानेवारीपर्यंत.

४ जानेवारी - कृष्णाजी कुलकर्णी यांचा जन्मदिन

'मराठी भाषा उद्‌गम व विकास' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत –३९५/-। सवलत किंमत १९९/-**

४ जानेवारी ते ५ जानेवारीपर्यंत.

६ जानेवारी - श्यामल पेंडसे यांचा जन्मदिन

श्यामल पेंडसे यांच्या अनुवादित पुस्तकसंचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ५९०/- । सवलत किंमत ३८९/-**

६ जानेवारी ते ७ जानेवारीपर्यंत.

८ जानेवारी - प्रदीप सिंदेकर यांचा जन्मदिन

'अंतरंग कोका-कोलाचे' या पुस्तकावर विशेष सवलत.

**मूळ किंमत – २५०/-। सवलत किंमत १२९/-**

८ जानेवारी ते ९ जानेवारीपर्यंत.

९ जानेवारी - शोभा चित्रे यांचा जन्मदिन

शोभा चित्रे यांच्या पुस्तकांवर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत – ४३०/-। सवलत किंमत २५९/-**

९ जानेवारी ते १० जानेवारीपर्यंत.

९ जानेवारी - भारतीय प्रवासी दिन

'फॉर हिअर ऑर टू गो', 'अमेरिकेतील पापनगरी', 'स्वान्सीतील दिवस'

या पुस्तकांवर विशेष सवलत.

**मूळ किंमत - ९४०/- । सवलत किंमत ६३९/-**

९ जानेवारी ते १० जानेवारीपर्यंत.

१० जानेवारी - निरंजन घाटे यांचा जन्मदिन

'निरंजन घाटे लिखित' १६ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ३०१०/- । सवलत किंमत १८२९/-**

१० जानेवारी ते १२ जानेवारीपर्यंत.

१० जानेवारी - जागतिक हास्य दिन

संच १ : 'कसं बोललात! (१ ते ७ भाग), कथा अकलेच्या कांद्याची, खुळ्याची चावडी, ताजमहालमध्ये सरपंच, फक्कड गोष्टी, धिंड, वावरी शेंग, जुगलबंदी, खुशखरेदी, भेटीगाठी, श्रीगणेशा, पाटलाची चंची, गारवेल, लवंगी मिरची कोल्हापूरची, बंधारा, हसाल तर वाचाल' या पुस्तकांवर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - २३६५/- । सवलत किंमत १४७९/-**

संच २ : 'घरजावई, चकाट्या, माझ्या बापाची पेंड, हसणावळ, भोकरवाडीतील रसवंतीगृह, नावेतील तीन प्रवासी, जावईबापूंच्या गोष्टी, सरमिसळ, हुबेहूब, गुदगुल्या,फुकट, चुटक्याच्या गोष्टी, खडे ओरखडे, गप्पांगण, भुताचा जन्म, विरंगुळा, माकडमेवा, बेंडबाजा, गोष्टीच गोष्टी, गंमत गोष्टी, अंगत पंगत, मी लाडाची मैना, गाणारा मुलूख, गप्पागोष्टी, सट्टी आणि इतर एकांकिका'

या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - ३२६०/- । सवलत किंमत २०४९/-**

१० जानेवारी ते १२ जानेवारीपर्यंत.

११ जानेवारी - वि. स. खांडेकर जयंती

'वि. स. खांडेकर' लिखित पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - १४३८५/- । सवलत किंमत ८४८७/-**

११ जानेवारी ते १२ जानेवारीपर्यंत.

१२ जानेवारी - मृणालिनी गडकरी यांचा जन्मदिन

'मृणालिनी गडकरी' अनुवादित १३ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत – २१००/-। सवलत किंमत १२८९/-**

१२ जानेवारी ते १३जानेवारीपर्यंत.

१२ जानेवारी - स्वामी विवेकानंद जयंती व जागतिक युवा दिन

'आधुनिक भारताचे प्रेषित : स्वामी विवेकानंद, क्रांतियोगिनी भगिनी निवेदिता,

चिकन सूप फॉर द टीनएज सोल, भाग -१, भाग - २, मैत्री अशी अन्तशी', 'स्वामी विवेकानंद' या पुस्तकांवर विशेष सवलत.

**संचाची मूळ किंमत - १६००/- । सवलत किंमत ९५९/-**

१२ जानेवारी ते १४ जानेवारीपर्यंत.

१४ जानेवारी - अपर्णा परचुरे यांचा जन्मदिन

अपर्णा परचुरे लिखित 'केक्स' या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत - १५०/- । सवलत किंमत ७५/-

१४ जानेवारी ते १५ जानेवारीपर्यंत.

१५ जानेवारी - विनया धारवाडकर यांचा जन्मदिन

विनया धारवाडकर अनुवादित 'आठवणींचे मोती'

या पुस्तकावर विशेष सवलत.

मूळ किंमत - २४०/- । सवलत किंमत १२०/-

१४ जानेवारी ते १५ जानेवारीपर्यंत.

**❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖**

**अधिक माहितीसाठी संपर्क :** फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / **Whats App No. ९४२०५९४६६५**

**website : www.mehtapublishinghouse.com**

**आपल्या लाडक्या लेखकांना वा अनुवादकांना शुभेच्छा या ईमेलवर पाठवा.**

**authors@mehtapublishinghouse.com**

# मागोवा




*या वर्षी (२०१८मध्ये) आमची ११२ पुस्तके प्रकाशित झाली. आम्हाला काही पुरस्कार मिळाले. आम्ही अन्य काही कार्यक्रम केले. प्रकाशन सोहळ्यांवर, पुरस्कारांवर आणि कार्यक्रमांवर टाकलेला हा एक दृष्टिक्षेप...*

**पुस्तक प्रकाशन**

**माजी केंद्रीय गृहसचिव, अरुणाचल प्रदेशचे माजी राज्यपाल राम प्रधान** यांच्या **'माझी वाटचाल : मेटकॉफ हाउस ते राजभवन'** या पुस्तकाचं प्रकाशन नागपूर येथे केंद्रीय रस्ते व महामार्ग आणि जलसंपदामंत्री **नितीन गडकरी**, माजी केंद्रीय गृहमंत्री **सुशीलकुमार शिंदे** यांच्या हस्ते करण्यात आलं. याच पुस्तकाचा आणखी एक प्रकाशन समारंभ नंतर पुण्यातही करण्यात आला. या समारंभात 'लोकसत्ता'चे संपादक **गिरीश कुबेर** यांच्या हस्ते **'माझी वाटचाल...'**चं प्रकाशन करण्यात आलं.

तर **हॅरिएट लर्नर** लिखित व **डॉ. जयश्री गोडसे** अनुवादित '**द मदर डान्स**' या पुस्तकाचं प्रकाशन औरंगाबाद येथे सुप्रसिद्ध लेखिका **डॉ. छाया महाजन** यांच्या हस्ते करण्यात आलं.

स्वाती चांदोरकर लिखित '**हिज डे**' या कादंबरीचं प्रकाशन तृतीय पंथीयांच्या हस्ते मुंबई येथे करण्यात आलं. या कार्यक्रमाला ज्येष्ठ कवी **प्रवीण दवणे,** ज्येष्ठ अभिनेते **प्रदीप वेलणकर**, ज्येष्ठ अभिनेते **प्रमोद पवार** यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

**सुधा मूर्ती** लिखित आणि **लीना सोहोनी** अनुवादित **'तीन हजार टाके'** आणि **'सर्पाचा सूड'** या पुस्तकांचं प्रकाशन पुण्यात ज्येष्ठ समीक्षक, लेखिका

**वीणा देव** आणि मेहता पब्लिशिंग हाऊसचे संस्थापक **अनिल मेहता** यांच्या उपस्थितीत करण्यात आलं. **‘तीन हजार टाके’** आणि **‘सर्पाचा सूड’** या पुस्तकांचं ‘**गरुडजन्माची कथा**’ या पुस्तकासह कोल्हापूरमध्ये परत प्रकाशन करण्यात आलं. हे प्रकाशन ज्येष्ठ समीक्षक आणि लेखक **डॉ. सुनीलकुमार लवटे** आणि **अनिल मेहता** यांच्या उपस्थितीत करण्यात आलं.

**‘तिनका तिनका तिहार’** या हिंदी काव्यसंग्रहाच्या मराठी अनुवादाचं प्रकाशन येरवडा मध्यवर्ती कारागृहात करण्यात आलं. पत्रकार, सामाजिक कार्यकर्त्या आणि लेखिका **वर्तिका नंदा,** कारागृहाचे महानिरीक्षक **डॉ. भूषणकूमार उपाध्याय,** उपमहानिरीक्षक **स्वाती साठे,** येरवडा कारागृहाचे अधीक्षक **यू. टी. पवार,** पुस्तकाच्या अनुवादक **मंजिरी धामणकर,** मेहता पब्लिशिंग हाऊसचे **अखिल मेहता, रूपा मेहता** यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.

**‘मी, संपत पाल, गुलाबी साडीवाली रणरागिणी’** या **ॲनी बरथॉड** शब्दांकित आणि **सुप्रिया वकील** अनुवादित पुस्तकाचं प्रकाशन मेहता पब्लिशिंग हाऊसचे **अखिल मेहता** आणि संपादक **योजना यादव** यांच्या उपस्थितीत पुण्यात करण्यात आलं.

**अभिजित कुलकर्णी** लिखित **‘रेड टेप’** या कादंबरीचं प्रकाशन नाशिकमध्ये अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष **लक्ष्मीकांत देशमुख** यांच्या हस्ते करण्यात आलं. ‘एबीपी माझा’चे संपादक **राजीव खांडेकर**, ‘दिव्य मराठी’चे राज्य संपादक **प्रशांत दीक्षित,** मेहता पब्लिशिंग हाऊसचे संस्थापक **अनिल मेहता,** ‘दिव्य मराठी’चे निवासी संपादक **जयप्रकाश पवार** यांच्या उपस्थितीत हा समारंभ पार पडला.

**अनिता कुलकर्णी** लिखित **‘मॅग्नोलिया’चं** प्रकाशन सुविख्यात नृत्यांगना **शर्वरी जमेनीस** यांच्या हस्ते करण्यात आलं. मेहता पब्लिशिंग हाऊसच्या प्रॉडक्शन विभागाच्या प्रमुख **राजश्री देशमुख** यांची या कार्यक्रमाला उपस्थिती होती.

### पुरस्कार

**उमा कुलकर्णी** लिखित **‘संवादु अनुवादु’** या आत्मकथनास महाराष्ट्र साहित्य परिषद, मंगळवेढा तर्फे **‘सर्वोत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार २०१७’**, अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद, बडोदा तर्फे ‘**उत्कृष्ट आत्मकथन २०१७’**,

अश्वमेध ग्रंथालय व वाचनालय, सातारा तर्फे कै. भास्करराव ग. माने स्मृत्यर्थ **'अक्षरगौरव साहित्य पुरस्कार २०१७',** तसेच साहित्यप्रेमी भगिनी मंडळाचा **'वार्षिक पुरस्कार'** हे पुरस्कार प्राप्त झाले.

**योजना यादव** लिखित **'मरी मरी जाय सरीर'** या काव्यसंग्रहास महाराष्ट्र साहित्य परिषद, मंगळवेढा तर्फे 'सर्वोत्कृष्ट ग्रंथ पुरस्कार २०१७', अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद, बडोदा तर्फे **'उत्कृष्ट काव्यसंग्रह २०१७'**, आपटे वाचन मंदिर आणि इचलकरंजी साहित्य संमेलन स्मृती ट्रस्ट यांच्या वतीने **'उत्कृष्ट काव्यसंग्रह पुरस्कार २०१७'** तसेच साहित्यप्रेमी भगिनी मंडळाचा **'वार्षिक पुरस्कार'** हे पुरस्कार मिळाले.

**मंजुश्री गोखले** लिखित **'हेचि दान देगा देवा'** या कादंबरीस पुणे नगर वाचन मंदिर तर्फे संत वाङ्मय विषयक ग्रंथ पुरस्कार- **कवी ह. स. गोखले पुरस्कार २०१७ने** गौरविण्यात आले.

**राम प्रधान** लिखित **'माझी वाटचाल : मेटकॉफ हाउस ते राजभवन'** या आत्मकथनास श्रीमंत गंगाबाई वाचन मंदिर, आजरा तर्फे **'डॉ. बाबासाहेब आंबेडकर लक्षणीय गद्य साहित्यकृती पुरस्कार २०१७'** हा पुरस्कार प्राप्त झाला.

**डॉ. अनिल गांधी** लिखित **'अफलातून मेंदू'** या पुस्तकास स्नेहवर्धन रिसर्च इन्स्टिटयूटतर्फे **'डॉ. प्र.न.जोशी 'विज्ञानमित्र' ग्रंथश्रेष्ठता पुरस्कार',** अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघातर्फे **'उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती पुरस्कार २०१८'** हे पुरस्कार प्राप्त झाले.

**रा. वा. शेवडे गुरुजी** लिखित 'जाणता राजा श्री शिवछत्रपती' या पुस्तकास द फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स, न्यू दिल्ली तर्फे बालसाहित्यातील **'उत्कृष्ट पुस्तकनिर्मिती पुरस्कार २०१८'** हा पुरस्कार मिळाला. याच संस्थेतर्फे मेहता पब्लिशिंग हाऊसच्या **ग्रंथसूचीला उत्कृष्ट निर्मितीसाठीचा दुसरा पुरस्कार** मिळाला.

कोवाड येथे पार पडलेल्या युवा ग्रामीण साहित्य संमेलनात **मेहता पब्लिशिंग हाऊसचे अनिल मेहता** यांना **पारू नाईक** यांच्या हस्ते मानपत्र देऊन गौरवण्यात आले.




**अन्य कार्यक्रम**

अल्पावधीत साहित्य क्षेत्रात मानाचं स्थान मिळवलेल्या **गेटवे लिटफेस्टच्या** २०१८च्या आवृत्तीत अनुवादावर विशेष चर्चा झाली. मुंबईत एनसीपीएच्या सभागृहात हा महोत्सव पार पडला. 'अनुवादावरील नवं तंत्रज्ञान आणि प्रवाह' या चर्चेअंतर्गत **मेहता पब्लिशिंग हाऊसचे सुनील मेहता यांनी मराठीतील अनुवादाच्या परंपरेचा** आढावा घेतला.

गुंडेवाडी (ता. जालना) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेला **मेहता पब्लिशिंग हाऊसच्या** वतीने विविध विषयांवरील बालसाहित्य भेट देण्यात आले.

◆

# २०१८ साली प्रकाशित पुस्तकांची यादी

## कादंबरी

| | | |
|---|---|---|
| आंधळ्या बाईचे वंशज | | |
| : अनीस सलीम | अनु. श्यामल चितळे | २९५ |
| द केस ऑफ डेडली टॉय | | |
| : अर्ल स्टॅन्ले गार्डनर | अनु. ज्योती आफळे | २२० |
| द केस ऑफ हॉन्टेड हसबन्ड | | |
| : अर्ल स्टॅन्ले गार्डनर | अनु. ज्योती आफळे | २५० |
| द केस ऑफ द आइसकोल्ड हॅन्ड्स | | |
| : अर्ल स्टॅन्ले गार्डनर | अनु. बाळ भागवत | १८० |
| द केस ऑफ द डेम्यूर डिफेन्डन्ट | | |
| : अर्ल स्टॅन्ले गार्डनर | अनु. बाळ भागवत | १९० |
| ॲन्ड द माऊंटन्स एकोड | | |
| : खालिद हुसेनी | अनु. वैजयंती पेंडसे | ४४० |
| तिमिरपंथी : ध्रुव भट्ट | अनु. सुषमा शाळिग्राम | ३२० |
| घाचर घोचर | | |
| : विवेक शानभाग | अनु. अपर्णा नायगांवकर | १५० |
| द ब्रोकर : जॉन ग्रिशॅम | अनु. अशोक पाध्ये | ४८० |
| द ओडेसा फाइल | | |
| : फ्रेडरिक फॉर्सिथ | अनु. अशोक पाथरकर | ३८० |
| रेझोनान्स : अजय पांडे | अनु. उज्ज्वला गोखले | ३९५ |
| रेड टेप | अभिजित कुलकर्णी | ३४० |
| अडगळ | ल.सि.जाधव | २२० |
| बेधुंद | अविनाश लोंढे | २५० |
| धना | पै. गणेश मानुगडे | १७० |
| नाना आणि महादजी | कुंदन तांबे | २०० |
| ब्लॅकलिस्ट : ब्रॅड थॉर | अनु. बाळ भागवत | ४५० |
| फुल ब्लॅक : ब्रॅड थॉर | अनु. बाळ भागवत | ४५० |

| | | |
|---|---|---|
| फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे | | |
| : ई.एल.जेम्स | अनु. शोभना शिकनीस | ७०० |
| फिफ्टी शेड्स डार्कर | | |
| : ई.एल.जेम्स | अनु. डॉ.शुचिता फडके | ७०० |
| फिफ्टी शेड्स फ्रीड | | |
| : ई.एल.जेम्स | अनु. डॉ.शुचिता फडके | ७०० |
| शेष | स्वाती चांदोरकर | २०० |

**कथासंग्रह**

| | | |
|---|---|---|
| सर्पाचा सूड : सुधा मूर्ती | अनु. लीना सोहोनी | २०० |
| गरुडजन्माची कथा : सुधा मूर्ती | अनु. लीना सोहोनी | १८० |
| द केस ऑफ क्रिमसन किस | | |
| : अर्ल स्टॅन्ले गार्डनर | अनु. ज्योती आफळे | १९० |
| प्रेमकथा : ॲनी झैदी | अनु. मुग्धा शुक्रे | ३२० |
| रिक्त | मोहना प्रभुदेसाई-जोगळेकर | २५० |
| तरंग | कल्याणीरमण बेन्नुरवार | २५० |

**अनुवादित सत्यकथा**

| | | |
|---|---|---|
| माय डॉटर माय मदर | | |
| : ॲनी मरे | अनु. रमा नाडगौडा | ४९५ |
| ब्रह्मकन्या | | |
| : झोया फन, डेमियन लुईस | अनु. श्रद्धा भोवड | ३५० |
| नागासाकी : क्रेग कोली | अनु. डॉ. जयश्री गोडसे | ४०० |

**अनुवादित आत्मकथन**

| | | |
|---|---|---|
| मातीचे मम अवघे जीवन | | |
| : क्रिस्टीन किंबल | अनु. मेधा मराठे | २८० |
| समुद्राकाठचे एक वर्ष | | |
| : जोआन अँडरसन | अनु. अरुंधती चितळे | १६० |
| बंधमुक्त होताना : पद्मा देसाई | अनु. सुनंदा अमरापूरकर | २९५ |
| ब्लू बर्ड : वेस्ना मरीच | अनु. मैत्रेयी जोशी | २२० |

| | | |
|---|---|---|
| सिक्स मशिन | | |
| : ख्रिस गेल,टॉम फोर्डायिस | अनु. दीपक कुळकर्णी | ३९५ |
| लाईफ विदाउट लिमिट्स | | |
| : निक व्होयचिच | अनु. प्रसाददत्त गाडगीळ | २८० |
| चेस युअर ड्रीम्स : सचिन तेंडुलकर | अनु. दीपक कुळकर्णी | २९५ |
| हाऊ स्टारबक्स सेव्ह्ड माय लाईफ | | |
| : मायकेल गेट्स गिल | अनु. नीला चांदोरकर | ३२० |

**आत्मकथन**

| | | |
|---|---|---|
| मॅग्नोलिया | अनिता कुलकर्णी | २९५ |
| सर्जा | रामचंद्र खाटमोडे | १५० |

**अनुवादित अनुभवकथन**

| | | |
|---|---|---|
| तीन हजार टाके : सुधा मूर्ती | अनु. लीना सोहोनी | १६० |
| देवाजीचं ऑफिस : जेम्स जोसेफ | अनु. सुनीता कट्टी | २४० |
| सीक्रेट्स ऑफ द लाइट | | |
| : डॅनियन ब्रिंकली/कॅथरिन ब्रिंकली | अनु. सचिन रायलवार | २०० |
| प्रतिरूप : प्रिया कुमार | अनु. स्वाती काळे | १९५ |

**चरित्रे / व्यक्तिचरित्रे**

| | | |
|---|---|---|
| जपुन टाक पाऊल! | व.पु.काळे | २२० |

**अनुवादित चरित्रे / व्यक्तिचरित्रे**

| | | |
|---|---|---|
| अँजेलाज ॲशेस : फ्रॅन्क मॅक्कोर्ट | अनु. गीतांजली वैशंपायन | ३८० |
| अराइज, अवेक : रश्मी बन्सल | अनु. सुनीति काणे | २४० |
| डेमोक्रसीज इलेव्हन | | |
| : राजदीप सरदेसाई | अनु. मेघना ढोके | ५९५ |

**इतिहासपर**

| | | |
|---|---|---|
| मुघल सत्तेचा सारिपाट | | |
| : श्रीनिवास राव अडिगे | अनु. उदय भिडे | २२० |
| रिटर्न ऑफ अ किंग | अनु. अंजनी नरवणे आणि | |
| : विल्यम डॅलरिंपल | सुनीति काणे | ५९५ |

**माहितीपर**

| | | |
|---|---|---|
| शिवछत्रपती : एक मागोवा | डॉ. जयसिंगराव पवार | १७० |

| | | |
|---|---|---|
| छत्रपती संभाजी : एक चिकित्सा | डॉ. जयसिंगराव पवार | १८० |
| आमच्या इतिहासाचा शोध आणि बोध | डॉ. जयसिंगराव पवार | १०० |
| मराठेशाहीचे अंतरंग | डॉ. जयसिंगराव पवार | १७० |
| मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध | डॉ. जयसिंगराव पवार | २४० |
| राजर्षी शाहू छत्रपती : एक मागोवा | डॉ. जयसिंगराव पवार | १५० |
| राजर्षी शाहू छत्रपती : पत्रव्यवहार आणि कायदे | डॉ. जयसिंगराव पवार | १५० |
| राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकूमनामे | डॉ. जयसिंगराव पवार | १७० |
| राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे | डॉ. जयसिंगराव पवार | १४० |
| राजर्षी शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील आणि प्रबोधनकार ठाकरे | डॉ. जयसिंगराव पवार | ९० |
| शिवचरित्रापासून आम्ही काय शिकावे? | डॉ. जयसिंगराव पवार | १२० |
| राजर्षी शाहू छत्रपती : एक अभ्यास | वसुधा पवार | १५० |
| पॉलिटिक्स ऑफ द वूम्ब : पिंकी विराणी | अनु. रेश्मा कुलकर्णी-पाठारे | ३९५ |

**व्यक्तिमत्त्व विकसन**

| | | |
|---|---|---|
| द माइंड जिम रिलेशनशिप्स | श्याम भुर्के | ३०० |

**मार्गदर्शनपर**

| | | |
|---|---|---|
| अवनी एक नवी : एकहार्ट टोले | अनु. नीलिमा जोशी | २४० |
| साधने : फिल स्टुट्झ आणि बॅरी मायकेल्स | अनु. जयश्री गोडसे | २५० |
| वर्क लेस डू मोअर : डॉ. जॅन येगर | अनु. दिलीप गोगटे | २९५ |
| परवाना जगण्याचा : प्रिया कुमार | अनु. श्यामल कुलकर्णी | २५० |
| बीइंग मॉर्टल : डॉ. अतुल गवांदे | अनु. डॉ. वसु भारद्वाज | २९५ |

| | | |
|---|---|---|
| फिश! : स्टीफन सी.लन्डिन, | | |
| जॉन क्रिस्टेन्सेन, हॅरी पॉल | अनु. डॉ. शुचिता फडके | १४० |
| फिश! स्टिक्स : स्टीफन सी.लन्डिन, | | |
| जॉन क्रिस्टेन्सेन, हॅरी पॉल | अनु. डॉ. शुचिता फडके | १४० |
| फिश! फॉर लाइफ : स्टीफन सी.लन्डिन, | | |
| जॉन क्रिस्टेन्सेन, हॅरी पॉल | अनु. डॉ. शुचिता फडके | १९० |
| फिश! टेल्स : स्टीफन सी.लन्डिन, | | |
| जॉन क्रिस्टेन्सेन, हॅरी पॉल | अनु. डॉ. शुचिता फडके | २०० |
| थिंक युवरसेल्फ गॉर्जियस | | |
| : अनिता नायक | अनु. मंजूषा मुळे | २४० |

**ललित**

| | | |
|---|---|---|
| कवडसे | शिवाजी सावंत | १९० |
| ललितकलेच्या सहवासात | पु.श्री.काळे | २५० |

**नाटक**

| | | |
|---|---|---|
| मृत्युंजय | शिवाजी सावंत | १४० |
| छावा | शिवाजी सावंत | १५० |

**वैचारिक**

| | | |
|---|---|---|
| द डिफिकल्टी ऑफ बिइंग गुड | | |
| : गुरुचरण दास | अनु. सुदर्शन आठवले | ६५० |

**विज्ञान कथासंग्रह**

| | | |
|---|---|---|
| गार्डिअन | सुधा रिसबूड | २२० |

**विज्ञान कादंबरी**

| | | |
|---|---|---|
| जॉर्जेस कॉस्मिक ट्रेझर हंट | | |
| : ल्यूसी आणि स्टीफन हॉकिंग | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | ४९५ |
| जॉर्जेस सिक्रेट की टू द युनिव्हर्स | | |
| : ल्यूसी आणि स्टीफन हॉकिंग | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | ४९५ |
| जॉर्ज अँड द बिग बँग | | |
| : ल्यूसी आणि स्टीफन हॉकिंग | अनु. डॉ. प्रमोद जोगळेकर | ४९५ |

## संदर्भ ग्रंथ

| | | |
|---|---|---|
| डॉ. आनंद यादव : एक साहित्यिक प्रवास | कीर्ती मुळीक | ४९५ |

## काव्यसंग्रह

| | | |
|---|---|---|
| तिनका तिनका तिहार : विमल मेहरा, वर्तिका नंदा | अनु. मंजिरी धामणकर | १८० |

## बालसाहित्य

### कांगारू देशीच्या गोष्टी

| | | |
|---|---|---|
| चहा साखरेचा नाताळ : जेन जॉली / रॉबर्ट इंगपेन | अनु. मालविका आमडेकर | ७० |
| रेडिओ रेस्क्यू ! : जेन जॉली / रॉबर्ट इंगपेन | अनु. मालविका आमडेकर | ७० |
| नववर्षाची अनपेक्षित भेट ! : ख्रिस्तोफर चेंग / दी वू | अनु. मालविका आमडेकर | ७० |
| रात्रीचे राक्षस : नीना पौलोस/चेरिल वेस्टनबर्ग | अनु. मालविका आमडेकर | ७० |

## कुमार साहित्य

### विल्यम शेक्सपिअरच्या कुमारांसाठी २२ बहुविख्यात कथा..

मूळ लेखक : विल्यम शेक्सपिअर । अनुवाद : मंजूषा आमडेकर

संचाची किंमत : रु.१५००

अ मिडसमर नाइट्स ड्रीम । ऑल इज वेल दॅट एन्ड्स वेल
अँटोनी आणि क्लिओपात्रा । ॲज यू लाइक इट
सिंबलिन, किंग ऑफ ब्रिटन । हॅम्लेट, प्रिन्स ऑफ डेन्मार्क
हेन्री फाइव्ह । ज्यूलियस सीझर । किंग लिअर
मच ॲडो अबाउट नथिंग । ऑथेल्लो, द मूर ऑफ व्हेनिस
रिचर्ड ३रा । रोमियो अँड ज्युलिएट । द कॉमेडी ऑफ एरर्स
द मर्चंट ऑफ व्हेनिस । द टेमिंग ऑफ द श्रू । द टेम्पेस्ट
द ट्रॅजेडी ऑफ मॅकबेथ । द टू जंटलमेन ऑफ व्हेरोना
द विंटर्स टेल । टिमॉन ऑफ अथेन्स । ट्वेल्थ नाइट

◆

# विशेष लेख



## एक दिलदार 'राजा'

**– अनिल मेहता**



*विशाखा प्रकाशनाचे संस्थापक आणि 'विशाखा' या दिवाळी अंकाचे संपादक राजा फडणीस यांच्या सहस्रचंद्र दर्शनानिमित्त त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू उलगडणारे 'उत्साहाचा वाहता झरा' हे पुस्तक नुकतेच प्रकाशित झाले आहे. हे पुस्तक दोन भागांत विभागले गेले आहे. त्यापैकी पहिल्या भागातील चार प्रकरणांतून फडणीसांनी दिवाळी अंकाचे संपादक, प्रकाशक, विक्रीकर सल्लागार आणि मसाप कार्यकर्ता म्हणून काम करताना आलेले अनुभव शब्दबद्ध केले आहेत. दुसऱ्या भागात राजा फडणीस यांच्यावर मान्यवरांनी लिहिलेले लेख समाविष्ट करण्यात आले आहेत. राजेन्द्र बनहट्टी, नागनाथ कोत्तापल्ले, प्रा. मिलिंद जोशी, रा. रं. बोराडे, अनिल मेहता इत्यादींच्या लेखांचा त्यात समावेश आहे. या लेखांमधूनही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू उलगडले आहेत. त्यांची जीवनाकडे बघण्याची सकारात्मक वृत्ती, उत्साह, अजातशत्रुत्व, मनमोकळेपणा, लोकसंग्रह इ. गुणांचा परिचय या लेखांतून होतो. राजाभाऊंच्या जीवनातील महत्त्वाच्या प्रसंगांची छायाचित्रेही या पुस्तकात समाविष्ट केली आहेत. तर अशा या पुस्तकातील, राजाभाऊ आणि अनिल मेहता यांच्यातील स्नेहबंधाचं दर्शन घडविणारा 'एक दिलदार 'राजा' हा लेख उद्‌धृत करत आहोत...*

नावात नुसता 'राजा' नाही. तर खरोखरच राजा माणूस, पाच फूट नऊ इंच. शिडशिडीत बांधा. चेहऱ्यावर कायम हास्य. मस्त वागणं, मस्त बोलणं, असा मस्त राजा माणूस. फक्त प्रकाशन क्षेत्रातच नाही, तर त्याच्या इतर उद्योगांत आणि

नातेवाइकांत एक सन्माननीय व्यक्ती म्हणून परिचित असलेला हा राजा माणूस आमचा मित्र, कधी काळचा शेजारी असल्याचा मला खरोखरच अभिमान, आनंद आणि खूप काही वाटते.

प्रथम मी त्याच्या ग्रुपमध्ये केव्हा आलो, आमची मैत्री केव्हा झाली हे कळलेच नाही. 'फ्रीडम ॲट मिडनाइट' या पुस्तकाच्या छपाई- निमित्त आणि इतर काही कामानिमित्त मी वारंवार पुण्याला जात असे. मंडईजवळ असलेल्या स्वरूप लॉजमध्ये राहात असे. पलीकडेच मॅजेस्टिक बुक स्टॉलच्या मोदीच्या बरोबर संध्याकाळी गप्पा मारण्यासाठी जात असे, त्यावेळी इतर बरेच प्रकाशक येत असत. निपुणगे, श्याम कोपर्डेकर, प्रमोद इनामदार, बल्लाळ, पासलकर आणि अनेक. नंतर आम्ही सर्वजण नाना जोशी आर्टिस्ट यांच्याकडे जात असू. तिथे बऱ्याच वेळा राजाभाऊ भेटत. मैफल जमत असे. नंतर जेवण रात्री एकत्र होत असे. गप्पा फक्त पुस्तकांवर आणि प्रकाशन व्यवसायावर होत असत. राजाभाऊ त्यावेळी पुस्तक प्रकाशनात आघाडीवर होते. या गप्पा आणि मैफलीत भर पडत होती, त्यात प्रमोद बापट, रत्नाकर कुलकर्णी, संजय लिमये वगैरे मंडळी होती. राजाभाऊ बऱ्याच वेळा आपल्या या मित्रांची फिरकी घ्यायचे; पण कधीही अनबॅलन्स्ड नाही. यावेळी माझे ऑफिस पेरूगेटजवळ धनश्री अपार्टमेंटमध्ये आले आणि काही वर्षांतच पलीकडच्या फ्लॅटमध्ये राजाभाऊ सहकुटुंब राहायला आले. माझा मुलगा सुनील आमच्या प्रकाशनाचा कारभार पाहत होता. त्यावेळी राजाभाऊ मला कायम टोकायचे. म्हणायचे ''अनिल, तुझ्यापेक्षा तुझा मुलगा व्यवयास छान करेल.'' राजाभाऊंच्या पत्नी काही गोडधोड केलं की सुनीलला बोलावत असत किंवा पाठवत असत. सुनील पण त्यांच्या घरच्यांपैकीच एक झाला होता. आणि काय योगायोग! सुनीलच्या वाढदिवसाला गेली तीन वर्षे केक कापण्याच्या वेळीच राजाभाऊ आमच्या ऑफिसमध्ये येत असतात.

राजाभाऊ नुसतेच प्रकाशक नाहीत, तर एक उत्तम वाचक पण आहेत. अनेक वेळा आमच्या ऑफिसमध्ये येऊन नवनवीन पुस्तके विकत घेतात. आता जरी ते प्रकाशन क्षेत्रात नसले, तरी त्यांची बारीक नजर या क्षेत्रातील घडामोडींवर असते.

मी ज्या ज्या वेळी पुण्यात जात असे, त्यावेळी आमच्या गप्पा प्रकाशन क्षेत्राबाबतीतच व्हायच्या. मराठीमध्ये कुमार वाङ्मय, त्या काळी कमीच प्रकाशित होत होते. ही चर्चा मी, राजाभाऊ आणि नाना जोशी करत असताना, राजाभाऊंनी एक सूचना केली. आम्ही तिघे एकत्र येऊन अशा प्रकारची संस्था सुरू करावी. मी आणि नाना जोशींनी या प्रस्तावाला तात्काळ होकार दिला आणि 'जो मे फ' ही प्रकाशन संस्था

सुरू केली. या प्रकाशन संस्थेमार्फत फक्त कुमार वाङ्मयाची उत्तम पुस्तके प्रकाशित केली जातील असे ठरले. आणि अंदाजे ४० पुस्तके आम्ही प्रकाशित केली. काही कारणामुळे ही संस्था बंद करण्याचा निर्णय आम्ही तिघांनी घेतला.

राजाभाऊंचा अमृतमहोत्सव साजरा करताना त्यांची ग्रंथतुला करण्याचे ठरले आणि अनेक चांगली पुस्तके विकत घेऊन ग्रंथतुला केली हे महत्त्वाचे. आलेल्या सर्वांनी याचा लाभ घेतला. आता राजाभाऊंचा सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा साजरा होत आहे, याचा मला खूप आनंद होत आहे. आजही तब्येतीने मस्त असलेला हा आमचा 'राजा' असाच मस्त राहू दे! आठवणी अनेक आहेत, सुखदुःखाच्या! या सर्व अडचणींवर मात करून आजही हा माणूस खणखणीत आहे.


या अशा आमच्या सर्वांच्या आदरस्थानी असलेल्या 'राजा'स माझा मानाचा मुजरा!

◆◆◆

## 'झोंबी'कार डॉ. आनंद यादव : एक आठवण

**-डॉ. महावीर जिनगोंडा पाटील, सांगवडे**

*'झोंबी' कादंबरीने साहित्यविश्व ढवळून काढलेले डॉ. आनंद यादव यांच्या दुसऱ्या स्मृतिदिनी (२७ नोव्हेंबरला) त्यांच्या आठवणींना त्यांच्या सुहृदाने दिलेला उजाळा.*



'झोंबी' ही कादंबरी ९०च्या दशकात प्रकाशित झाली. आनंद यादव यांना या कादंबरीने खऱ्या अर्थाने लोकमान्यता, राजमान्यता व लोकप्रियता मिळवून दिली. कादंबरी वाचून मी त्यांना भेटायचे नक्की केले. दहा वर्षांनंतर तो योग आला. १ मे २०००ला बेळगावचे अखिल भारतीय साहित्य संमेलन आटोपून ते कागलला घरी आल्याचे समजले. मी व माझे मित्र पाटील कागल येथील सणगर गल्लीतील त्यांच्या घरी पोहोचलो. आयुष्यात प्रथमच एवढ्या मोठ्या लेखकाला भेटण्याचा प्रसंग होता. त्यांचे व्यक्तिमत्त्व प्रथमदर्शीच छाप पाडणारे होते. सरांनी आमची विचारपूस केली. आम्ही गोविंद टेंबे यांच्या गावचे असल्याचे समजल्यानंतर त्यांना विशेष आनंद वाटला. त्यांच्या साहित्यावर चर्चा सुरू झाली. केंद्रस्थानी 'झोंबी' पुस्तक होते. मागील पिढ्यांत कोणीही शाळेची पायरी चढले नव्हते; पण यादव सरांना प्रारंभापासूनच शाळा व मराठी

साहित्य याची आवड होती, वेड होते. ''या वेडामुळेच प्रचंड कष्ट घेत मी इथवर पोहोचू शकलो. झोंबी वाचून अनेकांनी आपले अर्धवट शिक्षण पूर्ण केल्याची अनेक पत्रे मला वारंवार मिळतात त्याचे समाधान वाटते,'' असे ते म्हणाले.

चर्चेच्या ओघात 'पु.लं.'विषयी ते भरभरून बोलले. ते म्हणाले, ''माझ्यातील साहित्यिक पहिल्यांदा 'पु.लं'.नी ओळखला. त्यांच्याकडून मला मोलाचे मार्गदर्शन मिळाले. 'हिरवे जग' हा माझा कवितासंग्रह त्यांना फार आवडला. व्यंकटेश माडगूळकरांचेही माझ्यावर संस्कार झाले. त्या दोघांनी मला लिहिते केले.'' दोन तास त्यांनी आमच्याबरोबर सर्व विषयांवर मुक्त गप्पा मारल्या. बाहेर पडताना सर आम्हाला सोडायला बाहेर अंगणात आले. सर म्हणाले, ''डॉक्टर, कडक उन्हात तुम्ही गावी कसे जाणार?'' मी सहजच म्हणालो, ''सर, आम्ही शेतकऱ्यांची मुलं. आम्हाला कुठलं ऊन लागतंय?'' या वाक्यासरशी सरांचा चेहरा फुलला. मला जवळ बोलावून घेतले. पाठीवर हात ठेवून म्हणाले, ''आपण शेतकऱ्याची मुलं आहोत हे कधीही विसरू नका.'' सरांच्या त्या शब्दांनी आम्ही रोमांचित झालो. त्याच स्थितीत सरांचा निरोप घेतला.

त्यानंतर सरांचे व माझे सूर जुळले. फोनवरून संवाद साधणे, प्रसंगी पत्राद्वारे संवाद सुरू झाला. असाच एकदा सरांचा फोन आला. म्हणाले, ''मला तुमच्या सांगवड्याला जायचे आहे. तुमच्या गावातील नरसोबाचे दर्शन घेण्याची इच्छा आहे.'' मी म्हणालो, ''कागलला घरी आलात की मला फोन करा. आपण जाऊ.'' थोड्याच दिवसांनंतर ते सांगवड्याला पुतण्यासह आले. नृसिंहाच्या आठवणीत ते गुंग झाले. म्हणाले, ''हे पार कट्ट्यावरचे पिंपळाचे झाड. पानांची सळसळ, हे मंदिराचे भव्य शिखर जसेच्या तसे आहे.'' तेथे सरांचे व्याख्यान आयोजित केले. तेव्हा सर बोलू लागले, ''मित्र हो, ५० वर्षांपूर्वी कागलहून मी व माझी आई पायी नृसिंहाच्या दर्शनाला आलो होतो आणि आज ५० वर्षांनी त्याच मंदिरात मनोगत मांडण्यासाठी मी उभा आहे. आनंदाने माझे मन भरून आले आहे.'' त्यानंतर सर रोमहर्षक जीवनपट उलगडत गेले. उपस्थित सर्व तृप्त झाले. ८ मार्च २००५ हा दिवस आमच्या दृष्टीने अविस्मरणीय ठरला. आज सर आपल्यात नसले तरी आठवणींत मात्र नेहमीच राहतील.

◆◆◆

# साहित्य अकादमी मेट्रो पुस्तकालय

**प्रगतिपथावर असलेल्या भारतासाठी भारतीय साहित्याचा वाचनमेवा**

*साहित्य अकादमीने वाचकांची अभिरुची जोपासण्यासाठी, त्यांना वाचतं ठेवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले आहेत. त्यायोगे भारतीय साहित्याला वाव देत विकासाकडे वाटचाल केली आहे. वाचन चळवळीचा पुढचा टप्पा म्हणजे दिल्ली मेट्रो स्टेशनवर उघडलेली पुस्तकांची दुकाने. साहित्य अकादमीचे सचिव, (स.आ.) डॉ. के. श्रीनिवास राव ह्यांच्याशी या लक्षणीय उपक्रमाबाबत स्मिता द्विवेदी ह्यांनी साधलेला संवाद...*

डी.एम.आर.सी. आणि साहित्य अकादमी ह्यांच्या संयुक्त विद्यमाने विश्वविद्यालय मेट्रो स्टेशन आणि काश्मीर गेट स्टेशन ह्या दोन ठिकाणी, अकादमीने पुस्तकांची दोन दुकानं उघडली आहेत. मेट्रो स्टेशनवर असलेल्या ह्या दुकानांमुळे आता तिथून जाणाऱ्या हजारो प्रवाशांना पुस्तके सहज उपलब्ध झालेली आहेत. साहित्य अकादमीने प्रकाशित केलेल्या अनेकानेक इंग्लिश आणि हिंदी पुस्तकांच्या बरोबरीने विविध प्रादेशिक भाषांतील साहित्याचा लाभ घेण्याची संधी वाचकांना मिळाली आहे. त्याबद्दल सविस्तरपणे बोलताना श्री. राव म्हणाले, ''पहिलं दुकान आम्ही उघडलं ते २०१४मध्ये, साहित्य अकादमीच्या प्रांगणाबाहेर, काशमीर गेट स्टेशनमध्ये. आमच्या प्रत्येक सेंटरमध्ये पुस्तकांची अनेक लहान दुकानं आहेत. तिथे फक्त आमच्यातर्फे प्रकाशित झालेलं साहित्य मिळतं. भारतीय साहित्याला वाव मिळावा म्हणून आम्ही पहिल्यापासून हे धोरण ठेवलं आहे. त्यानंतर अधिकाधिक वाचकांपर्यंत पोहोचता यावं म्हणून आम्ही थोडा विस्तार करायचं ठरवलं.

**नवी दालने**

- विविध भारतीय भाषांमधील उत्तम साहित्य दर्जेदार पुस्तकांच्या रूपात उपलब्ध करून देणं हा ह्या योजनेमागचा उद्देश आहे. त्यातून मेट्रो प्रवाशांमध्ये, विशेषत: तरुणाईमध्ये वाचनाची आवड रुजवली आणि जोपासली जाईल. ही दोन स्थानं निवडण्यामागे हे प्रमुख कारण होतं. ''सद्य घडीला दिल्लीत आमची दोन पुस्तक दालनं आहेत. त्यांना भरभरून मिळणारा प्रतिसाद पाहता राजीव चौक, नॉयडा, गुरगाव आणि बंगळूरू मेट्रो इथे पुस्तक दालनं सुरू करण्याचा आमचा मानस आहे. ह्या तीनही ठिकाणी रोजच प्रचंड वर्दळ असते.''

काश्मीर गेट स्टेशनजवळ असलेल्या पुस्तक दालनाच्या बाजूला वाचनालय सुरू

करण्याचा मानस राव यांनी बोलून दाखवला. ''त्यासाठी काश्मीर गेट मेट्रो स्टेशनवर असलेल्या पुस्तक दालनाच्या बाजूला आम्हाला जागा देण्यात यावी अशी बोलणी डीएमआरसी ह्यांच्याशी सुरू आहेत. मोकळ्या जागेमुळे अधिकाधिक लोक वाचनासाठी प्रेरित होतील. त्यातून वाचनसंस्कृती सहजगत्या जोपासली जाईल. हवी तशी जागा ताब्यात आली की, अकादमी तिथे वाचनालय सुरू करेल. आमची पुस्तकं लोकांपर्यंत पोहोचली पाहिजेत. मेट्रो प्रवाशांना वाचण्याची आवड जोपासण्यासाठी अशी जागा मिळाली तर गाडी येईपर्यंत ते सहजच पुस्तक वाचून वेळ सत्कारणी लावू शकतात.''

### पुस्तकांची उपलब्धता

ही दालनं अकादमी आणि सच्चे पुस्तकप्रेमी ह्यांच्यातील दुवा ठरतील. पुस्तक विक्रीबद्दल विचारणा केली असता त्यांनी सविस्तर उत्तर दिलं. ते म्हणाले, ''मुख्यत्वे आम्ही हिंदी आणि इंग्लिश पुस्तकांची विक्री करतो; परंतु त्या जोडीने आम्ही काही प्रादेशिक पुस्तके देखील ठेवतो. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे आमच्या ह्या दालनात एक सहाय्यक उपस्थित असतो. आलेल्या वाचकाला उत्तम पुस्तकांची माहिती देण्याच्या दृष्टीने त्याची भूमिका महत्त्वाची आहे. एखाद्या वाचकाला विशिष्ट प्रादेशिक पुस्तक हवं असल्यास त्याला आमच्या ऑफिसमध्ये पाठवण्याचं काम ह्या सहाय्यकाचं. तिथे मग वाचकाला ते पुस्तक उपलब्ध होतं. त्यासाठी वाचक स्वत: येऊ शकतो किंवा त्याने पुस्तकाची नोंदणी केली तर आम्ही ते पुस्तक त्यांच्यापर्यंत पोहोचवतो. दरवर्षी आम्ही चोवीस भाषांतून सहाशेहून अधिक पुस्तकं प्रकाशित करतो. मात्र, इतकी सगळी पुस्तकं दालनामध्ये ठेवणं शक्य होत नाही.''

### पुस्तक विक्री व्यवसाय

साहित्याच्या प्रसारासाठी एका सरकारी संस्थेसाठी नफा हा महत्त्वाचा नकष नाही असं त्यांचं म्हणणं आहे. ''प्रत्येक पुस्तक उत्तम असतं असा आम्हाला विश्वास वाटतो. वाचनाची सवय जोपासली जाणार असेल तर पुस्तकांची ऑनलाईन विक्री करायला काहीही हरकत नाही. आमचं क्षेत्र विशेष आहे. विशिष्ट साहित्यप्रकार आम्ही हाताळतो आणि मुख्य म्हणजे आमच्या पुस्तकांची किंमत कमी असते. पुस्तक विक्रीतून आम्ही कुठल्याही प्रकारचा नफा मिळवत नाही.''

भारतामध्ये पुस्तकांची सममूल्यता हा प्रकारच नाही. हा एक वादास्पद मुद्दा आहे; पण माझ्या मते त्याची आवश्यकता आहे. ती जर लागू केली तर मला वाटतं की

प्रकाशन व्यवसायाला त्याचा फायदा होईल.''

**वाचकांना घडवणे**

त्यांच्या मते अगदी लहान वयापासून उत्तम साहित्य वाचायला सुरवात केली नाही तर मोठेपणी शब्दांची जादू समजणं कठीण असतं. वाचनप्रियता जोपासण्यासाठी 'ग्रामीण लोक' हा उपक्रम साहित्य अकादमीने सुरू केला आहे. त्यायोगे खेड्यापाड्यात साहित्य पोहोचवून तेथील उत्तम प्रतिभेचा शोध घेतला जाईल. या उपक्रमाबद्दल माहिती देताना ते म्हणाले, ''अगदी प्रत्येक गावात आम्हाला पोहोचायचं आहे. मुख्य साहित्यप्रवाहाच्या दृष्टीने ते अत्यावश्यक आहे. तरुणाईवर लक्ष केंद्रित करून त्यांच्यामध्ये पुन्हा वाचनाची गोडी निर्माण करायची आहे. भारतभर आयोजित केल्या जाणाऱ्या जवळपास प्रत्येक पुस्तक प्रदर्शनात आम्ही सहभागी होतो. गेल्या वर्षी १८० पुस्तक प्रदर्शनं आणि २०० कार्यक्रमांत आमचा सहभाग होता. आता आम्ही खेड्यापाड्यात आणि तालुक्याच्या ठिकाणी प्रदर्शनं आयोजित करण्यासाठी प्रयत्नशील आहोत. दिल्लीच्या मेट्रो स्टेशन परिसरामध्ये पुस्तक विक्री केंद्र आणि खुल्या वाचनालयांची संख्या वाढविण्याच्या योजना आम्ही आखत आहोत.''

**पुस्तक जाहिरात**

''दरवर्षी प्रसिद्ध होणारी सर्वच्या सर्व (६००) पुस्तके समारंभपूर्वक प्रकाशित करणं अशक्य आहे. तथापि, काही चांगल्या पुस्तकांचा प्रकाशन सोहळा आम्ही आवर्जून करतो. त्यासाठी विद्वानांना पाचारण करतो. पुस्तकांचा आढावा घेऊन ते तज्ज्ञ वाचकांशी संवाद साधतात, चर्चा करतात,'' राव ह्यांनी उत्साहाने सांगितले.

**भविष्यकालीन योजना**

दरवर्षी दर्जेदार एक हजार पुस्तकं प्रकाशित करणे ही साहित्य अकादमीची पुढची महत्त्वाकांक्षी योजना आहे. त्यासाठी भारतीय तरुणांनी पुढे यावं आणि भारतीय साहित्याला आणखी उंचीवर नेऊन ठेवण्यासाठी साहित्य अकादमीला सहकार्य करावं, असं त्यांनी जाताजाता सांगितलं.

◆◆◆

नवे कोरे


# हाऊ स्टारबक्स सेव्हड माय लाइफ

**मायकेल गेट्स गिल**

अनुवाद

**नीला चांदोरकर**

**किंमत : ३२०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**




'चिंधीपासून सुरुवात मग सिंधू घेतला कवेत,' असं म्हणता येईल अशी ही एका जाहिरात क्षेत्रातील उच्चपदस्थाची कहाणी. सर्व सुखांच्या राशींवर आरूढअसलेला हा माणूस जन्मापासूनच भाग्यवंत, चांदीचा चमचा तोंडात घेऊनच जन्मलेला; पण-नशिबाच्या एका फटकाऱ्या- सरशी अक्षरश: होत्याचं नव्हतं झालं. अशा वेळी पुन्हा एकदा दैव त्याच्यावर प्रसन्न झालं, ते एका अठ्ठावीस वर्षांच्या तरुणीच्या रूपात. त्याला स्टारबक्स या कॉफीशॉपमध्ये तिनं नोकरी देऊ केली.

वयाची पन्नाशी उलटली तेव्हा मायकेल गेट्स गिलकडे काय नव्हतं?-उपनगरात एक प्रशस्त घर, पत्नी, चार मुलं, सहाआकडी पगार आणि आयव्ही लीग म्हणून गणल्या जाणाऱ्या संस्थेतून घेतलेलं शिक्षण. उच्चमान्यताप्राप्त शिक्षण वगळता, (केवळ काही वर्षांनी) यांपैकी काहीही त्यांच्याकडे उरलं नाही- आधी नोकरी गेली, मग घटस्फोट झाला आणि त्यानंतर मेंदूवर कर्करोगाची गाठ आहे असंही त्यांच्या डॉक्टरांनी त्यांना सांगितलं. महाबिकट परिस्थिती समोर ठाकली. स्टारबक्समध्ये नोकरी मिळताच ती घेण्याशिवाय त्यांच्याकडे दुसरा मार्गच नव्हता. पंचतारांकित हॉटेलांमध्ये ज्यांनी आपल्या अशिलांबरोबर व्यावसायिक वाटाघाटींच्या निमित्तानं जेवण घेतलं होतं, तो माणूस आता कॉफीशॉपमधलं प्रसाधनगृह स्वच्छ करू लागला.

त्यांच्या सुदैवानं त्यांना एक गुरू भेटते. जीवन कसं जगायचं असतं, याचे वस्तुपाठ ती त्यांना देते. वास्तविक पाहता, या दोघांमध्ये काडीचंही साधर्म्य नाही. ती एक तरुणी कृष्णवर्णीय आफ्रिकन- अमेरिकन, मादक द्रव्याच्या आहारी गेलेल्या एका बाईची मुलगी, तर ते नेहमीच अधिकारपदावर काम केलेले, हुकूम सोडण्याची सवय असलेले गौरवर्णीय अमेरिकन; पण एक 'अल्पसंख्याक' म्हणून त्यांच्याबरोबर काम करू लागल्यावर त्यांना अनेक नवी आव्हानं स्वीकारावी लागतात. समोरच्या व्यक्तीला आदरानं, सन्मानानं वागवण्याची शिकवणही त्यांना याच ठिकाणी मिळते. जनसामान्यांमध्ये अतिशय लोकप्रिय असलेल्या या कॉफीशॉपमध्ये माइकला अनेक जिवाभावाचे दोस्त मिळतात, आपल्या दुरावलेल्या मुलाबाळांशी त्यांचे पुन्हा एकदा सलोख्याचे संबंध निर्माण होतात. क्रिस्टलसारखी मार्गदर्शक लाभल्यामुळे गमावलेला आत्मसन्मान त्यांना परत एकदा गवसतो आणि त्याहून महत्त्वाची बाब म्हणजे सुखाची गुरुकिल्लीही त्यांना स्टारबक्समध्येच सापडते.

# पुस्तक परिचय



## नाथ हा माझा...

श्रीमती कांचन काशिनाथ घाणेकर या ज्येष्ठ सिनेअभिनेत्री सुलोचना यांची कन्या आणि सिने-नाट्य अभिनेते काशिनाथ घाणेकर यांच्या पत्नी. त्यांचा जन्म १६ सप्टेंबर१९४७ रोजी झाला. त्यांनी मराठी व तत्त्वज्ञान या विषयांत मुंबई विद्यापीठातून बी.ए. ही पदवी संपादन केली आणि त्याच विद्यापीठातून एम.ए. ही पदवी मराठी व भाषाशास्त्र या विषयांसह संपादन केली. १९६९ पासून विविध वृत्तपत्रांतून, सिनेसाप्ताहिकांतून आणि दिवाळी अंकांतून त्यांचे लेख प्रसिद्ध झाले आहेत. 'नाथ हा माझा' या मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केलेल्या त्यांच्या चरित्रग्रंथाला वाचकांचा उदंड प्रतिसाद मिळाला असून, आतापर्यंत त्याच्या दहा आवृत्त्या प्रकाशित झाल्या आहेत. 'महाराष्ट्र टाइम्स'तर्फे केल्या गेलेल्या दशकातील १०१ मराठी पुस्तकांच्या यादीत चरित्र विभागात या पुस्तकाची नोंद झाली आहे. भालजी पेंढारकर, लता मंगेशकर, सुलोचना, राजा परांजपे यांच्यासह चित्रपटसृष्टीतील १५ दिग्गजांवरील व्यक्तिचित्रांवर आधारित 'रेशीमगाठी' हा लेखसंग्रहही मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केलेला असून, त्याच्याही तीन आवृत्त्या प्रकाशित झाल्या आहेत. ज्येष्ठ अभिनेत्री सुलोचना यांच्या प्रदीर्घ चित्रपट कारकिर्दीवर आधारित आठवणींचं पुस्तक 'माझी माणसं' याचं लेखन सध्या त्या करत आहेत. नाट्यविषयक लोकप्रिय ग्रंथ गौरव पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आलं आहे. भालजी पेंढारकर सांस्कृतिक केंद्र आणि डॉ. काशिनाथ घाणेकर स्मृती विश्वस्त प्रतिष्ठानच्या त्या सदस्य आहेत. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेतर्फे आयोजित व्यावसायिक नाटकांच्या स्पर्धेकरीता, म.टा. सन्मान - महाराष्ट्रतर्फे आयोजित स्पर्धेकरीता (चित्रपट विभागासाठी), महाराष्ट्र राज्य चित्रपट महोत्सवाकरीता, चित्रपती व्ही. शांताराम पुरस्कारासाठी दोनदा आणि महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट महोत्सवासाठी त्यांनी परीक्षक म्हणून काम पाहिलं आहे.



## कांचन काशिनाथ घाणेकर




'डॉक्टरांचे निळे टपोरे डोळे आरपार वेध घ्यायचे. त्यांचे एखाद्या लहान मुलासारखे खळाळून हसणे पाहत राहावेसे वाटे. त्यांचा भावदर्शी चेहरा मोहित करायचा.

अहं. पण ज्याच्यासाठी मी वेडावून जावे, असे त्यांच्याजवळ विशेष असे काय होते? घरीदारी, कॉलेजमध्ये त्यांच्याहूनही देखणी मंडळी मी पाहत होते. शिवाय ते सर्व माझ्या बरोबरीच्या वयाचे होते. अविवाहित होते. मग डॉक्टरांचेच इतके आकर्षण मला का वाटत होते?

–आणि मग एकच उत्तर

डोळ्यांसमोर येत होते – 'डॉक्टरांचे कलंदर व्यक्तिमत्त्व', 'सो व्हॉट?' असं बेदरकारपणे विचारणारा त्यांचा बेधडक स्वभाव. त्यांच्या रांगडेपणाने, धसमुसळ्या स्वभावाने मला मंत्रमुग्ध केले होते. माझ्या उपजत आवडींना डॉक्टरांची ही सगळी स्वभाववैशिष्ट्ये आकर्षून घेत होती, हे नक्कीच होते.'

९ जानेवारी १९७० रोजी ‘मला काही सांगायचंय’चा पहिला प्रयोग साहित्य संघात झाला. चंद्रलेखेच्या ‘तुझे आहे तुजपाशी’च्या वेळी समीक्षकांनी डॉक्टरांच्यावर बरेच तोंडसुख घेतले होते. पण या वेळी मात्र त्याच मंडळींनी डॉक्टरांना पुन्हा एकदा उचलून धरले.

**‘मराठा’ वृत्तपत्राने लिहिले—**

डॉक्टर घाणेकर यांनी राहुल मोकळेपणाने व संयम यांच्या कुशल मिश्रणाने केला आहे. त्यांची भूमिका हे या नाटकांचे आकर्षण ठरेल.

**महाराष्ट्र टाइम्सने म्हटले—**

राहुल होणारे डॉ. काशिनाथ घाणेकर सर्वांत भाव खाऊन जातात. मुद्राभिनयातील आणि वाक्ये फेकण्यातील त्यांचे कसब अजब वाटते. ते रंगमंचावर असले की, सामान्यत: इतर सारी पात्रे फिकी वाटतात.

**केसरीच्या मते—**

डॉ. काशिनाथ घाणेकर आणि सुधा करमरकर यांनी बुद्धिनिष्ठ अभिनयाची एक सुरेख मेजवानी या नाटकात दिली. राहुलच्या रांगड्या मनातील हळुवार भावना डॉ. घाणेकरच घडवू जाणोत.

**विशाल सह्याद्रीने म्हटले—**

डॉ. काशिनाथ घाणेकर यांनी राहुलची भूमिका सदैव आब राखून उत्कृष्ट केली आहे. त्यांच्या प्रत्येक संवादात व कृतीत अभिजात कलेची साक्ष पटते.

**‘माणूस’च्या परीक्षणात पुष्पा भावे मात्र म्हणाल्या—**

डॉ. काशिनाथ घाणेकर हे लोकप्रिय नट आहेत आणि दुर्दैव असे की लोकप्रियतेचे हे भान जपतच ते रंगमंचावर वावरतात. त्यांचा व त्यांच्या चाहत्या प्रेक्षकांचा जो लाडिक संवाद नाटकात चालू राहतो; तो अनेकदा नाटकाचा विरस करणारा ठरतो. अनेक गंभीर प्रसंगी घाणेकरांच्या आविर्भावांनी हास्यकल्लोळ निर्माण होत होता. अगदी उमेदवारीच्या काळापासून भडक अभिनय आणि सदोष शब्दोच्चार ही श्री. काशिनाथ घाणेकरांची वैशिष्ट्ये आहेत. त्यांच्या देखण्या रूपाप्रमाणेच त्यांचा भडक अभिनय हाही व्यावसायिक यशामधील हुकमी एक्का आहे.

**माधव मनोहर यांनी 'सोबत'मध्ये म्हटले की,**

लाल्याविषयी, चुकलो, घाणेकरांविषयी अधिक काय लिहावे? हा स्मार्ट नट आता बनचुके झाला आहे. आपल्या सामर्थ्याची पुरेपूर चव त्याने चाखली आहे. लोकप्रियतेच्या रक्ताला चटावलेला हा वाघ आता मोकाट सुटला आहे; पण मुळात तो वाघ आहे हे मात्र विसरून चालणार नाही. प्रस्तुत नाटकात तर काय विचारता? नट घाणेकरांच्या मदतीला नाटककार कानेटकर स्वत:च धावून आले आहेत. परिणामी जे अपेक्षित तेच घडते. व्हायचे तेच होते.

प्रा. वसंत कानेटकरांचे वडील-प्रख्यात कवी गिरीश आणि कानेटकरांच्या पत्नी उषाताई यांची या वेळीही अभिप्रायार्थ पत्रे आली. कवी गिरीश आपल्या पत्रात डॉक्टरांना म्हणतात–

॥ श्री ॥

२५-३-७०

प्रियतम डॉक्टर,

तुमचे 'मला काही सांगायचंय' हे नाटक पाहून मी अस्वस्थ चित्ताने थिएटर सोडले. राहुलचे काम तुम्ही अतिशय चोखंदळपणे व कौशल्याने केले आहे. एकेक नट असे कुशल असतात की, त्यांना कोणतेही काम द्या, ते अधिक कौशल्य खर्च करून आपली चतुराई व कला अबाधित ठेवतात. त्यातले दर्दीतले दर्दी तुम्ही आहात. तुम्ही नट म्हणून नाव मिळविले आहेच. पण तुम्ही एक नाणावलेले नट आहात. राहुलचे काम कोणत्याही नटाला द्या, तो ते काम चांगले करीलच. पण अप्रतिम कौशल्य फक्त तुम्हीच मिळविले आहे. उत्तम नट, त्याची चतुराई, वसंताचे लिखाण, सर्वच काही श्रेय पावले आहेत. उत्तमच श्रेय तुम्ही घेतले आहे.

क. लो. अ. हे. वि.

तुमचा,

**शं. के. कानेटकर *(गिरीश)***

सौ. उषाताई कानेटकर 'मला काही सांगायचंय' पाहून आपले मत कळविताना म्हणाल्या–

॥ श्री ॥

प्रा. वसंत कानेटकर २९-१-१९७०

प्रिय काशिनाथ,

आतापर्यंत पुष्कळ लोकांनी या नाटकातल्या तुमच्या अभिनयाबद्दल तुमचे कौतुक केले असेल, त्यापेक्षा निराळे मी काय सांगणार? ही भूमिका लिहीत असताना मी लेखकाच्या सान्निध्यातच होते; असे नव्हे तर अनेक वेळा मी चर्चेत भागही घेतला आहे. म्हणून या भूमिकेचे सगळे बारीकसारीक तपशील मला माहीत आहेत. त्या वेळी माझ्या कल्पनेने राहुलचे एक चित्रही मी माझ्यासमोर उभे केले होते. तुम्ही उभा केलेला राहुल या चित्राशी १०० टक्के जुळला *(१०१ टक्के नाही)*. हा प्रत्यय फार क्वचित येतो. 'लाल्याच्या' वेळी असंच वाटलं होतं. बेडरूम सीनमधला तुमचा अभिनय अतिशय उत्कट पण तितकाच संयमी वाटला. लेखकाने कल्पनेने निर्माण केलेली ही एक आगळी पण लोभसवाणी व्यक्तिरेखा तुम्ही प्रत्यक्षात साकार केलीत, सजीव केलीत आणि सामान्य प्रेक्षकांच्यापर्यंत नेऊन पोहोचवलीत. याबद्दल शतशः धन्यवाद. पुढील काळात अशाच उत्तमोत्तम भूमिका तुम्ही कराव्यात आणि ही लोकप्रियता तुम्हाला सतत मिळावी; हाच तुम्हाला आशीर्वाद.

तुमची,

**वहिनी**

'मला काही सांगायचंय'चे नाटककार खुद्द वसंत कानेटकर यांनी या नाटकाची पुस्तकप्रत डॉक्टरांना देताना त्यावर लिहिले—

To my Rahul

९-१-७० — **वसंत कानेटकर**

अफाट लोकप्रियता, प्रेक्षकांचे अमर्याद प्रेम ह्या अश्वावर स्वार झालेल्या डॉक्टरांना यशाचीही नशा यायला लागली. ती त्यांच्या दारूच्या नशेपेक्षाही जबर नशा होती. प्राणवायूइतकीच त्यांना ती आवश्यक होऊन बसली. गर्दी, वाहव्वा, कौतुक याशिवाय

जगणे डॉक्टरांना अशक्य होऊन बसले आणि ते त्यांना व्यावसायिक रंगभूमीवर भरभरून मिळत होते.

त्यामुळे चित्रपट, प्रायोगिक रंगभूमी *(ज्यातून डॉक्टर आले होते)* याकडे त्यांचे दुर्लक्ष होत गेले. कदाचित व्यावसायिक रंभभूमीसारखे अफाट यश या दोन्ही ठिकाणी मिळाले नाही, म्हणून तर डॉक्टरांनी या दोन्हीकडे दुर्लक्ष केले नसेल ना? मराठी चित्रपटांच्या बाबतीत फार तर म्हणता येईल की, त्या काळात मराठी चित्रपट तमाशा-चित्रपटांच्या विळख्यात इतका जखडला गेला होता की, डॉक्टरांसारखे सुशिक्षित, नागरी, ब्राह्मणी व्यक्तिमत्व त्यात सामावणे अशक्य होते आणि नंतर दादा कोंडके यांच्या चित्रपटांची लाट आली. मग तर डॉक्टर मराठी चित्रपटांपासून तुटतच गेले.

हिंदी चित्रपटसृष्टीतही त्या काळी मराठी नटांना शिरकाव करून घेणे फार फार कठीण होते. मराठी नायिका हिंदी चित्रपटसृष्टीत चांगल्याच स्थिरावत होत्या. पण मराठी नट नव्हते. अमोल पालेकरांनी ही वाट सुकर केली. पण तोवर मराठी नटांना कमी दर्जाचेच मानले जाई. थोडे अधिक प्रयत्न केले असते तर डॉक्टरांनाही तिथे पाय रोवणे शक्य झाले असते. पण चार-चार नाटकं, त्यांचे प्रयोग, दौरे यांत डॉक्टरांना ते शक्यही नव्हते आणि काम मागायला जाणे डॉक्टरांच्या वृत्तीत बसणारे नव्हते. हिंदीतील एक ख्यातनाम मराठी स्त्री कलाकाराने डॉक्टरांना तसा प्रयत्न करण्याची सूचना केली होती. डॉक्टरांनी मला ते सांगितले. पण मी त्या बाबतीत डॉक्टरांना अजिबात प्रोत्साहन दिले नाही. मलाही ते मंजूर नव्हते.

मात्र प्रायोगिक रंगभूमीला आपल्या अफाट लोकप्रियतेचा उपयोग डॉक्टरांनी करून द्यायला हवा होता, असं मात्र मला राहून राहून वाटतं. मुंबईमध्ये रंगायतन दुभंगल्यावर थंडावलेली ही चळवळ छबिलदासची चळवळ सुरू होईपर्यंत काहीशी रेंगाळल्यासारखी झाली होती. एखादे जरी प्रायोगिक नाटक डॉक्टर दर वर्षी करत राहिले असते, तर ह्याही नाटकांना शिवाजी मंदिरवर गर्दी खेचण्याचे सामर्थ्य डॉक्टरांच्यामध्ये नक्कीच होते. पण डॉक्टरांचा अभिनय आधुनिक नाट्यशास्त्राच्या नियमात बसणार नाही असे इथल्या जाणकारांचे मत होते. गॅलरीसाठी, टाळ्या घेण्यासाठी संमोहनशास्त्राचा *(अभिनयाचा नव्हे)* आधार घेणारा नट अशी एक तुच्छतेची भावना डॉक्टरांच्याबद्दल या जाणकार मंडळींत होती. त्यांची लोकप्रियता हा निव्वळ चमत्कार असं ही मंडळी मानायची आणि चमत्काराने सर्वसामान्य भुलतात, चकित होतात, बुद्धिवंत नाहीत, अशी ह्या मंडळींची भूमिका होती.

डॉक्टरांच्या बाबतीत म्हणाल तर ते नाटकात व्यावसायिक आणि प्रायोगिक असा


भेद करायला तयार नव्हते. चांगले नाटक, वाईट नाटक, चांगला अभिनय, वाईट अभिनय एवढाच फरक त्यांना मान्य होता. मूठभर इंटुकांच्यासाठी (इंटलेक्च्युअल्स) प्रयोग करणे त्यांना मंजूर नव्हते. नाटक प्रेक्षकांच्या काळजाला भिडलं पाहिजे तसं ते त्यांच्या मेंदूलाही समजलं पाहिजे, हा त्यांचा आग्रह होता. प्रेक्षकांच्या डोक्यावरून जाणारे नाटक करायचे आणि आपण फार मोठा प्रयोग करीत आहोत असा आव आणायचा, ह्या वृत्तीची डॉक्टरांना चीड होती. चाललं तर व्यावसायिक आणि आपटलं तर प्रायोगिक हे दुटप्पी वागणे त्यांना साफ नामंजूर होते.

डॉक्टर चित्रपटात फारसे यशस्वी झाले नाहीत असे म्हटले जाते. कदाचित डॉक्टरांनाही याची टोचणी कुठे तरी असावी. पण मला मात्र त्याचे वैषम्य कधीच वाटले नाही. नाटकात यशस्वी आणि चित्रपटात अयशस्वी ठरलेले डॉक्टर हे काही पहिले नट नव्हते. आपल्याकडेही अशी खूप उदाहरणे आहेत. इतकंच काय परदेशातही रिचर्ड बर्टनसारख्या मातब्बर रंगभूमी कलावंताचेही असे प्रमुख उदाहरण आहे.

ज्या कलावंतांना दोन्ही क्षेत्रांत सारखेच यश मिळविणे *(उदा. डॉ. श्रीराम लागू)* शक्य झाले त्यांचे कर्तृत्व निश्चितच वादातीत आहे. पण डॉक्टरांसारख्या ज्या अनेक कलावंतांना *(उदा. सतीश दुभाषी)* ते जमले नाही म्हणून त्यांच्या कलागुणात काही उणेपणा आहे, असे मानणे निश्चितच अयोग्य आहे आणि कदाचित डॉक्टर चित्रपटात यशस्वी ठरले असते, तर इतर काही मराठी नटांसारखे रंगभूमीला दुरावलेही असते. मग मराठी रंगभूमीला मिळालेल्या 'हाऊसफुल्ल' गर्दींच्या संजीवनीचे काय झाले असते?

'मला काही सांगायचंय' हे माझे आणि डॉक्टरांचे सर्वांत आवडते नाटक. डॉक्टर त्यात काम करत होते म्हणून नव्हे तर एकूणच आशय, आकृतिबंध या सर्वच दृष्टींनी इतके बंदिस्त मराठी नाटक फार क्वचित पाहायला मिळते. डॉक्टरांचे आणि माझे आणखी एक लाडके नाटक म्हणजे 'लेकुरे उंदड झाली.' कितीही वेळा पाहिले तरी आम्हाला त्या नाटकाचा कधी कंटाळा आला नाही. इरावतीबाईंना मात्र ते नाटक फारसं आवडलं नव्हतं. नाटकांच्यामध्ये व्यावसायिक, प्रायोगिक भेद डॉक्टर मानत नव्हते. तसेच कुठलेही नाटक पाहायला जाणेही ते निषिद्ध मानायचे नाहीत. 'गिधाडे'सारखे वादग्रस्त नाटक पाहायलाही आम्ही गेलो होतो.

◆




सुपरहिट मराठी चित्रपट
'आणि... डॉ. काशिनाथ घाणेकर'चे
प्रेरणास्थान असणारे पुस्तक
आणि...
डॉ. काशिनाथ घाणेकर
नाथ हा माझा...
कांचन काशिनाथ घाणेकर
समकालीन सिनेसृष्टीला भुरळ पाडणारं
असामान्य व्यक्तिचरित्र...
१०वी आवृत्ती
डॉ. काशिनाथ घाणेकर
यांच्या अनभिज्ञ पैलूंवर
प्रकाश टाकणारं पुस्तक...
किंमत ₹ ३९५
Book Available
कांचन काशिनाथ घाणेकर
नाथ हा माझा...

# पुस्तक परिचय



## अँजेलाज अॅशेस
### -ए मेमॉइर



फ्रॅन्क मॅक्कोर्ट यांचं मूळ नाव फ्रान्सिस मॅक्कोर्ट. ब्रुकलीन, न्यू यॉर्क इथे त्यांचा जन्म झाला. त्यांचं शिक्षण न्यू यॉर्क युनिव्हर्सिटी, ब्रुकलीन कॉलेज इथे झालं. ‘अँजेलाज अॅशेस’ हे त्यांचं पहिलं पुस्तक. ते प्रकाशित झालं तेव्हा फ्रॅन्क ६६ वर्षांचे होते.  त्यांनी अनेक वर्षे लेखनकौशल्य विकसित करण्याचे शिक्षक म्हणून काम केले. मलाची या आपल्या भावाबरोबर ते ‘कपलऑफ ब्लेगांर्ड्स या सांगीतिकेत काम करत.




लेखक
**फ्रॅन्क मॅक्कोर्ट**

अनुवाद
**गीतांजली वैशंपायन**

जागतिक मंदीच्या काळात फ्रॅन्क मॅक्कोर्टचा ब्रुकलीनमध्ये जन्म, लिमरिक इथल्या झोपडपट्टीत वास्तव्य आणि आयर्लंडमधले विस्थापित असण्याचे दिवस! नवरा मलाची दारूड्या असल्याने फ्रॅन्क मॅक्कोर्ट आई ॲन्जेला आणि तिच्या इतर मुलांची उपासमार होते. बेजबाबदार, तिरस्करणीय असा बाप मलाची आपल्या मुलाच्या- फ्रॅन्क मॅक्कोर्टच्या- मनात 'गोष्ट' या प्रकाराविषयी मात्र गोडी निर्माण करतो. फ्रॅन्क मॅक्कोर्टला दोन प्रकारच्या गोष्टींचं वेड लागतं-आयर्लंडच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान केलेला 'कुचुलेन' हा योद्धा आणि त्याच्या आईला दर वर्षी बाळ आणून देणारी 'सातव्या आसमानातली परी'!

फ्रॅन्क मॅक्कोर्टच्या विजिगीषू वृत्तीमुळे तो जगण्याची अतिशय अवघड लढाई जिंकतो. पाठचे बहीण-भाऊ अकाली मृत्युमुखी पडतात; पण हा वाचतो. तो लहान भावांना लंगोट म्हणून चिंध्या बांधतो, ख्रिसमस साजरा करण्यासाठी मेजवानी म्हणून डुकराचं डोकं मिळवण्यासाठी धडपडतो, रस्त्यावर पडलेले कोळशाचे तुकडे गोळा करून चूल पेटवतो. गरिबी, उपासमार, शेजाऱ्यांनी आणि नातेवाइकांनी पाठ फिरवलेली..इतकी अवहेलना कुणाच्या वाट्याला येऊ नये! पण हे अनुभव त्यानं नेमक्या शब्दांत, कोणताही कडवटपणा न येऊ देता, समंजसपणानं जगाला सांगितले.

वेडीवाकडी वळणं घेत आमची बस ज्या ठिकाणी पोचली ते एखादं शहर असावं. मोठमोठाली घरं, मोटारी, घोडागाड्या... बाप रे, पायी फिरणारे खूप लोक रस्त्यावर होते तिकडे. काही जण सायकलींवरही होते. मलाचीच्या अंगात एकदम उत्साह संचारला. ''डॅडी, खेळण्याचं मैदान आलं का? झोके कुठेत? मला फ्रेडी लिबोवित्झची आठवण येतेय.''

''अरे बेटा, आपण किनई डब्लिनमध्ये आहोत. क्लासन अ‍ॅव्हेन्यूतलं आपलं घर न्यूयॉर्कमध्ये आहे. आपण आता दुसऱ्या देशात आहोत आयर्लंडमध्ये. आपल्या घरापासून खूप दूर.'' डॅडींनी त्याला समजेल अशा भाषेत सांगितलं.

आमची बस स्टेशनमध्ये येऊन थांबली. टपावरची आमची ट्रंक खाली उतरवली. ''तू इथं बाकावर बस. ती तिकडे स्वच्छतागृहं आहेत. मुलांना नेऊन आण हवं तर. मी गावात जाऊन आय.आर.ए.च्या माणसाला भेटून येतो. टेरेन्यूर या भागात तो असतो. त्या माणसाचा पत्ता जवळच आहे. मी फ्रँकला बरोबर नेतो. पैसे मिळाले की आपण काहीतरी खाऊ या.'' मॉमला माझी सोबत हवी होती. ती मला जाऊ देईना. पैसे धरण्यासाठी मदतीला कुणीतरी लागेल, असं डॅडींनी तिला समजावलं. ती किंचित हसली.

''जा तुझ्या डॅडींबरोबर.'' ती हसून म्हणाली. डॅडींबरोबर म्हणजे चांगल्या मूडमध्ये. बापाबरोबर म्हटलं की नूर बिघडलेला आहे, असं समजायचं.

डॅडी भरभर चालत होते. मला फरपटत नेत होते. चालून चालून मी आता दमलो होतो. जुळ्यांसारखं त्यांनी मलाही कडेवर घ्यावं असं मला वाटलं. पण ते आपलं लांब लांब ढांगा टाकत चालत होते. पत्ता विचारण्यापुरते ते थांबायचे. पुन्हा चालणं सुरू. त्यांचं मुळी माझ्याकडे लक्षच नव्हतं.

अखेर एकदाचं आम्ही टेरेन्यूरमध्ये पोचलो. आता आम्हाला चार्ल्स हॅगार्थी या व्यक्तीला भेटायचं होतं. ते आय.आर.ए.चं काम बघत होते. ''तुम्ही योग्य रस्त्यावर आहात. ते चौदा नंबरच्या घरात राहतात.'' एका माणसानं आम्हाला हवी ती माहिती दिली. त्या वेळी तो अगदी देवदूतासमान भासला. त्यानं एक डोळा गुलाबी कापडानं झाकलेला होता.

''तुम्ही लढाईमध्ये भाग घेतलेला दिसतोय.'' ते डॅडींकडे पाहत म्हणाले.

''होय.''

''मीसुद्धा भाग घेतला होता. काय मिळालं त्या मोबदल्यात ठाऊक आहे? एक डोळा गमवावा लागला. पेन्शन मिळतं ते इतकं तुटपुंजं आहे की, कॅनेरी पक्ष्याचं पोटही त्यातून भरणार नाही.''

''पण आयर्लंड स्वतंत्र आहे हे काय कमी आहे?'' डॅडींनी त्यांची समजूत घातली.

''कसलं स्वातंत्र्य घेऊन बसलात? त्या ब्रिटिशांचा अंमल बरा होता असं म्हणायची वेळ आलीये. जाऊ दे, आपण हे काय बोलत बसलोय? तुम्ही कशासाठी आला आहात ते लक्षात आलंय माझ्या. तुमचं काम होऊ देत. तुम्हाला शुभेच्छा!''

एका स्त्रीनं दार उघडलं. ''ते फार कामात आहेत,'' ती म्हणाली.

''मी खूप लांबून- डब्लिनहून आलोय. हा मुलगा वणवण करत माझ्याबरोबर एवढं अंतर चालत आलाय. माझी बायको तीन लहानग्या मुलांना घेऊन बसस्थानकावर थांबलेली आहे. त्यांचं काम पुरं होऊ देत. आम्ही इथं पायऱ्यांवर त्यांची वाट बघत बसतो.'' डॅडी म्हणाले.

ती स्त्री आत गेली. क्षणभरानं परत येऊन म्हणाली, ''त्यांच्याजवळ फार कमी वेळ आहे. या बाजूनं या.'' चार्ल्स हॅगार्थी एका डेस्कसमोर काम करत बसले होते. जवळच विस्तव जळत होता.

''मी तुमच्यासाठी काय करू शकतो?'' त्यांनी विचारलं.

डॅडी त्यांच्यासमोर उभे राहिले. ''बायको आणि चार कच्ची-बच्ची यांना घेऊन मी नुकताच अमेरिकेतून परत आलोय. अगदी निष्कांचन अवस्थेत. मी फ्लाइंग कॉलम या पलटणीविरुद्ध लढलोय, हे लक्षात घेऊन आता माझ्या अडचणीच्या वेळी तुम्ही काहीतरी मदत करावी, अशी अपेक्षा आहे.''

त्यांनी डॅडींचं नाव लिहून घेतलं. त्या डेस्कमधून एक लांब वही बाहेर काढली. डॅडींचं नाव त्यांनी बराच वेळ त्यात शोधलं. मग वही बंद करून ते म्हणाले, ''नाही. अशी कोणतीही नोंद यात नाही.''

मग डॅडींनी त्यांना बरंच काही सुनावलं. ते कुठे, केव्हा आणि कसं लढले. त्यांना पकडण्यासाठी कसं इनाम लावलं होतं, त्यापायी त्यांना देश सोडून कसं परागंदा व्हावं लागलं, आयर्लंडमध्ये ते आता कसे हलाखीत एवढ्या मोठ्या संसाराचा गाडा ओढतायेत, इ.इ.

''तुम्ही म्हणता ते खरं असेलही. मला तुमच्याबद्दल सहानुभूती वाटते; पण खात्री केल्याशिवाय येणाऱ्या प्रत्येकाला मी पैसे देऊ शकत नाही.'' ते ठामपणे म्हणाले.

माझ्याकडे वळून डॅडी म्हणाले, ''बघितलंस फ्रान्सिस, हे लक्षात ठेव बरं. ही नव्या आयर्लंडची ओळख. खुर्चीत बसलेली माणसं ठरवणार कोण लढलं आणि कोण नाही ते. याच आयर्लंडसाठी लोकांनी प्राण दिले.''

''तुमच्या मुक्तिलढ्यातल्या सहभागाची मी चौकशी करीन आणि शक्य असेल तेवढी मदतही करीन.'' ते म्हणाले. परत जाण्यासाठी तिकिटापुरते पैसे देण्याची तयारी त्यांनी दाखवली.

त्यांनी पुढे केलेल्या पैशांकडे बघत डॅडी म्हणाले, ''यात आणखी थोडे पैसे घातले तर एक पिंट सहज येईल.''

''असंय तर! सगळी धावपळ दारूसाठी चालली होती तर?'' त्यांनी चिडून विचारलं.

''अहो, पिंट म्हणजे काही घुटके. त्याला दारू म्हणणं खरंतर चुकीचंच.''

''स्वतः दारू पिणार आणि या पोराला तंगडतोड करत नेणार, असंच ना?''

''चालण्यानं काही जीव जात नाही.''

''ताबडतोब पाय काढता घ्या इथून. नाहीतर पोलिसांना बोलवीन मी. पैशांची बात आता विसरा. असल्या दारूड्या लोकांना आम्ही कसलीही मदत करत नाही.'' त्यांनी दरडावून सांगितलं.

बाहेर चांगलाच अंधार पडलेला होता. दिव्यांच्या उजेडात रस्त्यावर मुलं खेळत होती. कुणाची आई हाक मारत होती. जेवणाची वेळ झाली होती ना! सगळीकडून अन्नाचा घमघमाट येत होता. काही ठिकाणी लोक टेबलाभोवती जेवताना दिसत होते. माझ्या पोटात कावळे ओरडत होते. चालण्याचं त्राण उरलेलं नव्हतं. पण डॅडींचा अवतार बघून त्यांना काही सांगण्याचा धीरच होईना. भूक लागली म्हणण्याची सोय नव्हती. कडेवर उचलून घ्या, असं म्हणण्याची तर नव्हतीच नव्हती. त्यांनी माझा हात घट्ट धरलेला होता. ते ओढत होते. मी पळत होतो.

आम्ही बसस्थानकावर पोचलो तेव्हा मॉमसकट सगळे जण झोपलेले होते. पैसे

मिळाले नाहीत हे समजताच मॉमनं कपाळाला हात लावला. ती मुसमुसायला लागली. तिला रडताना पाहून निळ्या गणवेषातला एक माणूस चौकशीसाठी आला. 'आम्ही इथे अडकलो आहोत. पैसे नाहीत, निवारा नाही, पोटात अन्नाचा कण नाही अशी अवस्था आहे,' डॅडींनी त्याला सांगितलं. तो कामावरून परत चालला होता. त्याच्याबरोबर पोलीस बराकीत चलण्याची विनंती त्यानं आम्हाला केली. आमची तिथं नोंद होणार होती. झाली तर काहीतरी सोयही...

आपण गार्ड आहोत, असं तो म्हणाला. तो आयर्लंडमधला पोलीस होता. अमेरिकेत पोलिसांना काय नावानं हाक मारतात असं त्यानं विचारलं. ''कॉप.'' हजरजबाबी मलाचीनं लगेच उत्तर दिलं. त्याला प्रेमानं थोपटत त्या गार्डनं मलाचीच्या-त्या गोड छोकऱ्याच्या हुशारीचं कौतुक केलं.

पोलीस बराकीमध्ये आम्हाला रात्रीपुरता आसरा मिळाला. मात्र खोल्यांमध्ये जागा नव्हती. तो गुरुवार होता. जे लोक मिळालेला निर्वाहभत्ता दारूत उडवतात आणि नशेमुळे घरीदेखील पोचू शकत नाहीत, त्यांना पबमधून इथं आणून ठेवलेलं होतं. बाहेर फरशीवर झोपवण्याबद्दल त्या गार्डनं दिलगिरी व्यक्त केली.

त्या लोकांनी आम्हाला मस्तपैकी गरमागरम चहा दिला आणि जॅम-बटर लावलेल्या ब्रेडच्या स्लाइसेससुद्धा. पोटात अन्न गेल्यावर आम्हाला तरतरी आली. आम्ही चक्क त्या बराकींमधून पळायला सुरुवात केली. ते सगळे गार्ड्स आमच्यावर खूश होते. त्यांनी आम्हाला घरी घेऊन जाण्याची तयारी दाखवली. मी नको म्हटलं, मलाची नको म्हणाला; जुळ्यांनीही नाही म्हटलं. त्यावर ते सगळे गार्ड्स हसले. बराकीमधल्या लोकांनी आम्हाला जवळ घेतलं, तेव्हा डॅडींनी जवळ घेतल्यावर येतो अगदी तस्सा वास आला. रात्री-अपरात्री डॅडी केविन बॅरे अथवा रॉडी मॅक्कोर्ले यांच्या बलिदानाची गाणी जोरजोरात म्हणत येतात तेव्हा असा वास त्यांच्या तोंडाला येतो. ते लोक काहीही बरळत होते.... आम्ही फिल्मस्टार्ससारखे दिसतोय, आम्ही आकाशातून पडलोय... आणखीही असंच काहीबाही. तिथल्या काही महिलांनी जवळ बोलावून सांगितलं की, मलाची खूप देखणा आहे. जुळ्यांना तर आकर्षक, गोडुले अशी बरीच विशेषणं मिळाली.

तिथल्या एका बाईनं मला जवळ बोलावून विचारलं, ''गोड आवडतं का?''

''हो.'' मी मान हलवली.

''हात पुढे कर,'' ती म्हणाली.

तिनं तिच्या तोंडातून लोण्यासारखं काहीतरी मऊ, चिकट पदार्थ काढला. ''खा,'' ती म्हणाली. काय करावं ते मला समजेना. शीऽ असं उष्टं, चिकट कसं काय खायचं? हो म्हणवेना, ना म्हणवेना. तेवढ्यात एक गार्ड तिथं आला. त्यानं तो पदार्थ तिच्या अंगावर फेकला. ''ए बेवडे, कशाला त्या लहान मुलाच्या नादी लागतेस.'' तो खेकसला. तिथल्या सगळ्या जणी फिदीफिदी हसल्या.

एका सार्जंटनं मॉमला ब्लँकेट दिलं. ते पांघरून ती एका बाकावर ऐसपैस झोपली. आम्ही सगळे खाली फरशीवर. डॅडी भिंतीला टेकून बसलेले. डोक्यावर कॅप. अधूनमधून सार्जंट त्यांना सिगारेट देत होते. डॅडी झुरके ओढत होते. ज्या सार्जंटनं तो चिकट पदार्थ खाण्यापासून माझी सुटका केला, तो उत्तरेकडच्या बेलिमेना प्रांतातला होता. डॅडींचे काही परिचित त्याच्या ओळखीचे निघाले. मग त्यांच्या गप्पा रंगल्या. कुशुंडेल आणि टुमेबद्दलही मग ते बोलत होते. तो सार्जंट लवकरच निवृत्त होणार होता. तो म्हणाला की, त्यानंतर तो लौघ नीघच्या काठी राहून मासेमारी करत आयुष्य घालवणार आहे. तिथं खूप मोठ्या प्रमाणात मासे मिळतात. अहा! तळलेला मासा. तो सांगताना अगदी रंगात आला होता. तेच तळं, तेच मासे, तीच आवड- मला वाटलं नक्कीच हा कुचुलेन असावा. मी डॅडींना तसं विचारलं. ते ऐकून त्या सार्जंटला जोरात हसू आलं. इतकं की त्याची हसून हसून मुरकुंडी वळली. ''बाप रे, हे मी काय करतोय? इतका लहान मुलगा अन् कुचुलेनबद्दल त्याला किती माहिती आहे, नवलच आहे!'' तो डॅडींना म्हणाला.

''बेटा, हे सद्गृहस्थ कुचुलेन नव्हेत; पण ते लौघ नीघच्या काठावर राहून मासेमारी करीत आयुष्य घालवणार आहेत. त्यामुळे ते भाग्यवान नक्कीच आहेत.'' डॅडी उद्गारले.

''चलो, उठो फ्रान्सिस, सकाळ झाली बघ.'' डॅडींच्या हाकेनं मी उठलो. बराकीत सगळीकडे गडबड होती. फरशी पुसणारा पोऱ्या गाणं म्हणत होता.

मला त्याचा राग आला. तो जे गाणं म्हणत होता ते गाणं माझी मॉम म्हणायची. तिचं गाणं असं दुसरं कोणीतरी म्हणताना बघून...

मी त्याला थांबवणार तितक्यात तो सिगारेटचा झुरका मारत निघून गेला.

काल रात्री पबमधून पकडून आणलेल्या स्त्री-पुरुषांना आज सोडलं होतं. कुणी हसत-खिदळत होतं. कुणी अजूनही बरळत होतं. त्यांच्यात मला तो चिकट पदार्थ देऊ केलेली बाई दिसली. तिनं मला हाक मारली. ती म्हणाली, ''मला माफ कर. काल मी

जरा दारूच्या अमलाखाली होते. तुझ्याबरोबर जरा मूर्खपणानंच वागले.''

तेवढ्यात तो कालचाच सार्जंट आला. ''ए बेवडे, जातेस की नाही मुकाट्यानं? की पुन्हा तुरुंगात टाकू तुला?'' त्यानं त्या बाईला दम भरला.

''आत-बाहेर. बाहेर-आत. कुणाला तुरुंगाची भीती दाखवतोस रे निळ्या माकडा?'' जाताना ती ओरडली.

मॉम ते रात्रीचं ब्लँकेट अंगाभोवती लपेटून बसलेली होती. एका मध्यम वयाच्या बाईनं चहाचा मग भरून आणला. ''काल तुम्हाला जे सार्जंट भेटले त्यांची मी बायको. त्यांनीच मला तुमच्याबद्दल सांगितलं. एखादं उकडलेलं अंडं खाणार का तुम्ही?'' तिने विचारलं.

''नको.'' मॉमनं मान हलवली.

''असं नाही म्हणून कसं चालेल? उकडलेलं अंडं खाल्लं की तुम्हाला जरा बरं वाटेल.'' त्या आग्रहानं म्हणाल्या.

पण मॉम नकारावर ठाम होती. मला तिच्या वागण्याचं नवलच वाटलं. अहा, उकडलेलं अंडं! जगात यापेक्षा चांगलं आणखी काय असू शकतं?

''ठीक आहे. निदान थोडे टोस्ट तरी खा. मुलं आणि त्यांचे वडील यांच्यासाठी मी काहीतरी घेऊन येते.''

आतल्या खोलीतून ती चहा आणि ब्रेड घेऊन आली. डॅडींनी चहा तेवढा घेतला. सगळा ब्रेड त्यांनी आम्हाला दिला.

''थोडासा ब्रेड खा. अहो, तुम्ही असं भुकेलं राहिलात अन् भोवळ येऊन पडलात तर मी आणि मुलांनी कुणाकडे पाहायचं?'' मॉमच्या विनवणीकडे डॅडींनी दुर्लक्ष केलं. त्या बाईंकडे त्यांनी सिगारेटबद्दल विचारणा केली. तिनं आतून सिगारेट आणून दिली. मॉमजवळ जाऊन तिनं सांगितलं की, त्या बराकीतल्या सगळ्या सार्जंट्सनी वर्गणी गोळा केली आहे. ते तुम्हाला लिमरिकपर्यंतचं तिकीट काढून देणार आहेत. मोटारीमधून तुम्हाला तुमच्या ट्रंकसकट किंग्सब्रिज रेल्वे स्टेशनपर्यंत पोचवण्यात येईल. तिथून लिमरिक म्हणजे फार तर तीन ते चार तासांचा प्रवास.

आनंदानं मॉमनं त्या बाईंना मिठीच मारली. ''बाई, तुम्ही, तुमचा नवरा, इथल्या सगळ्यांचंच मोठं ऋण आहे आमच्यावर. तुम्ही भेटला नसता तर आमचे हाल

कुत्र्यानंदेखील खाल्ले नसते. अगदी आपल्या माणसांसारखं मदतीला धावून आलात तुम्ही.'' तिला बोलवेना.

''अहो, आम्ही फार काही केलं नाही. ही सोन्यासारखी गोजिरवाणी लेकरं... यांच्यासाठी नको का करायला? मी कॉकची. गाठीशी पैसा नसताना डब्लिनसारख्या ठिकाणी निभाव लागणं किती अवघड याची कल्पना आहे मला.'' त्या म्हणाल्या.

डॅडी बाकाच्या एका टोकाला बसून सिगारेट ओढत होते. ''आपली मोटार डब्लिनच्या रस्त्यानंच जाणार ना?'' त्यांनी ड्रायव्हरला विचारलं.

तो 'हो' म्हणाला.

''मग जनरल पोस्ट ऑफिसजवळून चलणार का जरा?''

''का बरं, तुम्हाला पोस्टाची तिकिटं विकत घ्यायची आहेत का?''

''नाही. मी असं ऐकलंय की तिथं कुचुलेनचा नवा पुतळा उभारला आहे. १९१६ मध्ये जे हुतात्मा झाले, त्यांच्या स्मृतीनिमित्त. माझा हा लेक कुचुलेनचा भक्त आहे. त्याला जरा पुतळा दाखवता येईल.''

कुचुलेनबद्दल त्या ड्रायव्हरला माहिती नव्हती. पण पुतळा बघायला त्याची काही हरकत नव्हती. त्यालाही मग या प्रकाराबद्दल उत्सुकता वाटली. त्याच्याजवळ वेगळी माहिती होती. तो लहान असतानाची ही गोष्ट. ब्रिटिशांनी अगदी लांबवरून-लिफी नदीच्या पात्रातून गोळीबार केला होता. त्यापायी त्या इमारतीची अक्षरशः चाळण झालेली. त्यानंतर तो आजवर कधी तिकडे फिरकला नव्हता. त्या अत्याचाराची आठवण म्हणून इमारतीवरच्या गोळीबाराच्या खुणा तशाच ठेवल्या आहेत, असंही तो म्हणाला. 'अत्याचार' शब्दाचा अर्थ मी त्याला विचारला तेव्हा त्यानं डॅडींकडे बोट दाखवलं. ते काही बोलण्यापूर्वीच आमची गाडी थांबली. एका भव्य इमारतीसमोर आम्ही उभे होतो.

आम्ही सगळे ड्रायव्हरच्या पाठोपाठ निघालो. मॉम मोटारीतच थांबली. ''तो पाहा पुतळा.'' ड्रायव्हरनं दाखवलं.

एका स्तंभावर कुचुलेनचा पुतळा होता. खांद्यावर रुळणारे लांब केस, मान कलंडलेली. सोनेरी रंगाचा होता तो पुतळा. त्याच्या खांद्यावर एक पक्षी बसलेला होता. कुचुलेन... आजवर डॅडींकडून खूप ऐकलं होतं. आज पुतळा पाहिला. माझ्या डोळ्यांतून घळघळा अश्रू वाहू लागले.

''हाच ना तो तुम्हाला हवा असलेला पुतळा? त्या माणसाचे केस इतके लांब का आहेत? तो पक्षी तिथं बसून काय करतोय? या माणसाचा आणि १९१६ च्या हुतात्म्यांचा काय संबंध?'' ड्रायव्हरनं विचारलं.

''कुचुलेन फार पराक्रमी होता. त्याच्या शत्रूंवरती त्याच्या पराक्रमाचा इतका प्रभाव होता की, तो मेल्यावरही कुणी जवळ जायला तयार नव्हतं. जेव्हा एका पक्ष्यानं त्याच्या खांद्यावर बसून त्याचं रक्त प्यायलं तेव्हा सगळ्यांची खात्री झाली की तो मेलेला आहे.'' डॅडी गौरवानं म्हणाले.

''अरेरे, एखादी व्यक्ती मेलेली आहे हे कळण्यासाठी इथल्या सैनिकांना लहानशा पक्ष्याची मदत घ्यावी लागते, हे या देशाचं दुर्दैवच!'' तो ड्रायव्हर खेदानं म्हणाला, ''चला, आता निघायला हवं. नाहीतर तुमची लिमरिकची ट्रेन चुकेल.''

◆


## टी बुक क्लब

**या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक!**

चालू बुक क्लबचे सभासदत्व ₹ ५० भरून घेता येते. या क्लबअंतर्गत दरवर्षी गाजलेल्या सहा इंग्रजी पुस्तकांचे अनुवाद प्रकाशित केले जातात. सभासदांना ही पुस्तके निम्म्या किमतीत मिळतात. पुस्तके प्रकाशित होताच आपणांस त्यासंबंधीची माहिती कळवली जाते.

**ही सर्व सहाही पुस्तके घेणे आपल्यावर बंधनकारक राहील.**

या सहा पुस्तकांपुरती ही सभासद फी मर्यादित राहील. या क्लबच्या सभासदांना आमच्या प्रकाशनाची इतर पुस्तके सवलतीत मिळतील.

**टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स' साठी खास सवलत!**

₹ १०० भरून उपलब्ध असलेली कोणतीही आठ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त




# नागासाकी

## निरपराध अज्ञातांचा निरंकुश संहार

क्रेग कोली हे एक सुप्रसिद्ध दूरचित्रवाणी निर्माता आणि दिग्दर्शक आहेत. 'एबीसी' टीव्हीसाठी ते 'फोर कार्नर्स' आणि 'द बिग कंट्री' हे कार्यक्रम करतात. नुकतेच त्यांनी प्रॉडक्शन एक्झिक्युटिव्ह (कार्यकारी उत्पादक) म्हणून ऑस्ट्रेलिया फिल्म, टीव्ही आणि रेडिओसाठी काम केले आहे. 'एसबीएस'मध्ये प्रॉडक्शनचे प्रमुख म्हणूनही काम पाहिले आहे. 'द पाथ ऑफ इन्फिनिट सॉरो' या जपानी दृष्टिकोनातून लिहिलेल्या 'कोकोडा' कथेचे ते सहलेखक आहेत.






लेखक

**क्रेग कोली**

अनुवाद

**डॉ. जयश्री गोडसे**

*हिरोशिमा बॉम्बमुळे झालेला संहार खूप भयानक होता आणि असे असूनही बातम्या देण्यासाठी वृत्तपत्रांवर बंदी होती; त्यामुळे त्या शहरावर प्रत्यक्ष काय गुदरले आहे, हे फारसे कोणालाच माहीत नव्हते. फक्त जे थोडे जिवंत राहिले त्यांनी सांगितलेल्या गोष्टी कल्पनेच्या पलीकडल्या वाटल्या; त्यामुळे त्यावर विश्वासच ठेवला गेला नाही. जपानव्यतिरिक्त इतर कोणीही कल्पना केली नव्हती की, अमेरिका आता दुसरा बॉम्ब तकोकुरा शहराच्या शस्त्रास्त्र कारखान्यावर टाकणार आहे, याहीपेक्षा भयानक म्हणजे युद्धकाळात चालणाऱ्या राजकारणावर या घटनेबाबत आणखी भयानक परिणाम झाले.*

*या मनाचा अति ठाव घेणाऱ्या कथेत वृत्तान्त आहे, प्रत्यक्षदर्शींच्या मुलाखती आहेत, डायऱ्यांचा आधार आहे. पत्र, मुलाखती आहेत. क्रेग कोली यांनी या भयानक विध्वंसाची कथा अनेक पातळ्यांवर लिहून त्या भयंकर दिवसांचे यथार्थ दर्शन घडविले आहे. ८० हजार लोकांचा मृत्यू हे त्या अणुबॉम्बस्फोटांचे तात्पर्य होते. ते जणू प्रत्यक्ष बघतो आहोत असे वाटते. संपूर्ण जगच त्या घटनेनंतर बदलले आणि त्याच्या ज्या शॉकवेव्ह्ज आहेत त्या अगदी आज, वर्तमानातसुद्धा पसरत आहेत आणि यातून आपण अणुशक्तीची काय ताकद आहे, हे समजून घेण्याचा प्रयत्न करत राहतो.*

आपल्या लहान मुलीला, नओमीला आपल्यासमोर खाली घेऊन, तिला पाठीवर बांधण्यासाठी पट्टे बांधत असताना चियोको इगाशिरा यांनी कानठळ्या बसणारा आवाज ऐकला आणि त्याचबरोबर पाठीत खूप असह्य वेदना आणि जणू कोणी आपल्या शरीरावरील मांस ओरबाडून काढत आहे असे तिला वाटले. त्या स्फोटाच्या केंद्रापासून फक्त ५०० मीटर दूर असल्यामुळे- इतक्या जवळच्या अंतरावरून चियोको यांना तो प्रकाशाचा लोळ दिसला नव्हता. शाळेच्या इमारतीतील आतील भाग पूर्ण उखडून पडला होता. शिरोयामा प्राथमिक शाळेचा फक्त काँक्रीटमध्ये बांधलेला सांगाडा उरला होता. बाकी संपूर्ण नष्ट झाले होते. आता शाळेची इमारत कोसळणार हे गृहीत धरून चियोकोने नओमीला आपल्या शरीराच्या आडोशाने हातातच उचलून रांगत रांगत त्या शाळेच्या दवाखान्याचे जे काही अवशेष उरले होते तेथून बाहेर आल्या. नओमीच्या डोक्यावरचे केस ताठ उभे होते. तिच्या भुवया जळाल्या होत्या. पिवळसर माती संपूर्ण शरीरावर पसरली होती तरी ती गप्प होती. त्या धुळकट चेहऱ्यातून तिचे कोणतीही भावना नसलेले डोळे बघत होते.

कार्यालयात त्याच्या उलट्या पडलेल्या टेबलाजवळून मुख्याध्यापक उठला आणि खोलीतून बाहेर पडला, हे चियोको यांनी बघितले. त्यांनी मदतीसाठी हाक मारायचा प्रयत्न केला; पण त्यांच्या तोंडून आवाजच फुटला नाही. जवळच कुठेतरी एक पुरुष शिक्षक मुख्याध्यापकासाठी ओरडत होता. चियोको यांनी स्वतःच घराकडे जाण्याचा प्रयत्न करण्याचे ठरविले. जेव्हा त्यांनी खिडकीतून बाहेर बघितले तेव्हा त्यांना सगळीकडे फक्त पिवळा धूर दिसला. हॉलमध्ये आल्यावर त्यांना वर्गांच्या खोल्या असलेली बाजू कोसळलेली दिसली. शाळेच्या ज्या भागात हा दवाखाना होता तो भाग त्या स्फोटातून वाचला होता. नवोमीला आत नेऊन झोपवण्याच्या ताकाहाशींच्या सूचनेमुळे या मायलेकीचा जीव वाचला होता.

शाळेच्या पुढच्या दरवाजापाशी असलेले सिमेंटचे खांब मुळापासून उचकटले जाऊन शाळेच्या इमारतीजवळ फेकले गेले होते. त्या काँक्रीटच्या तळाशी मातीसुद्धा तशीच चिकटलेली होती. शाळेतील चिनाबेरी आणि चेरीची झाडे उन्मळून पडली होती. एक कर्मचारी श्रीमती इगाशिरांकडे एक बॅग घेऊन आला. पण त्याने तिला बघितले होते असे वाटले नाही. जणूकाही तो झोपेत चालत होता.

चियोको घाबरल्या आणि नओमीला घेऊन दवाखान्याच्या स्फोटातून बचावलेल्या खोलीत परत आल्या. स्फोटामुळे दवाखान्याच्या फुटलेल्या काचांनी

आपली स्वतःची पाठ भरली आहे याचे तिला भानच नव्हते. घराच्या दिशेने बघताना आता त्यांना फक्त ज्वालांचा समुद्रच दिसत होता. शिरोयामावरची पिवळी धूळ खाली बसली होती; पण आता ती पेटली होती. एक अतिशय भयानक लाल ज्वाला असलेली आग भराभर पसरत होती. ती कुठपर्यंत जाणार होती कोण जाणे! आता या शिक्षिकेपाशी कोणतेही पर्याय नव्हते आणि पुढे काय करायचे याची काही कल्पनाही नव्हती. आपल्या मुलीला खूप जवळ घेऊन न पडलेल्या त्या खोलीच्या कोपऱ्यात त्या बसल्या.

***

'फॅट मॅन' हे लोकशाही तत्त्व पाळणारे शस्त्र असावे; कारण चांगले, वाईट, कुरूप आणि सर्वसामान्य यांना समान तत्त्वाने, कोणताही फरक न करता, त्याने नष्ट केले होते. या स्फोटाच्या केंद्राच्या एक किलोमीटर परिसरातील कोणीही ज्याच्या अंगावर काही आवरण नाही त्याचे तर क्षणात वाफेत रूपांतर होऊन राख झाली होती...अंत्यसंस्कारानंतर होते तशी!

युराकामी कॅथेड्रलचे मुख्य धर्मगुरू फादर निशिदा आणि कुरोशिमाचे धर्मगुरू फादर तमाया, ज्यांनी आपले प्रयाण लांबविले होते ते दोघेही, बॉम्ब जेव्हा नागासाकीवर असलेल्या ढगांच्या फटीतून खाली पडला तेव्हा 'पापांची कबुली' ऐकत होते. जवळजवळ वीस श्रद्धाळू लोक अगदी शिस्तीत रांगेत उभे होते. बॉम्बचा स्फोट होताच क्षणार्धात ते मेले. हे अंतरसुद्धा स्फोटाच्या केंद्रापासून शिरोयामी प्राथमिक शाळेइतकेच होते.

रोमन धर्मीयांची ही इमारत मजबूत दिसत होती. पण कॅथेड्रल काय किंवा पापाची कबुली जिथे दिली जात होती तेथील जाड पडदा काय- कशामुळेच आत असलेल्यांचे प्राण वाचू शकले नाहीत. शाळेच्या इमारतीप्रमाणे या इमारतीत मजबूत काँक्रीट वापरलेले नव्हते. स्फोटामुळे पायाच्या वर विटा आणि लाकडे यांचा निव्वळ ढीग तयार झाला. इमारतीचा दर्शनी भाग आणि काही पुढे आलेला बट्रेसेसचा भाग वाचला. मजबूत काँक्रीटची चौकट केलेले दोन घुमटही जमीनदोस्त झाले. कोसळलेले घुमट त्या ढिगांवर जणू बाउलर हॅटप्रमाणे दिसत होते. कॅथेड्रलची घंटा जळून तिला तडे गेले होते आणि पडझड झालेल्या इमारतीच्या बाजूला ती पडली होती.

बॉम्बस्फोटाच्या केंद्राजवळच इतर इमारतींपासून दूर पण तरीही जवळ

असलेली युराकामी तुरुंगाची इमारत आणि तेथील युद्धकैदी यांची परिस्थितीसुद्धा कॅथेड्रलमधील लोकांपेक्षा वेगळी नव्हती. 'फॅट मॅन'चा जेथे प्रत्यक्ष स्फोट झाला त्याच्या खाली ३०० मीटर अंतरावर या तुरुंगाच्या तीन इमारती होत्या. त्या सेकंदाच्या पेक्षाही कमी वेळात नष्ट झाल्या. पण ज्या काँक्रीटच्या पायावर त्या उभ्या होत्या तो तेवढा टिकला. पण त्याला भेगा पडून पोपडे आले. त्या पायावर आता तुरुंगाच्या इमारतींचा सांगाडा उभा होता.

तुरुंगामध्ये असलेल्या सगळ्यांची जळून राख झाली. यात ९५ मोठे गंभीर गुन्हे केलेले कैदी होते, ज्यांना कामासाठी बाहेर पाठविले जायचे नाही, आणि ज्यांना तुरुंगात बॉम्ब पडणार नाही, असे वाटत होते. शिवाय १५ रक्षक व त्यांची कुटुंबे आणि तुरुंगाचे वॉर्डन मिनामींची बायको आणि लहान मुलगी यांचा यात समावेश होता.

रूट नं. २०६ वर चालणाऱ्या विजेवरील ट्राम नष्ट झाल्या. काहींचा तर अगदी ओळखता न येण्याजोगा गोळा झाला होता. त्यातील प्रवासी व कर्मचारी यांचे नावनिशाण उरले नव्हते. या ठिकाणी स्वयंसेवक ड्रायव्हर कोइची वाडा असू शकला असता; पण त्याच सकाळी एक ट्राम रूळांवरून घसरली होती म्हणून तो तिथे नव्हता. त्याच वेळेस युराकामी स्टेशनमध्ये एक ट्रेन आत येत होती; पण त्या महाशक्तिशाली स्फोटापुढे काही चालले नाही. त्यातील कोणीही वाचले नाही. फक्त ट्रेनचा सांगाडा शिल्लक होता.

***

नागासाकी मेडिकल कॉलेजच्या रुग्णालयातील डॉ. ताकाशी नागाई दुसऱ्या मजल्यावरच्या खोलीत वर्गाच्या प्रात्यक्षिकाकरता एक्स-रे फिल्म शोधत असताना त्यांना तो डोळे दिपवून टाकणारा प्रकाशाचा झोत दिसला. शाळेच्या मुख्य दरवाजाच्या वर बॉम्ब पडला असेल असे त्यांना वाटले. नेहमी त्यांनी अशा वेळी काय करायचे त्याचा सराव केलेला होता. त्याप्रमाणे ते स्वतःला जमिनीवर आडवे पाडणार तेवढ्यात त्यांच्या खोलीतील खिडकीची काच फुटून आतल्या बाजूला पडली. त्या खिडकीतून घुसलेला वाऱ्याचा झोत एवढा वादळी होता की ते उंच फेकले गेले. फुटलेल्या काचा, लाकडाचे कपचे, कापडाचे तुकडे हे सगळे या वादळात भिरभिरत होते. त्यांच्या चेहऱ्याचा उजवा भाग कापला गेला. लाल उष्ण रक्त त्यांच्या गालावरून वाहत गळ्यापर्यंत आले. त्यांना कोणतीच वेदना जाणवत नव्हती, होता एक सुन्न करून टाकणारा गोंधळ.

त्या सगळ्यात भर पडली ती फर्निचर, पुस्तके, स्टील हेल्मेट, बूट यांची. सगळेच त्या वावटळीत इकडेतिकडे फेकले गेले आणि मग जणूकाही वेड लागलेला एखादा महाकाय प्राणी शांत व्हावा तशी वावटळ थांबली आणि थांबताना खाली पडलेल्या डॉक्टरवर व आजूबाजूला ढीग झाले. धूळ असलेला वारा नाकात शिरला. त्याने श्वास घेणे कठीण झाले होते. समुद्रावर वादळ घोंघावत यावे तसा सतत आवाज येत होता आणि सूर्यप्रकाश अगदी क्षीण झाला होता. त्या अंधारात त्याला धुराचा वास येत होता आणि मध्ये कुठेतरी भडकलेल्या आगीच्या ज्वालांचा चुटचुट असा आवाज येत होता. डाव्या डोळ्यात काही आकार दिसू लागले. पण उजव्या डोळ्यात कपाळावरच्या जखमेमुळे रक्त ठिबकत होते.

टेनिसच्या मैदानाजवळ झालेल्या त्या स्फोटाच्या केंद्रापासून कॉलेजचा परिसर ४०० ते ८०० मीटरपर्यंत पसरला होता. मेडिसिनचे प्राथमिक वर्ग लाकडी होते आणि ते स्फोटाच्या जवळ होते. ते सर्व नष्ट होऊन जळायला लागले होते. त्या वर्गांमधील शिक्षक आणि विद्यार्थी एका क्षणात ठार झाले होते. पिका-डॉन या शब्दातील डॉन ऐकायला ते जिवंत राहू शकले नव्हते. मजबूत काँक्रीटच्या इमारती मात्र या स्फोटाच्या धक्क्यातून वाचल्या. त्या क्लिनिकल मेडिसिनच्या होत्या. त्यात असणाऱ्या लोकांना त्यामुळे जगण्याची संधी मिळाली; पण तीही थोडी. रेडिऑलॉजीच्या आजारी प्रमुखांना एवढ्यात काही चांगली बातमी मिळाली नव्हती; पण आज मात्र ते नशीबवान ठरले.

आपल्या उद्ध्वस्त कार्यालयात डॉ. नागाईंनी स्वतःचे शरीर हलवण्याचा प्रयत्न केला; पण त्यांच्यावर इतर वस्तूंचा ढिगारा होता. आपल्या अंगावर काय आहे हे त्यांना दिसत नव्हते आणि काचेचे तुकडे कुठे पडले आहेत तेही कळत नव्हते. खांदा थोडा हलवल्यावर काहीतरी पडले आणि क्षणभर ते घाबरले; पण बाकी काही हलले नाही. क्षीण आवाजात 'मदत करा, मदत करा' असे ओरडू लागले.

१७ वर्षीय, बुटकी आणि मजबूत बांध्याची परिचारिका हाशिमोतो एक्स-रे खोलीत बाजूला होती. स्फोटाच्या वेळेला पुस्तकाचे एक मजबूत कपाट आणि भिंत यांच्यामध्ये ती उभी होती. जेव्हा हा भयानक स्फोट झाला तेव्हा विश्वास बसणार नाही अशा भयावह परिस्थितीत तिने वस्तू, धूळ आणि धूर खोलीत घुसताना बघितला. ती वावटळ थोडी बसली आणि कोणतीही जखम न होता जमिनीवर जमा झालेला तो ढिगारा ओलांडून त्यावरून एका खिडकीच्या रिकाम्या फ्रेमकडे गेली. नेहमी दिसणारी जांभळ्या रंगाच्या फरश्या असलेली, हॉस्पिटलच्या खाली

असलेली घरे नाहीशी झाली होती. नदीच्या काठावर असलेले स्टील आणि शस्त्रास्त्राचे कारखाने भुईसपाट झाले होते. त्यातून पांढरा धूर बाहेर येत होता आणि तो आकाशात जो एक धुराचा स्तंभ तयार होत होता त्याकडे खेचला जात होता. हा स्तंभ खोऱ्याच्या वरच्या बाजूला दिसत होता. माउंट इनासाचे जे उतारावरचे भाग एरवी झाडीमुळे छान हिरवेगार दिसत, ते आता पूर्णपणे उघडेबोडके होऊन त्यातून लाल दगड दिसत होते. झाडांना फुटलेली पालवी पार जळून गेली. गवताचे पातेसुद्धा दिसत नव्हते.

थोड्या वेळापूर्वी खालच्या चौकात, मुख्य दरवाजापाशी गर्दी जमली होती. पण आता नग्न आणि जखमांनी भरलेले मृतदेह सगळीकडे विखुरलेले या तरुण मुलीने बघितले. जवळपासच्या झाडाझुडपांच्या उखडलेल्या जागेत ते अडकून पडले होते. परिचारिका हाशिमोतोने आपले डोळे बंद केले आणि दोन्ही हातांत तोंड लपवले.

''हा तर नरक आहे!'' ती स्वतःशीच पुटपुटली.

शांतता आणि अंधार यामुळे दिवसाची वेळ कळतच नव्हती. आपण एकटेच या जगात जिवंत आहोत की काय, अशी भावना मनात दाटून येऊन तिला रडू फुटले. तेवढ्यात तिला अगदी दयेची याचना करत असलेला आवाज ऐकू आला. तिने पुन्हा ऐकायचा प्रयत्न केला आणि पुन्हा तो आवाज ऐकू आला.

''मदत करा मला!''

डॉ. नागाईंचा आवाज तिने ओळखला आणि कुठून आला तेही तिला समजले. ती स्वतःसाठी वाट शोधण्याचा प्रयत्न करू लागली; पण त्यात यश आले नाही. दुसऱ्या खोलीत चक्काचूर झालेल्या एक्स-रे मशिनच्या वायरी एकमेकीत अडकल्या होत्या. या तरुण परिचारिकेच्या लक्षात आले की, या मलब्याच्या एवढ्या ढिगाऱ्यातून तिला एकटीला जाता येणार नाही. म्हणून आणखी मदत मिळते का ते बघायला ती गेली.

अंधाऱ्या कॉरिडॉरमधून आपली वाट शोधत ती काहीतरी ओलसर आणि चिकट वस्तूजवळ येऊन थडकली. एका रक्ताळलेल्या हाताच्या कातडीवरून हात फिरवत तिने नाडी आहे का ते बघायचा प्रयत्न केला. पण नाडी लागत नव्हती. त्या चिकट हातांना जोडून तिने छोटी प्रार्थना म्हटली आणि पुन्हा त्या पॅसेजमधून धडपडत पुढे जाऊ लागली.

एका तुटलेल्या खिडकीतून आग बाहेर झेपावत होती. त्याचा लालभडक प्रकाश कॉरिडॉरमध्ये पडत होता. त्यात स्टाफची आणि रुग्णाची मृत शरीरे दिसत होती. काही गुडघ्यावर बसलेले होते. काही हवेतून काहीतरी धरायचा प्रयत्न करत होते आणि त्याच स्थितीत मृत पावले होते. या सगळ्या लोकांना ती केवळ ओळखतच नव्हती तर चांगले ओळखत होती. पण आता त्यांच्याकडे बघण्याची तिची हिंमत होत नव्हती. ते तिथे मृतावस्थेत आहेत हे ठाऊक असल्याचे दडपण भयावह होते.

परिचारिका हाशिमोतोने आता रुग्णतपासणी होत असे त्या खोलीकडे मोर्चा वळविला. एक्स-रे स्क्रीनिंग करणारे पाच कर्मचारी तेथे दडून बसले होते. या धक्क्याने ते हालचाल करत नव्हते; पण ते जखमी झालेले नव्हते. या तरुण परिचारिकेने त्यांना प्रोत्साहित केले आणि डॉ. नागाईंना मदत करण्यासाठी नेले.

त्यांच्या खोलीत पडलेल्या वस्तूंच्या ढिगाऱ्यातून वाट काढता येणे शक्य नाही म्हटल्यावर त्यांनी वेगळी शक्कल लढविली. बाहेरून त्यांच्या खोलीच्या उघड्या खिडकीजवळ एकाच्या खांद्यावर दुसरा उभा राहिला आणि अशी एक शिडी तयार करून त्यांनी दोन परिचारिकांना त्या खिडकीतून आत जायला मदत केली. इमारतीत इतर ठिकाणी आग लागण्याची शक्यता होती. परिचारिकांनी डॉ. नागाईंवर पडलेले तुटलेले लाकडाचे ओंडके दूर केले. त्यांच्या हाताला मोठी जखम झाली होती. पण शरीराच्या इतर अवयवांना फारशी इजा पोचली नव्हती. अर्थात त्यांना आधीचा आजार होताच. चीनमधील युद्धाच्या अनुभवातून ते शांत राहायला शिकले होते. या दोन स्त्रिया जशा आत आल्या होत्या त्याच रस्त्याने त्यांनी डॉक्टरांना बाहेर काढले.

मेडिकल कॉलेजच्या मागे असलेल्या फार्मसी विभागाच्याही मागे प्रोफेसर सेइकी आणि विद्यार्थी एक नवीन सुरक्षा खंदक खणत होते. स्फोटाने जो प्रकाश निर्माण झाला त्यामुळे आतला भाग प्रकाशित झाला आणि मग तो प्रचंड एखाद्या वन्य प्राण्याच्या डरकाळीसारखा आवाज येऊन स्फोट झाला. त्या बोगद्याच्या तोंडाशी खणत असलेला त्सुनिओ तोमिता आतल्या बाजूला खेचला गेला. तेथे सेइकी आपल्या कुदळीवर पडले होते. त्या विद्यार्थ्याच्या मागून लाकडे, कपडे, तुटलेल्या टाइल्स हवेच्या दाबामुळे आत भिरकावल्या गेल्या. लाकडाचा एक मोठा तुकडा सेइकींच्या डोक्याच्या मागे येऊन आदळला आणि शुद्ध जाऊन तो एवढा मोठा माणूस धाडकन चिखलात पडला.

जेव्हा ते शुद्धीवर आले तेव्हा त्या बोगद्यात धूर आणि ज्वाला शिरू लागल्या होत्या. उष्ण हवा आत येत होती. तोमितो स्वतःला सावरत होता. त्याला धक्का बसला होता; पण तो खूप गंभीररीत्या जखमी झालेला नव्हता. त्या बोगद्याचा पुढचा भाग ढासळला होता. पण एका फटीतून प्रकाश आत येत होता. त्यावरून तेथे पडलेल्या मातीच्या ढिगाच्या वर बाहेर जायचा रस्ता आहे, हे कळत होते. दोघेही त्यातून बाहेर पडले.

बाहेरचे दृश्य सर्व काही अनोळखी वाटत होते. त्या सुरक्षा खंदकाच्या जवळ असणारी घरे आणि त्यांची कुंपणे आता तेथे नव्हती. टेकडीचा जो उताराचा भाग त्या सुरक्षा खंदकाच्या तोंडापर्यंत पोचायचा तो पूर्वी हिरवा होता; आता फक्त तपकिरी रंगाची माती होती. सेइकी आणि तोमितो यांना सर्व काही गिळंकृत करत जाणारी आगच समोर दिसत होती. आधीचा ओळखीचा परिसर ज्वालांच्या भक्ष्यस्थानी पडत होता. त्याच्या अगदी समोर काही विद्यार्थ्यांची मृत शरीरे, तर काही जवळजवळ मृतावस्थेत पडली होती. ते सर्व त्या सुरक्षा खंदकाच्या कामासाठी आले होते; पण मध्ये सुटी मिळाल्यामुळे थोडे बाहेर आले होते. ओकामोतो सर्वांत जवळ होता. तोमितोने त्याला त्याच्या खांद्यांना धरून उचलण्याचा प्रयत्न केला; पण त्याचे मांस झडले आणि तो परत जमिनीवर पडला. मुरायामा त्याच्याच बाजूला वेदनेने कळवळत होता. तोमिताने आपल्या या मित्राला ओळखलेच नाही. प्रोफेसरनी त्याला वर उचलले तेव्हा त्याची कातडी सर्व बाजूंनी गळून पडत होती. मुरायामा बाजूला लुडकला आणि मेला. अराकी एखाद्या भोपळ्यासारखा फुगला होता. त्याने त्याचे डोळे थोडे उघडले आणि म्हणाला, ''माझा शेवट जवळ आला आहे.''

जे मरणपंथावर आणि मृत होते त्यांच्या कानातून, नाकातून रक्त वाहत होते. इतरांच्या तोंडातून फेसाळ रक्त बाहेर पडत होते. तोमितो त्यांच्यात हिंडून त्यांना पाणी देऊ लागला. त्यांना तुम्ही वाचाल अशी आशा दाखवू लागला. पण काही वेळानंतर सेइकी आणि तो असे दोघेच जिवंत राहिले होते. जवळजवळ २० मृतदेह त्यांच्या आजूबाजूला होते.

प्रोफेसर कळवळून ओरडले, ''कुणीतरी या आणि मदत करा.''

◆

नवे कोरे

# डेमोक्रसीज इलेव्हन

**राजदीप सरदेसाई**


अनुवाद

**मेघना ढोके**

**किंमत : ५९५/-रु.**

**पोस्टेज : ५०/-रु.**

**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




क्रिकेट.

भारताला एका सूत्रात बांधण्याची किमया क्रिकेटइतकी अन्य खेळांना साधलेली नाही.

भारतीय क्रिकेट संघात खेड्यापाड्यातले खेळाडू खेळतात, तसे महानगरांतलेही.

इथं रांचीतल्या एका साध्या पंप ऑपरेटरचा मुलगा अशक्य वाटणारं स्वप्न पाहण्याची हिंमत करतो. आणि मुंबईतला एक कोवळा मुलगा, बालचमत्कारच, तो हैदराबादच्या गच्च गर्दीच्या गल्लीत वाढलेल्या मुस्लीम तरुणासह खांद्याला खांदा लावून खेळतो. गुणवत्तेला प्राधान्य आणि समान संधी हे आपलं घटनात्मक तत्त्व क्रिकेटनं प्रत्यक्ष जगून दाखवलं. भारतात जे जे सर्वोत्तम, उदात्त आणि महन्मंगलत्या साऱ्यांचं प्रतिबिंब क्रिकेटमध्ये पडलेलं दिसतं.

-हे पुस्तक म्हणजे भारतीय क्रिकेटची तीच महान गाथा.

सुप्रसिद्ध पत्रकार आणि ख्यातनाम लेखक राजदीप सरदेसाई, क्रिकेटचा हात धरत, अकरा खेळाडूंचं आयुष्य उलगडत, बदलत्या भारताचा एक थरारक पट मांडत आहेत. १९६०च्या दशकात खेळणारे दिलीप सरदेसाई आणि नवाब पतौडी यांच्यापासून या प्रवासाला प्रारंभ होतो आणि काळाचं एकेक पान उलटत आपण वर्तमानात महेंद्र सिंग धोनी आणि विराट कोहलीपर्यंत येऊन पोहोचतो.

भारतीय क्रिकेट आणि भारतीय समाज कसा बदलत गेला, त्याचा पैस आणि पट उलगडणारं हे पुस्तक एका उत्क्रांतीचीच गोष्ट सांगतंय.


## पुस्तक परिचय



# कवडसे



एफ.वाय.बी.ए. पर्यंत शिक्षण झाल्यावर शिवाजी सावंतांनी लघुलिपी आणि टंकलेखन यांचा अभ्यासक्रम पूर्ण केला. राजाराम प्रशाला, कोल्हापूर या ठिकाणी वीस वर्षे अध्यापनाचे कार्य त्यांनी केले. पुण्यात महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण खात्याच्या लोकशिक्षण मासिकामध्ये त्यांनी सहा वर्षे काम केले. महाभारताच्या सखोल अभ्यासातून त्यांनी 'मृत्युंजय'सारखी अजरामर कलाकृती निर्माण केली. इतर अनेक पुरस्कारांसह दिल्लीतील ज्ञानपीठ संस्थेचा 'मूर्तिदेवी पुरस्कार' या कादंबरीला मिळाला. मृत्युंजय हिंदी, गुजराथी, मल्याळम्, बंगाली, राजस्थानी, कन्नडसह इंग्रजीतही भाषांतरित झाली आहे. पुढे त्यांच्या 'छावा', 'युगंधर' या पुस्तकांनीही अमाप प्रसिद्धी मिळवली. 'मृत्युंजय' व 'छावा' कादंबरीवर आधारित नाटकांचे लेखनही त्यांनी केले. १९८३ मध्ये बडोदा मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले. तसेच महाराष्ट्र साहित्य परिषदेचे उपाध्यक्ष म्हणूनही काही काळ ते कार्यरत होते.




## शिवाजी सावंत

*या लेखसंग्रहात त्यांनी जी व्यक्तिचित्रं उभी केली आहेत ती समकालीन असली तरी त्यांच्यापेक्षा वयानं मोठी आहेत.*

*ग. दि. माडगूळकर, तात्यासाहेब शिरवाडकर, रणजित देसाई, बाळासाहेब ठाकरे, सुमित्राराजे भोसले प्रभृती मोठ्या माणसांची प्रसंगविशेषी जी व्यक्तिचित्रं रेखाटलेली आहेत ती आदरभावानं भरलेली आणि भारलेली आहेत. त्यांच्या गुणांचं भरपूर माप त्या त्या मोठ्या व्यक्तींच्या पदरात टाकलेलं दिसतं. ही व्यक्तिचित्रं रेखाटताना ते स्वत: लहान होऊनच त्यांच्या दारी जातात. लहान होऊनच तिथे बसतात. त्यांच्याशी आदरानं बोलतात आणि नंतरच त्यांच्याविषयी आदरानं लेखणी चालवतात.*

## ना. वा.

साल असावं ६८-६९, त्यावेळी मी कोल्हापुरातील दै. सत्यवादी प्रेस जवळच्या लक्ष्मीपुरीतील पोलीस क्वार्टर्समध्ये राहत होतो. याच वर्षांच्या चिंतन-मनन, संदर्भशोधन, कोल्हापूर ते कुरुक्षेत्र असं दूरच्या पल्ल्याचं पर्यटन, अनेक जाणत्या दिग्गजांशी संभाषण अशी भरकस साहित्यसाधना करून 'मृत्युंजय' ही माझी पहिली कादंबरी सिद्ध केली होती. पुण्याच्या रसिकमान्य 'कॉन्टिनेन्टल प्रकाशन' या विख्यात प्रकाशन संस्थेच्या रत्नपारखी (स्व.) अनंतराव कुलकर्णी यांनी आपल्या 'शारदा प्रसाद' या निवासावर महाराष्ट्र-वाल्मीकी (स्व.) ग. दि. माडगूळकर यांच्या रामायणी हातांनी साधंच घरगुती पूजन करून ती प्रकाशित केली होती. माझ्या या पहिल्याच साहित्यकृतीला (स्व.) दीनानाथ दलाल यांच्यासारख्या कुंचलासम्राट चित्र महर्षींचं लाखात उठून दिसणारं अत्यंत बोलकं मुखपृष्ठ लाभलं होतं. आतील सजावटचित्रं त्यांचीच होती.

दै. केसरीमध्ये मृत्युंजयवर पहिलंच लक्षवेधी सौंदर्यग्राही समीक्षण आलं होतं ते डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे या मूर्धन्य विचारवंताचं. त्याचं शीर्षकच होतं- 'महाभारताचं महातेज आत्मसात केलेली साहित्यकृती' असं. पाठोपाठ आ. अत्र्यांचा दै. मराठामधून 'मृत्युंजय' या शीर्षकाचा अग्रलेखही आला होता. एकूणात तो काळ 'मृत्युंजय'च्या वातावरणानं सर्वदूर भारलेला होता.

मी त्यावेळी कोल्हापुरातील मेन राजाराम हायस्कूलात अध्यापक होतो. तो ही कॉमर्स विषयाचा. सुट्टीच्या अशाच एका रविवारी आमच्या क्वार्टरमध्ये चटईवर लेटून वृत्तपत्रातील मृत्युंजयावरील परीक्षण वाचत होतो. (बहुधा शांताबाई शेळके किंवा प्रा. बर्वे यांचं ते असावं.) अशातच लोटलेल्या दरवाजावर टकटक झाली. मी दार उघडलं. समोर एक मध्यम वयस्क, तरतरीत नाकाचे, अगदीच अनोळखी गृहस्थ उभे होते. टाळूला केस कमी, डोळ्यांवर चश्मा, रंग सावळा (खास देशस्थी), पायजमा, बाह्या दुमडलेला साधाच पण पांढरा स्वच्छ अंगरखा. खरं तर कुठल्याही रेव्हेन्यू, कोर्ट, फॉरिस्ट अशा खात्यातील कसदार कारकुनाचाच दावा करणारी असामी समोर उभी होती. मी कपाळाला किंचित आठ्या घालूनच अस्पष्ट विचारलं, ''हं, कोण?''

दाताखालची चघळती सुपारी जिभेनंच गालफडात सरकवून समोरचं ध्यान स्वत:शीच बोलल्यासारखं पुटपुटलं, ''मी ना. वा... ना. वा. देशपांडे. शिवाजीराव सावंत आपणच काय?''

मी मान डोलावताच गृहस्थांनी देशस्थी पैस बाहेर काढला. ''आम्ही आत येऊ का? नाही म्हणजे माझं तसं काही खास काम नाही. फक्त अभिनंदन करायचं आहे. तुमचा पत्ता केव्हापासूनचा शोधत होतो. शेवटी या विनायकराव लाडांनी तो दिला. हे विनायकराव म्हणजे अण्णांचे मित्र. बाजार भोगावला टीचर असतात ते. अण्णांचे मित्र- प्रतापगड सिनेमात शिवाजीचं काम केलेले.'' मागे एक वयस्क गृहस्थ उभेच होते.

''अण्णा कोण?'' मी मुद्द्याकडं येत बावळटासारखं म्हणालो. ''अण्णा म्हणजे आमचे अण्णा हो- ग. दि. मा. तुमच्या 'मृत्युंजय'चं पुण्यात पूजन करणारे.''

माझी ट्यूब पेटली. ग. दि. मां.चं नाव ऐकताच मी हसतच म्हणालो, ''बरोब्बर अण्णा. या आत या. पण त्यांना अण्णा पुण्याकडं म्हणतात. इथं कोल्हापुरात 'गदिमा' आणि सिनेमातील काही खास तर अद्यापही 'औंधकर' म्हणतात.'' मी पुटपुटलो.

''चालायचंच'' म्हणत ना. वा. आत आले. पाठोपाठ लाडही आले. चपला कोन्यांत उतरवून दोघेही चटईवर अलख-पलख घालून घरच्यासारखे बसले.

त्या दिवशी ना. वा. देशपांडे नावाचा नमुनेदार कोल्हापूरकर त्या क्वार्टरच्या लाकडी दारातून जो आत घुसलाय तो आजतागायत.

ना. वा. मूळचे संकेश्वरचे— (म्हणजे कर्नाटकातील) कोल्हापूर या खास मराठ्यांच्या जिंदादिल राजधानीत केव्हा आले माहीत नाही. मला आणि खुद्द ना. वां.नाही. मूळचे कर्नाटकातील असल्यामुळंच असेल, पु. लं.च्या 'व्यक्ती आणि वल्ली'मधील बेळगावकर 'रावसाहेब' आमच्यासमोर त्यांनी 'साडोकी' म्हणत अनेकदा (स्वत: ढिम्म एवढंसुद्धा न हसता) सादर केलाय. रावसाहेबांच्या ढंगात बालगंधर्वाचं वैभव उभं करताना ना. वा. जेव्हा 'हे शिंचं तबला वाजवतंय क्काय मांडी खाजवतंय.' हे वाक्य ज्या सहज कानडी लहेजात उच्चारतात तेव्हा माझ्यासमोर मी कधीही न पाहिलेले 'रावसाहेब' अगदी जित-नित उभे ठाकतात.

पहिल्याच भेटीत माझी आणि ना. वां.ची 'वेव्हलेंग्थ', अगदी ही अशी,

कुंडलीच्या भाषेत सांगायचं म्हणजे छत्तीस पुऱ्या गुणांनी जाम जुळून गेली. सुमारे तासभर पहिल्याच भेटीत आम्ही मनसोक्त बोललो. विषय एकच नव्हता. मात्र पट्टीच्या गवय्यानं सहज व अचूक सम साधावी तसे ना. वा. नेमके 'अण्णा' या त्यांच्या व्यक्तिगत परम आराध्य दैवतावर येत होते. मला केव्हाच कळून चुकलं की समोरचं सावळं रूप हे ग. दि. माडगूळकर उर्फ महाराष्ट्र वाल्मीकी उर्फ अण्णा यांची खास आंतरवर्तुळातील एक असामी आहे.

आमचा 'दोस्ताना' कसलाही लेखी, तोंडी दावा न करता हा असा पहिल्या भेटीपासूनच सुरू झाला. अगदी दोघांनाही नकळत. याला रौप्यमहोत्सवी वर्षंही कधी मागं पडली याचा पत्ता नाही, दोघांनाही.

६८-७४ असा चांगला अर्धा तप आमचा हा दोस्ताना कोल्हापूर मुक्कामी रंगला. याची मूळ नस होती निखळ साहित्यप्रेमी ही. दोघांचीही. ना. वा. पिंडानं, वृत्तीनं कवी. त्यांचं हस्ताक्षर मोत्यासारखं. अगदी साधं पोस्टकार्डही थेट छापील केल्यासारखंच हाती पडेल. माझी चि. कादंबिनी व अमिताभ ही दोन्ही मुलं तर त्यांच्या हस्ताक्षराच्या प्रथमदर्शनीच 'ओऽ क्यूट!' म्हणजे प्रेमातच पडलीत. कुणीही असं प्रेमात पडावं या तोडीचं ते आहेच. शे-शंभर पत्रांच्या ढिगाऱ्यातून ना. वां.चं पत्र मी तरी दुरूनच सहज शोधून काढीन. हस्ताक्षराच्या बळावरच माझ्या मुलाचे (त्यांनाही नकळतच) ते 'ना. वा. काका' झालेत.

जुन्या पिढीतील गदिमा, श्रीपाद आपटे, बाकीबाब, तांबे, आर्याकार मोरोपंत ही कविवर्य ना. वां.ची काव्यदैवतं. त्यात अण्णांना— गदिमांना त्यांच्या लेखी 'रामाचंच' अढळपद त्यांनी दिलेलं आहे. ना. वां.च्या कोल्हापूरच्या निवृत्ती चौकातील नवांगुळे वाड्यातील इवल्याशा, टुमदार दोन खणी घरात दोनच मराठी साहित्यकारांचे फोटो दिसतील. अण्णा— गदिमा व आ. अत्रे यांचे. आ. अत्र्यांबद्दल ना. वा. प्रसंगानुसार बोलतील, पण गदिमांचं नाव घेतल्याशिवाय, माझ्या भाषेत अण्णांची एक तरी 'रसबाळी' काव्यपंक्ती, सुपारी कातरता कातरता गुणगुणल्याशिवाय ना. वां.चा दिवस काही सार्थकी लागत नाही.

अण्णांनीही ना. वां.वर तसंच बंधुवत प्रेम केलं. कदाचित अंगुळभर जादाच. ना. वां.ना त्यांचे जवळजवळ सर्व आप्त 'बाबा' या टोपणनावानं संबोधतात. अण्णांच्या सूक्ष्मपारखी कविमनानं हा बारकावा कधीतरी अचूक उचलला. तेही

त्यांना 'बाबा' म्हणूनच नकळत हाकारू लागले. ते म्हणू लागले म्हणून अण्णांची मुलं श्रीधर, आनंद, कुमार इतकंच काय सौ. विद्यावहिनी माडगूळकरही ना. वां.ना 'बाबाच' म्हणत, ते ना. वा. अण्णांना व त्यांना वयानं लहान असूनही. हे घडत होतं कुणालाही एवढंसुद्धा न खटकता हे विशेष. वास्तविक खुद्द ना. वां.नाच खटकायला हवं होतं. त्यांच्या हे आजतागायत ध्यानीही आलेलं नाही! अण्णा उर्फ ग. दि. माडगूळकर यांच्याकडून (वयानं लहान असूनही) चक्क 'बाबा' म्हणवून घेतलेले ना. वा. हे महाराष्ट्रात एकमेव महामानव आहेत!

ना. वा. परम दत्तभक्त. घरात नित्यपूजेत दत्ताची सुबक मुद्रा आहे. सकाळी सुस्नात होऊन पुष्पमंडित देवघरातील स्वच्छ वातावरणात, मंद उदबत्तीच्या दरवळात मन:पूर्वक गुरुचरित्राचं आत्मलीन होऊन पठण करणं हा या निस्सीम दत्तभक्ताचा नित्यनेम. तेव्हा ना. वा. कुणाचेच नसतात. असतात फक्त श्रीगुरुदेवदत्ताचे. त्यांच्या या निरपेक्ष साधनेमुळं ते बसतात तो बैठकीचा लाकडी पाट 'चार्ज' झालेला आहे. कधी सटीसामाशीला ना. वां.च्या घरी मुक्कामाला गेलो तर सकाळी उठून स्नान आवरून या बैठकी पाटावर बसून श्रीदत्ताला शुभ्र फुलांची ओंजळ वाहताना मी तो 'चार्ज' झालेला पाट मूकपणे अनुभवलाय!

सौ. पुष्पावहिनी हे या दत्तभक्ताच्या जीवन पोथीतील वेगळंच पर्व आहे. स्वतंत्रपणे निवांत लिहावं असं. ना. वां.च्या पूर्वी त्या उठून घरातील या नित्यपूजेची सर्व तयारी करतात. मी त्यांना खास कोल्हापुरी गावरान लकबीत 'कुस्पाताई' म्हणण्याला नाराजीचं नाक त्यांनी कधीही मुरडलेलं नाही. त्यांच्या हाताला एक सुगरणीच्या सत्त्वशील चवीचा गंध आहे. नुसती आमटीही ओरपून खावी. साधीच भाजी-भाकरी-लोणच्याच्या अवीट चवपालटीबरोबर मिटक्या मारत खावी. आपणाला बोलण्यात गुंतवत आमच्या कुस्पाताईंनी ताटात दुसरी पोपडेवाली शुभ्र भाकरी केव्हा वाढलीय ते कळूनही येत नाही... अगत्य तर खास कोल्हापुरी ढंगाचं.

त्यांच्या या खास कोल्हापुरी गरत्या अस्तुरीच्या जीवलावणी स्वभावामुळं आम्ही 'जेव्हा केव्हा वर्ष-दोन वर्षांनी एकत्र भेटतो तेव्हा' एक आठवण हटकून उजळते. आम्ही म्हणजे मी, सौ., मुलं आणि ना. वा. व सौ. कुस्पाताई अशी सहा जणंच. असेलच बैठकीत कधी तर कोल्हापूरकर मित्र अशोक गगराणी, बाबा पाटील, गनी

फरास, दिनकर पवार, अशोक भोईटे, एस. आर. पाटील यांपैकी कुणीतरी एखादं.

ही आठवण निगडित आहे ती ही अण्णांशी— गदिमांशी. त्या दिवशी आम्ही सारेच कुरुंदवाडच्या एका महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम उरकून परतलो होतो. त्या सफरीत अण्णांचे खास वर्गमित्र व खास साहित्यिक निवडक जीवलग होते. त्यांत मी ज्यांच्यावर 'आर्के' नावाचं व्यक्तिचित्र लिहिलंय ते गदिमांचे वर्गमित्र व खास अरे-तुरेतले यार आर. के. कुलकर्णी होते, राजाराम महाविद्यालयाचे मराठीचे प्रमुख, मराठीचे सुवर्णपदक विजेते, ज्ञानेश्वरीचे साक्षेपी अभ्यासक प्रा. पां. ना. कुलकर्णी होते. कविवर्य सूर्यकांत खांडेकर, अध्यापक— नटवर्य विनायकराव लाड अशी सगळीच अकृत्रिम जिव्हाळ्याची मंडळी होती.

आमच्या कुस्पाताईंनी सर्वांना माहेरच्या म्हणजे कुरुंदवाडच्या कणीदार बासुंदीचं व कृष्णेकाठच्या भरल्या वांग्याचं सुग्रास जेवण आग्रह करकरून वाढलं होतं. नवांगुळे वाड्यातील ना. वां.च्या दोन खणी घरासमोरच्या स्वच्छ सारवलेल्या ओसरीवरच ही पंगत हास्य-विनोदात उठली. तिथं ओसरीवरच ना. वां.नी गाद्या, लोड हंतरून गुब्बार तक्के मांडून प्रशस्त देशस्थी बैठक मांडली. पानाची सर्व वस्तूंनी सज्ज तबकं मधोमध ठेवण्यात आली. अण्णा नकळतच बैठकीचे अनभिषिक्त अध्यक्ष झाले. एका प्रशस्त तक्क्याला आपला विशाल देह रेलून देत सबागती म्हणाले, ''गड्या आर्क्या, हं जमव बगू माजं बी पान तुज्या हातानं. चुना जरा आवरून! त्वांड अक्षी पाकळल्यागत झालंय बग.'' अण्णांना सर्वांच्या नावाचे शॉर्ट फॉर्म्स, लाँग फॉर्म्स करायची एक खट्याळ खोड होती. मग आर. के.चं 'आर्के' व्हायचं, विनायकाचं 'विन्या', पी. एल. चं 'पिल्या' आणि माझं नाव सुटसुटीत 'शिवाजी' असतानाही ते हटकून म्हणायचे, ''क्काय शिवाजी महाराज.''

इथंच ध्यानी घेतलं पाहिजे की, ना. वां.च्या 'बाबा' या त्यांनी उच्चारलेल्या नावाचा कधीच 'बाब्या' असा शॉर्टफॉर्म केला नाही.

पान जमवत, एकमेकांच्या मनमुक्त टोप्या उडवत आमच्या गप्पा ऐन रंगात आल्या होत्या. अण्णांना कोणाचीही हुबेहूब नक्कल करायची एक दुर्मीळ कला बालपणापासूनच अवगत होती. किशोरवयात कोल्हापुरात त्यांनी कैक गणपतीमेळ्यांत अशा नकला पूर्वी केल्या होत्या. कवी सूर्यकांत खांडेकरांना

स्वत:शीच 'हं-हं' अशी घुमण्याची एक खोड होती. अण्णांनी आपल्या या कोल्हापुरी कविमित्राची ही लकब केव्हाच हेरली होती. प्रत्यक्ष खांडेकरांनाही सुतराम कल्पना येणार नाही अशा ढंगात अण्णांनी त्यांची खुशाली विचारली, ''हं-हं— सूर्यकांत अंतरात चंद्रकांत पाझरे— क्काय म्हंतय तुमचं कोल्हापूर— म्हंजी शावम्हाराजांचं करवीर हो. ब्येस हाय न्हवं?''

सूर्यकांत खांडेकर पानाला चुना लावत उत्तरले, ''बरं हाय की. हं- हां तुमचं लोकमान्यांचं पुणं कसं हाय? हं-हं.'' तसं अण्णा खट्याळपणे म्हणाले, ''बरं हाय न्हवं- मग हाय! पुणं बी बरंच हाय.'' मी कुतूहलानं विचारलं, ''पैला हाय समजला- पर दुसरा हाय कसला म्हनावा?''

तसं अण्णा माझ्या पाठीवर एक जोरदार थाप मारत म्हणाले, ''भले रे शिवाजी महाराज. पैला हाय त्येंच्या खुशालीचा— दुसरा माज्या म्हंजी तुमीच खुशाल हाय याचा मला बी आनंद हाय असं.'' अण्णांची ती अजब 'हाय-हाय' ऐकून हास्याची कारंजी उधळली.

एव्हाना कुस्पाताई घासभर खाऊन ओसरी आणि घराच्या दाराआड उभ्याही राहिल्या होत्या. त्यांनी खास संग्रही असलेली गीतरामायणाची प्रत ना. वां.च्या हाती ठेवली. त्यांनी मलाही दबक्या आवाजात सांगितलं, ''अहो, सांगा अण्णांना तेवढं म्हणायला.''

ना. वां.नी गीतरामायणाची प्रत हलकेच अण्णांच्या समोर ठेवली. मी ती त्यांच्या हातात देऊन हळूच म्हटलं, ''वहिनी म्हणतात, तेवढं 'वेलीवरची पाहुनी फुले' तुमच्या तोंडून ऐकायचंय.'' अण्णांनी ''गीत रामायेण जनू'' म्हणत आपलाच विख्यात खंडकाव्यसंच हातात घेतला. दोन-तीन वेळा तसाच उलटापालटा हाताळला. काही पानं चाळल्यासारखी केली. ना. वां.कडं बघत ते स्वत:शीच बोलल्यागत पुटपुटले, ''आज न्हाई गड्या... मूड न्हाई लागत— पुन्यांदा कवा तरी.''

बैठकीतले विनायकराव लाड म्हणाले, ''अण्णांचा गप्पांचा मूड तसाच चालू देत.'' आर्केंनी त्यांची री ओढली. ''पुन्यांदा तर पुन्यांदा. तुमचं आपलं चालू द्यात अण्णा.'' अण्णांनी हातचं पुस्तक समोरच अलगद ठेवलं.

सर्वांच्या चौफेर गप्पा पुन्हा रंगल्या. अर्धा-पाऊण तास असे हास्याचे भुईनळे

उडवत केव्हा उडाला कुणालाच कळलं नाही.

एकाएकी अण्णांनी आपल्या नेहरूशर्टच्या खिशातून चश्म्याची डबी बाहेर काढली. आपला नेहमीचा वाचनाचा जाड भिंगाचा डौलदार चश्मा आपल्या थोराड जबड्याच्या कानशिलावर चढवला. सभेचा अनभिषिक्त अध्यक्ष थोड्याशा करड्या, जरबेच्या सुरात म्हणाला, ''शांतता... गीतरामायणकार त्यांची स्वत:ची रचना वाचताहेत—''

''उगा का काळीज माझे उले,
पाहुनी वेलीवरची फुले.''

खिदळतं वातावरण क्षणात शांत झालं. अपत्यप्राप्ती नाही म्हणून महाराणी कौसल्या महाराज दशरथांना काव्यातून आपली मनोव्यथा सांगते आहे, असा हा महाकाव्य रामायणाचा हृदयस्पर्शी कथाभाग आहे.

एवढा वेळ आम्हा सर्वांच्या मेळाव्यात असलेले गदिमा आता त्यांच्या कलावंत आंतरनेत्राला कौसल्येचं दु:ख दिसताच फार बदलले. आमच्यात नसल्यासारखे झाले. पूर्ण तदाकार होऊन आपलंच काव्य महर्षी वाल्मीकीचं असल्यासारखं उच्चारांच्या आरोह अवरोहांची अचूक लय पकडून वाचू लागले—

''कधी नव्हे ते मळले अंतर
कधी न शिवला सवतीमत्सर
आज का लतिकावैभव सले?''

वेलीच्या फुलांच्या बहरासाठी आमच्या मराठीच्या या मूर्धन्य कवीनं योजलेला 'लतिकावैभव' हा चपखल शब्द ऐकताच मी व ना. वा. एकदमच प्रतिसादलो- ''व्वा.'' दोघंही एकमेकांकडे बघून मंद हसलो.

आता अण्णा पुणेकर राहिले नाहीत. मराठीचे प्रज्ञाश्रीमंत कवी राहिले नाहीत. वाल्मीकींशीही त्यांचं कसलं नातं उरलं नाही.

ते समरस झाले एकट्या कौसल्येच्या फक्त व्यथेशी. त्यांच्यातील कवी, अभिनेता, साहित्यिक मागं पडला. उरला, मातुश्रीनं संस्कारांच्या ओंजळी ओंजळींनी न्हाऊ घातलेला, बालपणापासून शब्दा-शब्दांचे मोतीचूर खिलावून

दुलारलेला, आतबाहेर निखळ मानवतेचा टंच कंद ठासून भरलेला एक माणदेशी माणूस.

अण्णा कमालीचे गंभीर झाले होते. त्यांच्या तोंडून अर्धलाघव ल्यालेले शब्द स्त्रवत होते. सारेच एकतान होऊन फक्त ऐकत होतो—

"काय मना हे भलते धाडस?
तुला नावडे हरिणी-पाडस
पापणी वृथा भिजे का जले?
पाहुनी वेलीवरची फुले."

आत दाराआड उभ्या असलेल्या पुष्पावहिनी आपसूकच आता खाली बसल्या. कान देऊन ओसरीवरचे अर्थचिंब व कविबोल एकमन होऊन ऐकू लागल्या.

अण्णा शब्दसरींतून दुसरं हुबेहूब क्षणचित्र उभं करताना म्हणत होते—

"गोवत्सांतील पाहून भावा
काय वाटतो तुजसी हेवा?
चिडे कां मौन तरी आंतले?... पाहुनी..."

अण्णांना खोकल्याची उबळ आली. भरली मूठ तोंडासमोर धरून ते थोडंसं खाकरले. पुन्हा कौसल्येची मातृत्वाच्या आसक्तीची भावपूर्ण वेदना शब्दावगुंठीत करीत म्हणाले—

"कुणी पक्षिणी पिलां भरविते
दृश्य का तुला ते व्याकुळ करिते?
काय हे विपरित रे जाहले... पाहुनी..."

अण्णा आता मान डोलवत स्वत: पूर्णत: कौसल्यारूप झाले होते. त्यांची गोल-गुब्बार, सावळी मुद्रा पुरती काळवंडून आली होती. डोळे डबडबून आले होते.

आधुनिक महाराष्ट्र-वाल्मीकीवाणी स्त्रवतच राहिली.

"स्वत:स्वताशी कशास चोरी?

वात्सल्याविण अपूर्ण नारी
कळाले सार्थ जन्मातले! पाहुनी...''

सर्व बैठक अण्णांच्या थरथरत्या भावबोलांनी आता पुरती-पुरती 'कौसल्यामय' केली होती. कुणीच काही बोलत नव्हते, माणदेशी बावन्नकशी मानवतावाणी अरोध पाझरत राहिली...

''मूर्त जन्मते पाषाणातून
कौसल्या का हीन शिळेहून?
विचारें मस्तक या व्यापिले... पाहुनी...''

गीतरामायणकारांची शेवटची कल्पना भरारी अर्थातच गगनभेदी होती.

''गगन आम्हांहुनि वृद्ध नाही का?
त्यात जन्मती किती तारका
अकारण जीवन हे वाटले.''

झरझर पाझरणारे आपले डोळे अंगीच्या नेहरूशर्टाच्याच हातोप्यानं चक्क सर्वांसमक्ष पुसत तो आधुनिक वाल्मीकी विसाव्यासाठी मागच्या तक्क्यालाच रेलला. ना. वां.सह सर्व बैठक कौसल्येच्या वेदनेनं चिडीचाप सद्गदित झाली होती. मी लगबगीनं समोरच्या तांब्यातील पाणी भरून फुलपात्र अण्णांच्या हाती दिलं. ना. वा. आणि मी एकमेकांकडं बघत असताना अचानकच पाणी पिऊन सरळ उठून वाड्याच्या मधल्या हमचौकाकडं थेट चालताना अण्णा तुटक म्हणाले, ''बाबा, चलतो रे- बायकोला सांग- भरली वांगी छान जमली होती.''

मी आणि ना. वा. खेचल्यासारखे त्यांना गाडीत बसवायला चाललो. अगदी मूक. आम्ही दोघांनीच अचूक जाणलं होतं. आता अण्णा कोणत्या मनोवस्थेत आहेत ते.

'मूड नाही' म्हणून गीतरामायणातली गीतं म्हणायचं अण्णांनी चक्क नाकारलं होतं. नंतर एक घंटाभर हास्यविनोदात ते रमले होते. त्यांचं आंतरमन मात्र पूर्णत: जागृत होतं. एकाएकी भोवतीचे हास्यकल्लोळ थांबवीत त्यांनी आपलंच

गीतरामायण पुन्हा उचललं होतं. त्यांतील एकच गीत म्हटलं होतं— ''उगा का काळीज माझे उले?'' हे सहज घडलं नव्हतं. हे गीत म्हणताना ते कौसल्येला प्रतिनिधी करून आमच्या ना. वां.च्या सौ. कुस्पाताईंच्या अंतरंगाशी पूर्णत: एकरूप झाले होते. ते एकच गीत म्हणताना अण्णांचे झरझर पाझरणारे, जीवनानुभव घेतलेले डोळे मी समक्ष पाहिले होते— अण्णा नावाचा आधुनिक वाल्मीकी बैठकीत बसलेल्या आपल्या ना. वा. उर्फ बाबा या जिवलग मित्राच्या पत्नीच्या नाळेच्या वेदनेशी कविहृदयानं मूकपणे एकलय झाला होता. ना. वा. व पुष्पाताईंना अपत्यप्राप्ती नाही ही ती निरुत्तर करणारी जीवघेणी वेदना होती.

त्या क्षणापासून माझ्या व्यक्तिगत दैनंदिनीत ना. वा. हे नाव 'मैतर' म्हणून कधीही न पुसण्यासाठी लिहिलं गेलंय. ना. वा. आणि आमच्या कुस्पाताई संपूर्ण आयुष्यात कुणाचाही कधीही हेवा करताना दिसलेले नाहीत. त्यांना मी आणि असंख्य कोल्हापूरकरांनी कधीच दुर्मुखलेलं पाहिलेलं नाही.

हा लेख लिहिताना माझं मलाच एक कोडं सुटलेलं आहे. सर्वांच्या नावांचा शॉर्टफॉर्म करणाऱ्या ना. वां.च्या 'बाबा' या नावाचा अण्णांनी कधीच 'बाब्या' का केला नाही? तर त्यांना पुरतं पुरतं मनोमन पटून चुकलं होतं की, ना. वां.नी आपल्या उभ्या आयुष्यात पत्नीला एका जाणत्या जन्मदात्याचं— वडिलांचंच प्रेम दिलं आहे. ना. वा. अण्णांनीही 'बाबा' म्हणण्याच्या सार्थ पात्रतेचे आहेत!

असे आहेत माझे परम मैतर 'ना. वा.' अण्णांचे 'बाबा'!

◆


आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

**सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती**

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

**९४२०५९४६६५**

# पुस्तक परिचय



## जॉर्जेस सिक्रेट की टू द युनिव्हर्स

**ल्यूसी हॉकिंग** (जन्म : २ नोव्हेंबर, १९७०)

ल्यूसी हॉकिंगनं प्रौढांसाठी दोन कादंबऱ्या लिहिलेल्या आहेत. तिनं अनेक ब्रिटिश वर्तमानपत्रांसाठी लेखन केलेलं आहे. तसंच तिनं टीव्ही आणि रेडिओ या माध्यमांचाही वापर केलेला आहे. तिनं जगभरात लहान मुलांसाठी अवकाश प्रवास आणि विज्ञान या विषयांवर अनेक व्याख्यानं दिली आहेत. नासाला ५० वर्षं पूर्ण झाल्यानिमित्त अमेरिकेत आयोजित केलेल्या समारंभातही तिनं व्याख्यान दिलं होतं. 'अमरत्व प्रकल्प' (प्रोजेक्ट इमॉर्टलिटी) या अंतर्गत ल्यूसीचे डी.एन.ए. रेणू अवकाशात पाठवण्यात आले आहेत. जर अपघातानं मानवजात नष्ट झाली तर अशा प्रसंगासाठी तिचे डी.एन.ए. रेणू आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकावर ठेवण्यात आले आहेत. विज्ञान प्रसाराचं कार्य करण्यासाठी तिला २००८ मध्ये 'सपिओ पुरस्कारा'नं सन्मानित करण्यात आलं आहे. ती आणि तिचा मुलगा केंब्रिजमध्ये राहतात.



**स्टीफन हॉकिंग** (८ जानेवारी, १९४२ - १४ मार्च, २०१८)

स्टीफन हॉकिंग, केंब्रिज विद्यापीठात गणित विषयाचे 'ल्युकासियन प्राध्यापक' म्हणून काम करत होते. आईनस्टाईन यांच्यानंतर भौतिकशास्त्रात सैद्धान्तिक काम करण्याबद्दल ते जगप्रसिद्ध आहेत. त्यांचं 'अ ब्रीफ हिस्टरी ऑफ टाईम' हे पुस्तक बेस्टसेलर म्हणून गाजलं. त्याच्या १ कोटी वीस लाख प्रती जगभर खपल्या आहेत. हे पुस्तक आता ३० भाषांमध्ये उपलब्ध आहे. 'द ग्रॅन्ड डिझाईन' हे त्यांनी लिओनार्ड म्लोदिनोव यांच्यासह लिहिलेलं प्रौढांसाठीचं पुस्तक.




लेखक

**ल्यूसी आणि स्टीफन हॉकिंग**

अनुवाद

**डॉ. प्रमोद जोगळेकर**

*शाळा आणि घर याला कंटाळून गेलेल्या*
*छोट्या 'जॉर्ज'च्या शेजारच्या घरात राहायला*
*एरिक आणि चिमुरडी ॲनी येतात.*

*एरिक खगोलशास्त्रज्ञ असतात आणि त्यांच्याकडे असतो,*
*'कॉसमॉस' नावाचा विलक्षण सामर्थ्य असणारा*
*जबरदस्त कॉम्प्युटर! एरिकच्या घरी जॉर्जला*
*बाह्य अवकाशात संचार करायला मिळतो.*
*तिथेच त्याला विश्वाची सारी रहस्यं खुली*
*करणारी 'गुप्त किल्ली' सापडते.*

*मागच्या काही घटनांचा राग मनाशी धरून बसलेला*
*एरिकचा एके काळचा सहकारी*
*एरिकला 'कृष्णविवरात' कायमचं अडकून*
*नष्ट होण्यासाठी पाठवतो.*
*त्याला वाचवण्याची जबाबदारी*
*छोट्या जॉर्जवर येऊन पडते*
*आणि मग....*

जॉर्जनं अंतराळात मारलेली उडी अशी होती की, अगदी जेमतेम एरिकना त्याचा हात धरता आला. एरिकनी त्याचा हात पकडून त्याला खेचून घेतलं आणि स्वत:च्या शेजारी बसवलं. जॉर्जच्या पाठीमागे पोर्टलचं दार नाहीसं झालं.

''जॉर्ज, तुला वेड तर लागलं नाही ना? मी जर तुझा हात धरला नसता, तर तू अंतराळात कायमचा हरवून गेला असतास.'' एरिक फारच संतापले होते.

''पण – ''

''चूप! मी तुला परत पाठवणार आहे. आत्ताच्या आत्ता!''

''नाही!'' जॉर्ज ओरडून सांगू लागला. ''माझं ऐकून घ्या! प्लीज, माझं म्हणणं ऐका! हे फार महत्त्वाचं आहे.''

''काय सांगायचंय तुला?'' एरिक म्हणाले. जॉर्जचा स्वर काहीतरी निराळा आहे हे त्यांना अचानक जाणवलं होतं.

''तुम्ही माझ्याबरोबर परत यायला हवं.'' जॉर्ज म्हणाला, ''मी जे काही केलंय त्याबद्दल मला खरोखरच माफ करा. मी माझ्या शिक्षकांना कॉसमॉसबद्दल सांगितलं ही माझी फार मोठी चूक झाली. मी डॉ. रीपरना कॉसमॉसबद्दल बोलून गेलो आणि मग त्यांनी तुम्हाला त्या ग्रहाबद्दल ते पत्र पाठवलं!'' एरिकनी काही म्हणायच्या आत जॉर्ज पुढे बोलू लागला. ''आणि आज सकाळी त्यांनी विचारलं की, तुम्ही नाहीसे झाला आहात का? त्यांनी खरंच असं विचारलं! हा कसला तरी सापळा आहे. डॉ. रीपर तुमच्याच मागावर आहेत असं दिसतंय!''

''ग्रीपर... रीपर... अं... होय...'' एरिक म्हणाले, ''हं... हे पत्र ग्रॅहॅमनं पाठवलंय... याचा अर्थ त्यानं मला पुन्हा गाठलयं तर!''

''ग्रॅहॅम?'' जॉर्ज गोंधळून म्हणाला.

''होय. ग्रॅहॅम रीपर,'' एरिकनी शांतपणानं सांगितलं, ''आम्ही त्याला ग्रीम म्हणायचो.''

''म्हणजे तुम्ही त्यांना ओळखता!'' जॉर्जला चांगलाच धक्का बसला होता.

''होय. आम्ही फार वर्षांपूर्वी एकत्र काम करत होतो; पण आमच्यात एकदा वादविवाद झाला आणि त्यातून एक भयानक अपघात झाला. रीपर प्रचंड भाजला. त्यानंतर तो आमच्यापासून अलग झाला. त्यानंतर आम्ही त्याचं वैज्ञानिक संघाचं सदस्यत्व रद्द केलं. कारण तो काय उपद्व्याप करेल, याची आम्हाला खात्री वाटत नव्हती. त्यानं मला पत्रात काय लिहिलंय माहीत आहे?''

''होय,'' जॉर्ज म्हणाला. एरिक आानक कसे निघून गेले हे त्याला आठवलं.

''आणखी एक ग्रह....''

''आणखी एक ग्रह? जॉर्ज... तू गंमत तर करत नाहीस ना?''

''ग्रॅहॅमनं ज्या ग्रहाबद्दल सांगितलं, तो ग्रह मानवाला राहायला योग्य आहे! मी कित्येक युगं अशाच ग्रहाच्या शोधात होतो आणि हा इथे आहे!'' एरिकनी समोर दिसणाऱ्या दोन छोट्या ठिपक्यांकडे बोट दाखवलं. दोन मधला एक ठिपका ठळक होता, तर दुसरा किंचित कमी प्रकाशमान.

''तो तिथे आहे जॉर्ज!'' एरिकनी पुन्हा त्या ग्रहाची जागा दाखवली.

''तो मोठा ठळक ठिपका आहे ना तो तारा आहे आणि तो छोटा ठिपका आपण ज्या ग्रहाच्या दिशेनं चाललो आहोत त्याचा आहे.''

''पण ग्रीपर फार भयंकर आहेत!'' जॉर्ज आपला मूळ मुद्दा पुन्हा रेटत म्हणाला. अतिशय महत्त्वाच्या वेळी एरिक आणि कॉसमॉस, दोघांनाही व्याख्यान झोडण्याची हुक्की कशी काय येते, हे त्याला कळत नव्हतं. ''ग्रीपरनी तुम्हाला त्या ग्रहाची जागा उगीचच दाखवली नसणार. त्यात नक्की काहीतरी दगाफटका असणार!''

''जॉर्ज!...'' एरिक समजावण्याच्या सुरात म्हणाले. ''आपल्याला घरी परत नेण्यासाठी कॉसमॉसला पोर्टल उघडायला मी कधीही सांगू शकतो याची तुला कल्पना आहे. आपण अगदी सुरक्षित आहोत. तुझे शिक्षक आणि मी यांच्यात पूर्वी काही मतभेद होते हे खरं आहे; पण त्यानं कदाचित आता ते सगळं विसरून जायचं ठरवलं असेल आणि आमच्या प्रयत्नांमध्ये त्यालाही सामील व्हायचं असण्याची शक्यता आहे. मी आता आपल्या हेल्मेटवर नवीन प्रकारची अँटेना बसवली आहे. त्यामुळे ही अँटेना जरी खराब झाली तरी काळजीचं कारण नाही. आपण कॉसमॉसशी कोणत्याही परिस्थितीत संपर्क साधू शकतो.''

''तर मग तुम्ही आत्ताच्या आत्ता कॉसमॉसला आपल्याला तुमच्या लायब्ररीत परत न्यायला का सांगत नाही?''

''ओहो...'' एरिक म्हणाले, ''आपण तसं करू शकत नाही. आपल्या पुढे काय आहे याची कॉसमॉसला कल्पना नाही. त्यामुळे तो आपल्याला त्या ग्रहावर नेऊन, लायब्ररीत परत नेऊ शकणार नाही. याच्यापुढे काय आहे, हे शोधण्याची जबाबदारी माझी आहे. जिथे कॉम्प्युटर जाऊ शकणार नाही, तिथे मीच जायला हवं. मी एकदा एखाद्या नवीन ठिकाणी जाऊन परतलो, की पुढच्या खेपेस कॉसमॉस आपल्याला

तिकडे नेऊ शकतो. आत्ता मला म्हणूनच तर तू शोधू शकलास; पण पहिला प्रवास मीच करणं जरूरी आहे.''

''तसं करणं सुरक्षित आहे याची तुम्हाला खात्री आहे?''

''पक्की खात्री आहे.''

जॉर्ज आणि एरिक काही क्षण गप्प बसले होते. आता जॉर्जला पहिल्यापेक्षा बरं वाटू लागलं होतं. त्यानं आता ग्रीपरबद्दलचे विचार मनातून दूर सारले होते आणि तो आजूबाजूला पाहू लागला होता. एरिकना गाठून सावध करण्याच्या नादात आपण एका खडकावर बसून अंतराळात प्रवास करतोय हे तो साफ विसरून गेला होता.

एरिकच्या म्हणण्यामध्येही तथ्य असावं. कारण कुठंही कसलाही धोका जाणवत नव्हता. त्यांना सर्व बाजूंना सगळं काही नीट दिसत होतं. तो ग्रहासोबत असणारा तारा मोठामोठा होत होता; पण अचानक काहीतरी गडबड जाणवू लागली. खडकाची प्रवासाची दिशा बदलली आहे असं वाटू लागलं होतं. जॉर्ज धूमकेतूवर बसून सफर करत असतानाची त्याची दिशा जशी बदलली होती, तसंच काहीसं या वेळी होत होतं. फरक एवढाच होता की, तेव्हा आजूबाजूला इतर बरेच ग्रह दिसत होते आणि आत्ता मात्र सगळा अंधार होता. आता तर तो खडक, एरिकना ज्या ग्रहाकडे जायचं होतं ती दिशा सोडून, अगदीच निराळ्या दिशेला निघाल्याचं जॉर्जला स्पष्ट जाणवलं.

''हे काय होतंय?''

''मलाही कल्पना नाही.'' एरिक म्हणाले, ''तुझ्या अवतीभोवती बघत राहा आणि कुठं तारे नसलेली एखादी जागा तर नाही ना, ते पाहा. हं... कॉसमॉस, गरज पडली तर असावी म्हणून पोर्टल उघडून तयार ठेव.''

कॉसमॉसनं एरिकची विनंती बहुधा ऐकली नसावी, कारण पोर्टल उघडली नव्हती. एरिक आणि जॉर्जने खडक ज्या दिशेनं चालला होता तिकडे नजर फिरवली. सगळीकडे तारे दिसत होते. फक्त एका भागात पूर्ण अंधार होता. तिथे काहीही दिसत नव्हतं. ती जागा आता जास्तच जवळ येत चालली होती.

''ओह! तिथे पाहा!'' जॉर्जनं त्या वाढत्या आकाराच्या अंधाऱ्या भागाकडे एरिकचं लक्ष वेधलं. तिथले तारे काहीतरी विचित्र प्रकारे, जणू तिथली सगळी व्यवस्था कोलमडली आहे अशा प्रकारे अस्ताव्यस्तपणे फिरत होते.

''नाही!... नाही!'' एरिक ओरडले, ''कॉसमॉस, पोर्टल उघड. ताबडतोब!'' पण पोर्टल उघडली नाही.

◆

## जॉर्ज अँन्ड द बिग बँग : अनुवाद : डॉ. प्रमोद जोगळेकर

**काळाच्या सुरुवातीला जाण्याचा प्रवास**

आजवर कधीही झाला नाही, असा भव्य वैज्ञानिक प्रयोग लवकर केला जाणार आहे... जॉर्ज व त्याची मैत्रीण अॅनी पहिल्या रांगेत बसून बघत आहेत. अॅनीचे वैज्ञानिक डॅड एरिक त्यांचा जबरदस्त विश्वासू सुपर कॉम्प्युटर 'कॉसमॉस' याला घेऊन 'लार्ज हाड्रॉन कोलायडर' प्रयोगाकडे जायला सज्ज आहेत. सगळी जय्यत तयारी झाली असून, आता काहीही चूक होण्याची शक्यताच उरलेली नाही... पण हा प्रयोग नष्ट करण्यासाठी रचलेल्या एका भीषण, कपटी कारस्थानाचा सुगावा जॉर्ज आणि अॅनीला लागतो!




आता जॉर्ज एका विलक्षण धाडसी कामगिरीत ओढला जातो. विज्ञानालाच नष्ट करण्याचा बेत रचणाऱ्या दुष्ट प्रवृत्तींच्या गटाच्या कारवाया हाणून पाडण्यासाठी जॉर्ज आणि अॅनीची झुंज सुरू होते. आणि मग या धाडसाच्या दरम्यान....

## जॉर्जेस कॉस्मिक ट्रेझर हंट : अनुवाद : डॉ. प्रमोद जोगळेकर




जॉर्जला त्याची जीवश्चकंठश्च मैत्रीण अॅनीकडून

एक दिवस ई-मेल येते. तिला जॉर्जची मदत हवी आहे. अॅनीचे वडील एरिक वैज्ञानिक आहेत.

त्यांनी बनवलेला यंत्रमानव मंगळावर उतरतो; पण

तो डोकं फिरल्यासारखा वागू लागतो.

अॅनीला काहीतरी विचित्र संदेश मिळतात.

'पृथ्वी नष्ट करून टाकू,' असा इशारा त्यात आहे.

हा संदेश परग्रहवासींनी पाठवला आहे की काय?

कोण असतील हे लोक? ते पृथ्वी का नष्ट करणार आहेत? अॅनी आणि जॉर्ज या संदेशांचा माग काढत विश्वाच्या चित्तथरारक सफरीवर निघतात आणि मग अचानक....

◆

# पुस्तक परिचय




# लाइफ विदाउट लिमिट्स

जीवनाच्या प्रकाशवाटा दाखविणारी यशोगाथा.



जन्म : ४ डिसेंबर, १९८२

निक व्होयचिच हा प्रेरणादायी वक्ता व ‘लाइफ विदाउट लिंब्स’ या कल्याणकारी संस्थेचा संचालक आहे. मूळ सर्बियन (पूर्वाश्रमीचा युगोस्लाव्हिया) वंशाचा असलेला निक ऑस्ट्रेलियन नागरिक होता व सध्या तो दक्षिण कॅलिफोर्नियात राहतो.




*माझा असा विश्वास आहे की, माझ्या जीवनात कोणत्याही मर्यादा नाहीत आणि तुमच्याही जीवनात तसेच घडावे असे मला वाटते; मग तुमच्या पुढ्यात कोणतीही आव्हाने का असेनात. आपला सहप्रवास सुरू होण्यापूर्वी क्षणभर थांबा! तुम्ही स्वत: तुमच्या जीवनाला काही मर्यादा घातल्या आहेत का, अथवा अन्य कोणी त्या घालण्यास तुम्ही अनुमती दिली आहे का, याचा विचार करण्यासाठी. आता विचार करा की त्या मर्यादांपासून मुक्तता लाभल्यास तुम्हाला कसे वाटेल? काहीही अशक्य नसल्यास तुमचे जीवन कसे असेल?*

*— निक व्होयचिच,*

---

**तुम्हाला चमत्कार लाभत नसेल, तर तुम्ही स्वत: चमत्कार बना**

यू-ट्यूबवरच्या माझ्या सर्वांत लोकप्रिय व्हिडिओजपैकी एकामध्ये मी स्केटबोर्डिंग तसेच सर्फिंग करताना, संगीत वाजवताना, गोल्फ खेळताना, पडताना, पुन्हा उभे राहताना, श्रोत्यांपुढे बोलताना आणि सगळ्यात भारी म्हणजे विविध प्रकारच्या महान व्यक्तींकडून आगन स्वीकारताना दाखवलंय.

थोडक्यात काय, त्या सर्व अशा नेहमीच्या क्रिया आहेत की, ज्या कोणीही सामान्य माणूस करू शकेल, बरोबर? मग तो व्हिडिओ लक्षावधी वेळा का पाहिला

गेलाय असं तुम्हाला वाटतं? माझ्या कल्पनेप्रमाणे लोकांना तो पाहायला आवडतो कारण शारीरिकदृष्ट्या मी एवढा पंगू असूनही मी त्यात असा जगताना दिसतोय की, जणू मला कोणत्याही मर्यादाच नसाव्यात.

मोठी व्यंगं असलेल्या व्यक्ती या निष्क्रिय तसेच कोपिष्ट आणि अंतर्मुख असायला हव्यात, असा लोकांचा सर्वसाधारण समज असतो. परंतु अशा लोकांना माझं साहसप्रिय तसंच परिपूर्ण अस्तित्व दाखवून देऊन अचंबित करायला मला आवडतं.

व्हिडिओवरल्या शेकडो कॉमेंट्सपैकी एक सर्वसाधारण अशी : ''अशा तऱ्हेच्या मनुष्याला एवढं आनंदी पाहून मला प्रश्न पडला की कधी-कधी मी स्वत:ची कीव का करतो... किंवा मी स्वत:ला पुरेसा आकर्षक किंवा विलक्षण का समजत नाही किंवा 'काहीही' का समजतो? हा इसम हात-पाय नसतानाही आनंदी राहत असेल, तर माझ्या मनात स्वत:बद्दल असे विचार तरी कसे येऊ शकतात?''

एकच प्रश्न मला बऱ्याचदा विचारला जातो, ''निक, तू एवढा आनंदी कसा राहू शकतोस?'' तुम्हीही तुमच्या समस्यांशी दोन हात करीत असाल, म्हणूनच मी तुम्हाला लगेच सरळ आणि स्पष्ट उत्तर देतो :

अपूर्ण असलो तरी मी परिपूर्ण निक व्होयचिच आहे याचा बोध झाल्यानंतर मला आनंद गवसला. मी परमेश्वराची निर्मिती आहे, 'त्यानं' माझ्यासाठी केलेल्या योजनेनुसारच माझी घडण आहे. परंतु याचा अर्थ असा नव्हे की माझ्यात सुधारणेचा वाव शिल्लक नाही. अधिक सुधारणेसाठी मी सतत प्रयत्नशील असतो जेणेकरून मी 'त्याची' आणि जगाची अधिक उत्तम प्रकारे सेवा करू शकेन.

माझं जीवन मर्यादांनी बद्ध नाहीये, यावर माझा विश्वास आहे. तुम्हालाही तुमच्या जीवनाविषयी असाच विश्वास वाटावा असं मला वाटतं, मग तुमच्यापुढे कोणतीही

आव्हानं असोत. आपला सहप्रवास सुरू होण्यापूर्वी तुम्ही जरा विचार करा की, तुम्ही तुमच्या जीवनावर कोणत्या मर्यादा घातल्या आहेत अथवा इतरांना घालू दिल्या आहेत. आता असा विचार करा की, त्या मर्यादांपासून मुक्त असलेलं जीवन कसं असेल किंवा काहीही शक्य असल्यास तुमचं जीवन कसं असेल?

कायद्यानं मी अक्षम असलो तरी प्रत्यक्षात मात्र मी सक्षम आहे आणि त्याचं कारण म्हणजे मला हात-पाय नसणं. माझ्या दुर्मीळ आव्हानांमुळे माझ्यापुढे दुर्मीळ संधी उभ्या राहिल्या, गरजवंत असलेल्या असंख्य लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी. केवळ

कल्पना करा की, तुमच्यासाठी काय शक्य आहे!

बरेचदा आपण स्वत:ला सांगत असतो की, आपली स्वप्नं प्रत्यक्षात उतरवण्यासाठी आपण पुरेसे आकर्षक किंवा हुशार किंवा चलाख नाही आहोत. इतर आपल्याला जे काय समजतात तेच आपण स्वत:बद्दल स्वीकारतो किंवा आपण स्वत:वरच निर्बंध लादतो. सर्वांत वाईट बाब ही की जेव्हा तुम्ही स्वत:ला अपात्र समजू लागता तेव्हा अप्रत्यक्षरीत्या तुम्ही, परमेश्वर तुमच्याकरवी जे करू पाहतोय त्यावरच निर्बंध घालता!

तुम्ही तुमच्या स्वप्नांचा नाद सोडून देता तेव्हा तुम्ही परमेश्वरालाच बंदिस्त करता. शेवटी तुम्ही 'त्याची' निर्मिती आहात. त्यानं तुम्हाला निर्माण केलं ते काही विशिष्ट हेतूनं! म्हणूनच परमेश्वराचं प्रेम जसं बद्ध करता येणार नाही, त्याप्रमाणे तुमच्या जीवनावर तुम्हाला मर्यादा घालता येणार नाहीत.

माझ्याकडे पर्याय उपलब्ध आहेत. तुमच्याकडेही पर्याय उपलब्ध आहेत. निराशा आणि कमतरतांवर विचार करत राहण्याचा पर्याय खुला आहे. कटू, क्रुद्ध किंवा दु:खी राहण्याचा पर्याय खुला आहे किंवा कठीण समयाचा अथवा दु:ख देणाऱ्या व्यक्तींचा सामना करताना, अनुभवातून शिकून पुढे चालू राहण्याचा, आणि आपल्या स्वत:च्या आनंदाची जबाबदारी स्वत: पेलण्याचा पर्यायही खुला आहे.

परमेश्वराचं लेकरू असल्याकारणानं तुम्ही सुंदर आणि अनमोल आहात, जगातल्या साऱ्या हिऱ्यांहूनही किमती! तुम्ही आणि मीदेखील अगदी तसेच आहोत जसे आपण असायला हवे होतो. असं असूनही आपलं ध्येय हेच असायला हवं की, 'मी अधिक चांगली व्यक्ती बनेन आणि मोठी स्वप्नं पाहत मी माझ्या कक्षा रुंदावेन.' मार्गक्रमण करताना 'जुळवून घेणं' आवश्यक आहे, कारण जीवन कायम सुखद नसतं, मात्र ते जगण्याएवढं सुंदर निश्चितच असतं. हेच सांगण्यासाठी मी इथं आहे. तुमची परिस्थिती कशी का असेना, जोवर तुम्ही श्वास घेताय तोवर तुम्ही काही ना काही देऊ शकता.

तुम्हाला दिलासा देण्यासाठी मी तुमच्या खांद्यावर हात ठेवू शकत नाही, पण मी तुमच्याशी मनापासून बोलू शकतो. तुमचं जीवन कितीही निराशजनक असलं तरी त्यात आशेला नक्कीच वाव असतो. सध्या परिस्थिती केवढीही बिकट असली तरी पुढे चांगलेच दिवस येणार आहेत. कितीही वाईट अथवा भयानक परिस्थिती तुमच्यावर

आली तरी तुम्ही त्या परिस्थितीवर मात करू शकता. नुसती बदलाची आस धरून काही बदलणार नाही. आत्ता, या घडीला योग्य निर्णय घेऊन त्यावर कृती करण्याने सर्वकाही बदलेल!

'जीवनात घडत असलेल्या सर्व घटना या चांगल्यासाठीच एकत्र येत असतात' याविषयी मला खातरी आहे; कारण माझ्या जीवनात ते सत्यात उतरलं आहे. हाता-पायांविना असलेल्या जीवनाला कसलं चांगलं म्हणायचं? माझ्याकडे केवळ पाहून लोकांना कळतं की जीवनात येणाऱ्या अनेक अडथळ्यांना आणि कष्टांना तोंड देऊन मी त्यावर मात केली आहे. त्यामुळे माझं ऐकून त्यातून स्फूर्ती घेण्यास ते तयार होतात. माझ्या श्रद्धेत वाटेकरी होण्यास, त्यांच्यावरही प्रेम केलं जातं हे मी त्यांना सांगण्यास, आणि माझ्याकडून आशा घेण्यास ते राजी होतात.

हा झाला तुम्हाला काहीतरी देण्यातला माझा वाटा. आपलं स्वत:चं मोल ओळखणं फार महत्त्वाचं आहे. लक्षात घ्या, तुमच्याकडेही 'देण्यासारखं' काहीतरी नक्कीच आहे. सध्या जरी तुम्ही निराश असाल, तरी काही हरकत नाही. या निराशेचा अर्थच मुळी हा आहे की आत्ता तुमच्या जीवनात जे काही आहे त्याहून अधिक काहीतरी तुम्हाला हवं आहे. हे चांगलंच आहे. बरेचदा जीवनातली आव्हानंच तुम्हाला दाखवून देतात की तुम्ही प्रत्यक्षात कोण असायला हवे आहात.

**मौल्यवान जीवन**

मी ज्या परिस्थितीत जन्म घेतला होता तिचे लाभ समजायला मला पुष्कळ वेळ लागला. माझी आई पंचवीस वर्षांची होती जेव्हा तिला तिच्या पहिल्या अपत्याच्या वेळी म्हणजेच माझ्या वेळी दिवस गेले होते. ती हॉस्पिटलमध्ये सुईण होती आणि त्याचबरोबर बालरोग विभागात प्रमुख नर्स. अर्थातच, ती शेकडो बाळ-बाळंतिणींची काळजी घ्यायची. गर्भारपणात काय काळजी घ्यावी याची तिला पुरेपूर कल्पना होती, नव्हे जाण होती. ती संतुलित आहार घेत होती, औषधांच्या बाबतीत जागरूक होती, ती मद्यपान करीत नसे. एवढंच नव्हे, तर ॲस्पिरिन किंवा तत्सम वेदनाशामकंही ती घेत नव्हती. ती उत्तमोत्तम डॉक्टर्सकडून तपासून घेत होती आणि त्या सर्वांनी तिला आश्वस्त केलं होतं की सर्वकाही सुरळीत पार पडेल.

परंतु तरीही तिच्या मनातली धाकधूक दूर होत नव्हती. दिवस भरत आल्यावर,

बरेचदा तिनं आपली काळजी माझ्या वडिलांना बोलून दाखवली होती, ''मी आशा करते की आपलं बाळ व्यवस्थित असेल.''

दोन वेळा सोनोग्राफी होऊनही डॉक्टर्सना त्यात काही वावगं दिसून आलं नव्हतं. होणारं बाळ हे 'मुलगा' असल्याचं त्यांनी माझ्या आई-वडिलांना सांगितलं होतं, पण हाता-पायांविषयी त्यांनी 'ब्र'ही काढला नव्हता! माझ्या जन्मदिवशी, म्हणजेच ४ डिसेंबर १९८२ रोजी, आई प्रथम मला पाहू शकत नव्हती, त्यामुळे तिनं डॉक्टरांना पहिला प्रश्न विचारला, ''बाळ व्यवस्थित आहे ना?'' डॉक्टर्स शांत. काही सेकंद जाऊनही कोणीही तिला तिचं बाळ तिच्याकडे देत नसल्याचं जाणवून ती धास्तावली, काहीतरी गडबड होती. मला तिच्याकडे देण्याऐवजी त्यांनी मला एका बालरोगतज्ज्ञाकडे सोपवलं, पलीकडल्याच एका कोपऱ्यात. त्यांनी माझी तपासणी केली आणि त्यांची सल्लामसलत सुरू झाली. तेवढ्यात आईनं ठणठणीत आवाजातलं माझं 'ट्यॅहँ' ऐकलं आणि ती जरा आश्वस्त झाली. पण माझे वडील ज्यांनी पाहिलं होतं की मला एक हात नव्हता, ते अत्यंत दुःखी झाले होते. त्यांना ऑपरेशन थिएटरमधून बाहेर पाठवण्यात आलं.

मला पाहून धक्का बसलेले डॉक्टर्स आणि नर्सेस यांनी मला लगेच कापडात गुंडाळलं.

नर्स असलेल्या माझ्या आईनं शेकडो बाळंतपणांत साहाय्य केलेलं असल्यामुळे तिला कल्पना आली की काहीतरी विपरीत घडलं आहे आणि बाळंतपण करणाऱ्या कंपूचे चेहरे पाहताच तिची खातरीच पटली.

''काय झालंय? माझ्या बाळाला काय झालंय?'' तिनं सरळ-सरळ विचारलं. प्रथम डॉक्टर काही बोलूच शकले नाहीत, पण जेव्हा आईनं फारच आग्रह धरला तेव्हा मात्र त्यांनी तिला एका शब्दात, वैद्यकीय परिभाषेत उत्तर दिलं.

''फोकामेलिया,'' ते म्हणाले.

वैद्यकीय पार्श्वभूमी असलेल्या माझ्या आईला तत्काळ त्याचा अर्थ समजला की, शारीरिक व्यंग अथवा हात-पाय नसलेलं बाळ जन्मणं. तिचा त्यावर विश्वासच बसेना.

दरम्यान, बाहेर चिंताग्रस्त असलेल्या माझ्या वडिलांना शंका वाटू लागली होती की त्यांनी जे पाहिलं होतं ते खरंच खरं होतं का, जे पाहिल्यासारखं वाटतं होतं तेच पाहिलं होतं का? जेव्हा बालरोगतज्ज्ञ त्यांना भेटायला गेले तेव्हा ते अक्षरशः

ओरडलेच, ''माझा मुलगा, त्याला हात नाहीत!''

''खरं तर,'' शक्य तेवढ्या संवेदनशील स्वरांत डॉक्टर म्हणाले, ''तुमच्या मुलाला दोन्ही हात आणि दोन्ही पायही नाहीत.''

हे ऐकून माझ्या वडिलांच्या हाता-पायातलं अवसानंच गळालं.

काही क्षण ते तसेच, निश्चल बसून राहिले. पण मग मात्र त्यांची संरक्षणात्मक अंत:प्रेरणा कार्यरत झाली. आईनं मला पाहण्यापूर्वीच तिला या गोष्टीची कल्पना द्यावी या हेतूनं त्यांनी तत्काळ तिच्याकडे धाव घेतली, पण तिथं पोहोचल्यानंतर पाहतात तो आडवं पडलेल्या स्थितीतच आई स्फुंदत होती. कंपूनं तिला आधीच ती बातमी दिली होती. त्यांनी तिला मला भेटण्याविषयी, जवळ घेण्याविषयी आग्रह केला. पण तिनं साफ नकार देऊन मला दूर घेऊन जाण्यास सांगितलं.

नर्सेस रडत होत्या. सुईण रडत होती. आणि अर्थातच मीही रडत होतोच! अखेरीस, गुंडाळलेल्या स्थितीतच त्यांनी मला तिच्यासमोर ठेवलं. तिनं जे पाहिलं ते तिला असह्य झालं; 'हात-पाय नसलेलं तिचं बाळ.'

''त्याला दूर घेऊन जा,'' ती म्हणाली, ''मला त्याला स्पर्शही करायचा नाहीये आणि पाहायचंही नाहीये.''


अगदी आजपर्यंत माझ्या वडिलांना या गोष्टीची खंत वाटत राहिली आहे की वैद्यकीय कंपूनं त्यांना आईच्या मनाची तयारी करू देण्यास पुरेसा अवधी दिला नाही. नंतर, तिला झोप लागल्यानंतर ते मला पाहायला आले. मग ते पुन्हा आईकडे गेले आणि त्यांनी तिला सांगितलं, ''अगं, तो खूप सुंदर आहे.'' त्यांनी तिला विचारलं की आता ती त्याला पाहण्यास तयार होती का, पण तिनं पुन्हा नकारच दिला. त्यांनी तिला समजून घेतलं आणि तिच्या भावनांचा त्यांनी आदर केला.

माझा जन्म साजरा करण्याऐवजी माझ्या आई-वडिलांनी आणि त्यांच्या चर्चने सुतक पाळलं. 'परमेश्वर म्हणजेच परमेश्वराचं प्रेम असेल,'' साऱ्यांना प्रश्न पडला, ''तर तो असं काहीतरी का घडू देतो?''

◆

नवे कोरे

# रिटर्न ऑफ अ किंग




**विल्यम डॅलरिंपल**

अनुवाद

**अंजनी नरवणे / सुनीति काणे**

**किंमत : ५९५/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

अत्युच्च खप असलेल्या पुस्तकांचे इतिहासकार लेखक विल्यम डॅलरिंपल यांनी लिहिलेला हा पहिल्या अफगाण युद्धाचा भव्य-दिव्य इतिहास आहे. ब्रिटिश सेनेच्या विरोधात १८४२ साली अफगाणी जनतेनं धर्मयुद्ध पुकारलं. परदेशी सत्तेविरुद्धच्या या जोरदार उठावामुळे साऱ्या देशभरात भीषण बंडाच्या ज्वाळा भडकल्या. पाश्चिमात्यांच्या वाट्याला पौर्वात्यांकडून आलेला हा सर्वांत दारुण लष्करी पराजय होता. त्या काळी सर्वोच्च लष्करी ताकद समजल्या जाणाऱ्या ब्रिटिशांची १८,००० लढवय्यांची सेना, भारतीय शिपाई आणि अन्य लष्करी चाकर या सर्वांना अपुरी शस्त्रास्त्रं असलेल्या अफगाणी टोळ्यांनी पूर्णत: पराजित केलं.

'रिटर्न ऑफ अ किंग' हे पुस्तक, पहिल्या इंग्रज-अफगाण युद्धाचं स्पष्ट आणि निश्चित स्वरूपाचं विश्लेषण म्हटलं पाहिजे. उभय पक्षांतील अविस्मरणीय व्यक्तींच्या आयुष्यपटाद्वारे घडलेल्या घटनांचा पट लेखक उलगडत जातो. अनेक पुरस्कारांनी सन्मानित असलेले इतिहासकार विल्यम डॅलरिंपल, अफगाण इतिहास आणि अफगाणी महाकाव्यांसह नव्याने सापडलेल्या संदर्भांच्या आधारे ब्रिटिश राजसत्तेच्या वाट्याला आलेल्या सर्वांत भीषण पराजयाचं अप्रतिम शैलीत दर्शन घडवतात. त्या योगे वर्तमानकाळातील नववसाहतवादी महत्त्वाकांक्षा आणि संस्कृती यांच्या संघर्षाबाबत अत्यंत महत्त्वाचा उपदेशपर दृष्टान्त देऊन जातात. हे पुस्तक म्हणजे पहिल्या इंग्रज-अफगाण युद्धाचा विवादातीत असा स्पष्ट इतिहास आहे.

## पुस्तक परिचय




# चेस युअर ड्रीम्स

**सचिन तेंडुलकर**

जन्मानं मुंबईकर असलेल्या सचिन तेंडुलकरनं १९८९मध्ये, वयाच्या सोळाव्या वर्षी पाकिस्तानविरुद्ध कसोटीत पदार्पण केलं. प्रतिभेचं नैसर्गिक वरदान लाभलेल्या सचिनने प्रदीर्घ काळ आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रिकेट खेळत प्रेक्षकांचं भरपूर मनोरंजन केलं. कसोटी आणि एकदिवसीय क्रिकेट सामन्यांमध्ये सर्वाधिक धावा काढण्याचा आणि सर्वांत जास्त शतकं झळकवण्याचा विक्रम सचिननं प्रस्थापित केला. सतराव्या वर्षी त्यानं पहिलं कसोटी शतक काढलं, छत्तिसाव्या वर्षी एकदिवसीय क्रिकेटमध्ये द्विशतक काढणारा तो पहिला फलंदाज ठरला आणि २०१२मध्ये त्यानं आपल्या आंतरराष्ट्रीय क्रिकेट कारकिर्दीतील १००वं शतक झळकवलं. २००९मध्ये कसोटी क्रिकेटच्या जागतिक क्रमवारीत भारतानं मिळवलेलं अव्वल स्थान आणि २०११मध्ये भारतीय संघानं जिंकलेला विश्वचषक हे त्याच्या देदीप्यमान कारकिर्दीतील दोन महत्त्वाचे मानबिंदू. मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर आपल्या घरच्या प्रेक्षकांसमोर २००वा कसोटी सामना खेळून २०१३मध्ये त्यानं क्रिकेटमधून निवृत्ती घेतली.

**बोरिआ मजुमदार**

बोरिआ मजुमदार यांना ऱ्होड्सची शिष्यवृत्ती मिळाली आहे. सेंट जॉन्स कॉलेज, ऑक्स्फर्ड विद्यापीठातून त्यांनी 'भारतीय क्रिकेटचा सामाजिक इतिहास' या विषयावर प्रबंध लिहून डॉक्टरेट मिळवली. सेंट्रल लँकेशायर विद्यापीठात ज्येष्ठ संशोधक, मेलबोर्नच्या मोनाश विद्यापीठात साहाय्यक प्राध्यापक आणि 'इंडिया टुडे' गटाच्या क्रीडा विभागात सल्लागार संपादक म्हणून त्यांनी काम केलेलं आहे. Twenty Two Yards to Freedom: A Social History of Indian Cricket (2004) DeeefCe the Illustrated History of Indian Cricket (2006) ही त्यांनी लिहिलेली दोन पुस्तकं वाचकांच्या विशेष पसंतीस उतरली आहेत.




लेखक
**सचिन तेंडुलकर**

सहलेखक
**बोरिआ मजुमदार**
अनुवाद
**दीपक कुळकर्णी**

*मी अकरा वर्षांचा असतानाच माझ्या वडिलांनी मला पूर्ण स्वातंत्र्य दिलं. ते मला म्हणाले, ''तू स्वत:च्या हिमतीवर तुझी स्वप्नं साकार केली पाहिजेस, पण त्यासाठी कोणताही शॉर्टकट वापरू नकोस.''*

*२४ वर्षांच्या कारकिर्दीत प्रतिभाशाली सचिनच्या प्रभावासमोर अबाधित राहिलेले विक्रम विरळाच. कसोटी व एकदिवसीय सामन्यांत सर्वाधिक धावा काढण्याच्या विक्रमाव्यतिरिक्त १०० आंतरराष्ट्रीय शतकं झळकवणारा आणि २०० कसोटी सामने खेळणारा सचिन हा पहिला व एकमेव क्रिकेटपटू आहे. त्याची घणाघाती फटकेबाजी आणि जगाच्या कानाकोपऱ्यात कुठेही धावा काढण्याची क्षमता याबद्दलच्या कथा न संपणाऱ्या आहेत.*

*मुंबईतील एका मध्यमवर्गीय कुटुंबात वाढलेल्या, पण जात्याच अतिशय खोडकर स्वभावाच्या सचिनने मोठेपणी मात्र आपली ध्येयं कशी साध्य करावीत व आपण पाहिलेली स्वप्नं प्रत्यक्षात कशी आणावीत हे एक खेळाडू आणि कप्तान म्हणून सर्वांना दाखवून दिलं. खेळावरील अविचल निष्ठा, ज्वलंत देशप्रेम व मैदानावरील आणि मैदानाबाहेरील विनम्र वर्तणूक यामुळे तो अब्जावधी लोकांच्या गळ्यातील ताईत व नव्या पिढीचा आदर्श ठरला यात नवल ते कसलं!*

*सचिनच्या विलक्षण जीवनप्रवासातील तपशील व यशामागची गुपितं जाणून घेण्यासाठी त्याची ही आत्मकहाणी जरूर वाचा.*

**शालेय क्रिकेट... ते आंतरराष्ट्रीय क्रिकेट**

भारतासाठी क्रिकेट खेळण्याचं स्वप्न मी कायम पाहिलं होतं. ते स्वप्न पूर्ण होण्याची संधी मला इतक्या लहान वयात मिळणं हे माझं परमभाग्य होतं. माझ्या त्या पदार्पणाला आणखीही एक आगळंवेगळं महत्त्व होतं. आम्ही पाकिस्तानशी पाकिस्तानमध्ये जाऊन खेळणार होतो. पाकिस्तानकडे गोलंदाजांचा जबरदस्त ताफा होता. कसलेला लेग स्पिनर अब्दुल कादिर, नवोदित मुश्ताक अहमद, भेदक द्रुतगती गोलंदाज इम्रान खान, वासिम अक्रम, वकार युनूस व अकिब जावेद यांच्या तोफखान्याला पहिल्याच मालिकेत सामोरं जाणं हे कुणाही तरुण क्रिकेटरसाठी एक फार मोठं आव्हान होतं.

सुरुवातच अग्निपरीक्षेने होणार होती.

रणजी करंडक सामन्यात शतक झळकवल्याने माझा उत्साह वाढला होता. त्यामुळे पाकिस्तानच्या दौऱ्यावर निघताना मला बऱ्यापैकी आत्मविश्वास वाटत होता. कदाचित मी तेव्हा पोरसवदा वयाचा असल्यामुळे पाकिस्तानविरुद्ध खेळताना येणारं विशेष दडपण मला जाणवलं नव्हतं. भारत-पाकिस्तानमधील क्रिकेटला असलेल्या राजकीय पार्श्वभूमीशी मला काहीच देणं-घेणं नव्हतं. मी माझी पहिली आंतरराष्ट्रीय कसोटी मालिका खेळतो आहे, हेच माझ्यासाठी पुरेसं आव्हान होतं. शिवाय इतक्या लहान वयात भारतीय कसोटी संघातील अंतिम अकरा खेळाडूंमध्ये मला संधी मिळेल, असं कोणालाच वाटलं नव्हतं. संघाची एकूण कामगिरी पाहून फारतर एकदिवसीय सामन्यात माझी वर्णी लागू शकेल असा काहींचा होरा होता; तर केवळ आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या वातावरणाचा अनुभव मिळण्यासाठी माझी निवड झाली आहे, असं बहुतेकांचं मत होतं.

मला फक्त भारतासाठी खेळून भरपूर धावा काढायच्या होत्या. स्पर्धात्मक क्रिकेट खेळायला सुरुवात केल्यापासून मी अवघ्या पाच वर्षांत चक्क भारतीय संघात येऊन दाखल झालो होतो. शालेय क्रिकेट ते आंतरराष्ट्रीय क्रिकेट हा माझा प्रवास कमालीच्या वेगात झाला होता.

माझी दौऱ्याची सुरुवात चांगली झाली. पहिल्या कसोटीच्या आधी दोन सराव सामने खेळले गेले. त्यापैकी रावळपिंडीला झालेल्या दुसऱ्या सामन्यात मी पाकिस्तान अध्यक्षीय संघाविरुद्ध खेळताना ४७ धावा काढल्या. पाकिस्तानतर्फे पन्नास कसोटी सामने खेळलेल्या डावखुऱ्या इक्बाल कासिमने मला बाद केलं. त्या

खेळीबद्दल प्रेक्षकांनी उभं राहून मला अभिवादन केलं. त्यामुळे भारतीय कसोटी संघात कदाचित आपला समावेश होऊ शकेल, अशी आशा मला वाटू लागली. एवढंच काय, मी पहिली कसोटी कॅप मिळाल्याचं स्वप्न पाहायलाही सुरुवात केली होती. कराचीच्या पहिल्या कसोटी सामन्याच्या आदल्या रात्री माझा अंतिम अकरा खेळाडूंच्या संघात समावेश असल्याची सुवार्ता खुद्द कर्णधार श्रीकांत यांनीच मला येऊन सांगितली.

त्या वेळच्या भावना मला शब्दांतून व्यक्त करणं खरंच अवघड आहे. आजपर्यंत प्रत्येक भारतीय संघ जवळजवळ एक अब्ज भारतीयांचं प्रतिनिधित्व करत आला आहे. अशा भाग्यवान अकरा जणांच्या चमूमध्ये माझी निवड झाली होती. अर्थात अशा वेळी सन्मानासोबत तेवढीच मोठी जबाबदारीही अंगावर येते. यापुढे करोडो भारतीय क्रिकेटप्रेमी माझ्याकडून जास्तीत जास्त चांगल्या कामगिरीची अपेक्षा करणार होते. त्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्याची जबाबदारी आता माझ्यावर होती. मीही त्याचसाठी उत्सुक होतो. भारतीय संघाला व तमाम भारतीय क्रिकेटशौकिनांना अभिमान वाटेल अशी नेत्रदीपक कामगिरी माझ्या हातून घडावी, याव्यतिरिक्त माझ्या मनात दुसरी कोणतीही इच्छा नव्हती.

सलील अंकोला हा त्या वेळी माझा रूम-पार्टनर होता व तोही माझ्याबरोबरच कसोटीत पदार्पण करणार होता. सामन्याच्या आदल्या रात्री आम्ही दोघंही झोपू शकलो नाही. आम्हा दोघांच्याही जीवनात उद्यापासून एक नवीन पर्व सुरू होणार होते. आयुष्य बदलून टाकणारी संधी आपल्याला लाभली आहे, याची आम्हा दोघांनाही पुरेपूर जाणीव होती.

**कराचीतील निराशाजनक कामगिरी**

पाकिस्तानमधील पहिला कसोटी सामना १५ ते २० नोव्हेंबर, १९८९च्या दरम्यान खेळला गेला. एक भारतीय खेळाडू म्हणून जेव्हा मी मैदानावर प्रथम पाऊल ठेवलं, तो क्षण माझ्यासाठी चिरस्मरणीय होऊन राहिला आहे. मी एक मोठी झेप घेतली होती. त्या सामन्याला आणखी एक विशेष महत्त्व होतं. कपिलदेव यांचा तो शंभरावा कसोटी सामना होता. त्यामुळे आम्ही सर्व जण अधिकच उत्साहात होतो. यापूर्वी फक्त सुनील गावसकर व दिलीप वेंगसरकर यांनाच हा सन्मान प्राप्त झाला होता.

सामन्याच्या दुसऱ्या दिवशी पाकिस्तान संघाचा डाव ४०९ धावांत आटोपला.

आता फलंदाजीची आमची पाळी होती. गोलंदाजांना साथ देणाऱ्या त्या खेळपट्टीवर वासिम व वकारच्या तुफानी गोलंदाजीसमोर आमची ४ बाद ४१ अशी स्थिती झाली. मी सहाव्या क्रमांकावर फलंदाजीला उतरलो. मात्र कसोटी सामन्यातील माझ्या त्या पहिल्याच डावात वासिम व वकारसमोर मी पुरता गोंधळून गेलो. इतकी वेगवान गोलंदाजी मी त्यापूर्वी कधीही खेळलो नव्हतो. दोघांच्याही गोलंदाजीतील कसब व कौशल्य हे अव्वल दर्जाचं होतं.

मी फारच थोडा वेळ खेळपट्टीवर होतो. तोही काळ फारसा सुखावह नव्हता. मी एकूण २४ चेंडू खेळलो. त्यातील निम्म्या चेंडूंवर साफ फसलो. दरम्यान मी दोन चौकार मारले असले, तरी माझ्या बॅटिंगमध्ये जराही आत्मविश्वास नव्हता. मी १५ धावा काढू शकलो हे माझं सुदैवच म्हणायला हवं. माझ्याबरोबरच कसोटी पदार्पण करणाऱ्या वकार युनूसने माझा त्रिफळा उडवला. पॅव्हिलियनमध्ये परतताना मनाचा एकच गोंधळ उडाला होता. स्वत:वरच्या अविश्वासाने मन ग्रासून गेलं होतं.

माझ्या कारकिर्दीतला तो फार महत्त्वाचा क्षण होता. स्थानिक क्रिकेटमध्ये चमकदार कामगिरी करत मी आंतरराष्ट्रीय स्तरावर येऊन पोहोचलो होतो. पण प्रथमच आंतरराष्ट्रीय सामना खेळताना मी बॉलला साधी बॅटही लावू शकलो नव्हतो. स्थानिक व आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या दर्जातील प्रचंड तफावत मला कळून चुकली.

ती कसोटी अखेर अनिर्णित अवस्थेत संपली. त्या कसोटीत मला फक्त एकदाच बॅटिंग करायची संधी मिळाली. पुढच्या काही दिवसांत मी संघाचे प्रशिक्षक चंदू बोर्डे व माझ्या काही इतर ज्येष्ठ सहकाऱ्यांना भेटलो. फलंदाजीत सुधारणा करण्यासाठी मी नेमकं काय करायला हवं, याबद्दल मला त्यांचा सल्ला हवा होता. रवी शास्त्रीबरोबर माझी सविस्तर चर्चा झाली. त्याने मला फलंदाजीला आल्यावर पहिली १५ ते २० मिनिटं मनावर अतिशय संयम ठेवायला सांगितलं. कोणत्याही फलंदाजासाठी तो सुरुवातीचा काळ अतिशय अवघडच असतो. खेळपट्टीवर काही काळ टिकून राहणं हीच खरी गुरुकिल्ली होती, पण प्रश्न होता की मला आणखी एक संधी दिली जाईल का?

फैसलाबादच्या दुसऱ्या कसोटीसाठी निवडलेल्या खेळाडूंमध्ये माझं नाव पाहून माझ्या मनावरचा सारा ताण निघून गेला.

**फैसलाबादचे आव्हान**

माझ्या क्षमतेची व मनोनिग्रहाची दुसऱ्या सामन्यात पुरती कसोटी लागणार आहे हे मला पक्कं ठाऊक होतं. माझ्या आजपर्यंतच्या कारकिर्दीत अशा प्रतिकूल परिस्थितीला सामोरे गेलेले क्षणच मला सतत आठवत राहिले आहेत. दुबळ्या संघाविरुद्ध, निर्जीव खेळपट्टीवर कोणीही भरपूर धावा काढू शकतो, पण उत्कृष्ट गोलंदाजांविरुद्ध प्रतिकूल परिस्थितीत चांगली कामगिरी केल्यानंतरच क्रिकेटपटूला खरं समाधान मिळतं.

फैसलाबाद कसोटीत पुन्हा एकदा आम्ही अल्पावधीतच विकेट्स गमावल्या. वरची फळी कोसळल्यावर ४ बाद १०१ अशा स्थितीत मी फलंदाजीला उतरलो. या वेळेस मात्र मी माझ्या बॅटिंगच्या नैसर्गिक शैलीला मुरड घालून पहिली पंधरा मिनिटं खेळपट्टीवर टिकून राहिलो. तशा प्रकारे खेळणं माझ्यासाठी खूपच अवघड होतं. पण खेळपट्टीच्या बाउन्स व वेगाशी स्वत:ला नीट जुळवून घेतल्यावर हळूहळू माझा आत्मविश्वास वाढू लागला.

१७२ चेंडू खेळून मी माझं पहिलं कसोटी अर्धशतक झळकवलं. त्यानंतर इम्रान खाने मला ५९ धावांवर बाद केलं. तोपर्यंत संजय मांजरेकरच्या साथीने मी १४३ धावांची भागीदारी केली होती. या डावात मी चारच चौकार मारले, पण ती खेळी मला खूप समाधान देऊन गेली. त्यातून मी एक महत्त्वाचा धडाही शिकलो. तो म्हणजे, प्रत्येक वेळी धडाकेबाज सुरुवात करायला हवी असा हट्ट करणं चुकीचं आहे. त्याहून महत्त्वाचं म्हणजे आंतरराष्ट्रीय क्रिकेट आता मला पेलवता येऊ शकेल, हा आत्मविश्वास त्या इनिंग्जमुळे माझ्यात निर्माण झाला. अर्थात मला शिकण्यासारखं अजून खूप काही होतं. दुसऱ्या डावात मी आठ धावा काढून धावबाद झालो. शतकाजवळ आलेल्या महंमद अझरुद्दीनला (अझर) वाचवण्यासाठी मी स्वत:ची विकेट फेकली. अखेर पाकिस्तानला विजय न मिळवून देण्यात आम्ही यशस्वी झालो. मालिका अजूनही अनिर्णित अवस्थेत असल्यामुळे आता पाकिस्तानी खेळाडूंवर चांगलंच दडपण आलं होतं.

तिसऱ्या कसोटीसाठी आम्ही फैसलाबादहून लाहोरला पोचलो. सुरक्षेच्या कारणांमुळे संध्याकाळी हॉटेलबाहेर पडायला परवानगी नसे. मग खेळाडू आणि दौऱ्यावर आलेले भारतीय पत्रकार व छायाचित्रकारांनी एकत्र येऊन 'संडे क्लब' साजरा केला. त्या संध्याकाळी गप्पा, संगीत व खाण्यापिण्याची रेलचेल होती आणि

प्रत्येकावर भडक व रंगीबेरंगी कपडे घालण्याची सक्ती होती.

त्या संध्याकाळचा 'खाना' लाजवाब होता. लाहोरमध्ये माझ्यासारख्या खवय्यांची चंगळ असते. त्या दिवशी समोर ठेवलेले सगळे चमचमीत कबाब मी अधाश्यासारखे फस्त केले. माझ्या आवडत्या 'हलीम'वर तर मी तुटून पडलो. त्या पूर्ण दौऱ्यात मी यथेच्छ खाऊन घेतलं. वाढतं वय असल्यामुळे त्या वेळी माझं खाण्याचं प्रमाणही खूप असायचं. मॅच नसलेल्या दिवशी मी ब्रेकफास्टला खिमा पराठे व लस्सी घ्यायचो. भारतात परतताना माझं वजन वाढून मी चांगलाच सुदृढझालो होतो.

**सियालकोटमधील फटकेबाजी**


चौथी व अखेरची कसोटी सियालकोटला होती. एव्हाना पाकिस्तानचा संघ सामना जिंकण्यासाठी अगदी आतुर झाला होता. सियालकोटची कसोटी जर अनिर्णित राहिली, तर इम्रान व त्याच्या टीमसाठी ती एक प्रकारची हारच ठरली असती. सियालकोटला आल्यानंतर मला 'एमबी मलिक बॅट मॅन्युफॅक्चरिंग' या कंपनीमधून भेटीचं आमंत्रण आलं. सियालकोट हे पाकिस्तामधील बॅट निर्मितीचं प्रमुख केंद्र आहे. तिथे जाऊन मी माझ्यासाठी दोन-तीन बॅट्स निवडल्या.

माझ्या नवीन बॅट्सनी खेळायला मी खूप अधीर झालो होतो. इतका की, एका रात्री मला त्यावरूनच एक स्वप्न पडलं. मध्यरात्रीच्या सुमारास 'माझ्या बॅट्स कुठे आहेत,' असं जोरजोरात ओरडत मी खोलीबाहेर जाऊ लागलो. मी व्हरांड्यापासून जात असताना मला मणिंदर सिंग व रमण लांबा या दोघांनी पाहिलं. ते म्हणाले, "तेरी बॅट्स तो तेरे पास ही है।" पण त्यावर काहीच न बोलता मी जेव्हा तसाच पुढे चालत राहिलो, तेव्हा मी झोपेत चालतोय हे त्यांच्या लक्षात आलं. दोघांनी मला खोलीत आणून बिछान्यावर निजवलं.

माझा खेळ पाहण्यासाठी माझा भाऊ अजित, सियालकोटला आला. त्यामुळे त्या कसोटीला माझ्या लेखी विशेष महत्त्व प्राप्त झालं. डिसेंबरमधील कडाक्याच्या थंडीमुळे सियालकोटला सकाळी उशिरापर्यंत धुकं पडलेलं असायचं, त्यामुळे खेळ उशिरा सुरू होऊन वेळेआधी संपायचा. पहिल्या डावात ३५ धावांवर वासिमने मला पायचीत करेपर्यंत मी अगदी छान खेळत होतो. प्रत्येक वेळी येणारं दडपणही या वेळी मला जाणवत नव्हतं. मी काही सुरेख फटके मारले व ५१ चेंडूत ३५ धावा काढताना धावांची गतीही चांगली राखली.

नवे कोरे

# तरंग




**कल्याणीरमण बेन्नुरवार**

**किंमत : २५०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

आयुष्याच्या वाटचालीत अनेकांच्या अनुभवांचे आपण साक्षीदार असतो. कधी त्या घटनांमध्ये आपला प्रत्यक्षअप्रत्यक्ष सहभाग असतो कधी स्वेच्छापूर्वक वा आकस्मिकपणे किंवा नाइलाजाने आपद्धर्म म्हणून. अनेक व्यक्ती भेटतात. कुणी चटका लावून जातात, कुणी चटका देऊन जातात. कुणी धडा घालून देतात तर कुणी धडा शिकवतात. कालौघात पुढे कधीतरी कारणपरत्वे मनामध्ये आठवणी उचंबळून येतात; भावभावनांच्या विविध लहरींनी मन व्यापून जाते. कधी व्याकूळ होते. या आठवणींना कल्पिताच्या मखरात बसवल्यानंतर ज्या कथा निर्माण झाल्या, त्या कथांचा संग्रह म्हणजेच 'तरंग'.

या कथा वाचकाला आपल्याच अनुभवांचे किंवा अनुभूतींचे प्रतिबिंब वाटल्या शिवाय राहणार नाहीत.

आम्हाला पहिल्या डावात ७४ धावांची आघाडी मिळाली. पाकिस्तानचा पहिला डाव केवळ २५० धावांत गुंडाळला गेला. पण दुसऱ्या डावात आमचे चार गडी लागोपाठ बाद झाले. मी बॅटिंगसाठी मैदानात उतरलो तेव्हा ४ गडी बाद ३८ धावा, अशी आमची स्थिती होती आणि सामना संपायला अजून दीड दिवस बाकी होता. माझी केवळ एक धाव झालेली असताना वकारने मला एक आखूड टप्प्याचा चेंडू टाकला. बॉलच्या बाउन्सचा माझा अंदाज चुकला. माझ्या अपेक्षेपेक्षा तो सहा इंच अधिक उसळून प्रथम माझ्या हेल्मेटच्या कडेवर आपटला व मग दिशा बदलत माझ्या नाकावर आदळला. त्या वेळेस फक्त श्रीकांत व मी, ग्रिल (लोखंडी जाळी) असलेलं हेल्मेट वापरत नव्हतो. अर्थात ती काही फुशारकी मारण्याची गोष्ट नव्हती, पण तसलं हेल्मेट वापरायची मला सवयच नव्हती.

माझ्या नजरेसमोर काळोखी आली. डोकंही चांगलं जड झालं. बॉल कुठे गेलाय, हे पाहायला मी नेहमीप्रमाणे वळलो व त्या क्षणी रक्ताने माखलेल्या शर्टकडे माझं लक्ष गेलं. मला खच्ची करण्यासाठी जावेद मियांदाद मला चिडवत होता, ''अरे तुझे तो अभी हॉस्पिटल जाना पडेगा; तेरा नाक टूट गया है।'' स्टेडिअममध्ये फडकणाऱ्या एका घोषणा फलकामुळे मी अधिकच अस्वस्थ झालो. त्यावर लिहिलं होतं. 'बच्चे घर जा के दूध पीके आ।'

आमच्या टीमच्या डॉक्टरांनी माझ्या जखमेवर बर्फ लावलं. ड्रेसिंग रूममध्ये परतणार का, असं त्यांनी मला विचारलं, पण मी नकार दिला. मी जर पॅव्हिलियनमध्ये परतलो असतो, तर मी घाबरलोय असा त्याचा अर्थ झाला असता. मी मुळीच घाबरलेलो नव्हतो. मैदानावर इजा होण्याची ती काही पहिलीच वेळ नव्हती. मात्र एवढा जोरदार आघात मी प्रथमच अनुभवत होतो. मी म्हटलं, 'मैं खेलेगा।' माझ्या आत्मसन्मानासाठी ते फार महत्त्वाचं होतं. खेळपट्टीवर न डगमगता उभं राहायचं ठरवून, माझ्या मते, मी प्रतिस्पर्ध्यांना न बोलता माझा इरादा दाखवून दिला होता.

खेळ पुन्हा सुरू झाल्यावर वकारने माझ्या पायावर येणारा खोल टप्प्याचा चेंडू टाकला. तो फ्लिक करत मी चौकार मारला. त्यानंतर मी ऑफ साइडला ड्राइव्ह करत आणखी एक चौकार मारला. त्या दोन चौकारांमुळे माझ्या मनावरचा ताण निघून गेला. चहापानानंतर मी उत्तम बॅटिंग करू लागलो. संघाच्या दृष्टीने सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे तो पूर्ण दिवस मी खेळून काढला. त्यामुळे सामना अनिर्णित राखण्याची

शक्यता आता अधिक वाढली होती.

हॉटेलमध्ये पोहोचल्यावर मी वेदनाशामक गोळ्या घेऊन लवकर झोपी गेलो. दुसऱ्या दिवशी सकाळी मी कसोटीतील अखेरच्या दिवसाच्या आव्हानासाठी सज्ज होत कसोटी क्रिकेटमधील माझं दुसरं अर्धशतक झळकवलं. अखेर पाकिस्तानला त्यांच्या घरच्या मैदानात विजय न मिळवून देण्यात आम्ही यशस्वी ठरलो. त्या कामगिरीमुळे भारतीय संघाचं मनोधैर्य कमालीचं उंचावलं गेलं.

**ते गाजलेलं षटक**

कसोटी सामन्यांनंतर आम्ही पाच एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळलो. त्यातल्या एकाही सामन्यात निर्धारित ५० षटकांचा खेळ पूर्ण होऊ शकला नाही. काही सामन्यांत पावसामुळे व्यत्यय आला, तर काही सामन्यांत पाकिस्तानचा संघ पराभवाच्या छायेत असताना प्रेक्षकांनी केलेल्या हुल्लडबाजीमुळे ते अर्धवट सोडून द्यावे लागले. पहिला सामना पेशावरला १६ डिसेंबर, १९८९ रोजी खेळला जाणार होता; पण त्या दिवशीही खूप पाऊस पडला. अखेर मोठ्या संख्येने जमलेल्या प्रेक्षकांसाठी दोन्ही संघाने २०-२० षटकांचा एक प्रदर्शनीय सामना खेळण्याचं मान्य केलं. क्रिकेटच्या इतिहासातील तो कदाचित पहिलाच टी-२० सामना असावा.

भारत व पाकिस्तान या दोन संघांत खेळला जाणारा एखादा प्रदर्शनीय सामनाही अतिशय गंभीरपणे व हिरिरीने खेळला जातो. पेशावरच्या त्या सामन्यात पाकिस्तानने प्रथम फलंदाजी करून १५७ धावा केल्या. मी खेळायला मैदानात उतरलो तेव्हा आमचे तीन गडी बाद झाले होते व जिंकण्यासाठी षटकामागे ११हून जास्त धावगतीची (रन रेट) गरज होती. चांगली फटकेबाजी केली तर मॅच जिंकता येणं शक्य आहे, असं मला वाटत होतं.

पाकिस्तानचा त्या वेळचा नवोदित व होतकरू गोलंदाज मुश्ताक अहमद बोलिंग करत होता. मी त्याच्या पहिल्याच षटकात दोन षटकार व एक चौकार ठोकले. दुसऱ्या षटकाराच्या वेळी चेंडू ड्रेसिंग रूमची खिडकी फोडून आत घुसला. अब्दुल कादिर हा त्यांचा त्या वेळी अनुभवी व हुकमी गोलंदाज होता. तो माझ्याजवळ आला व म्हणाला, ''बच्चेको क्यूँ मार रहे हो; दम है तो मुझे मारके दिखाओ।'' मी त्याला म्हटलं की, तू एक महान गोलंदाज आहेस. तू मला इतके सहज फटके मारायला देणार नाहीस.

दोन षटकं बाकी होती. आम्हाला ४०हून अधिक धावा हव्या होत्या.

एकोणिसावं षटक टाकायला अब्दुल कादिर आला. त्याच्या षटकातील चेंडू मला हवे तसे, माझ्या टप्प्यात पडले आणि मी त्या ओव्हरमध्ये चार षटकार व एक चौकार ठोकत तब्बल २८ धावा काढल्या. विसावं षटक वासिम अक्रम टाकणार होता. जिंकण्यासाठी १४ धावा हव्या होत्या, पण अखेरीस आम्हाला तीन धावा कमी पडल्या. मॅच संपल्यानंतर अब्दुल कादिर खिलाडू वृत्तीने माझ्यापाशी येऊन म्हणाला, ''बहुत अच्छा बॅटिंग!''

पेशावरच्या त्या डावात मी १८ चेंडूत ५३ धावा काढल्या. माझ्या एकूण क्रिकेट कारकिर्दीवर त्या इनिंग्जचा लक्षणीय परिणाम झाला. खरंतर सियालकोटच्या कसोटी सामन्यात, प्रतिकूल परिस्थितीत मी जिद्दीने केलेली बॅटिंग मला जास्त महत्त्वाची वाटत होती. कारण त्या खेळीमुळे आम्ही सामना व मालिका वाचवण्यात यशस्वी ठरलो होतो, पण पेशावरला मी केलेली तडाखेबाज फलंदाजी हाच प्रत्येकाच्या तोंडी चर्चेचा विषय झाला होता. त्याच इनिंग्जमुळे मी भारतातल्या घराघरांत जाऊन पोचलो. पहिल्यांदाच लोक माझी स्वाक्षरी मागू लागले. स्वाक्षरी देताना मात्र मी खूपच अवघडून जायचो. पाकिस्तानला जाण्याआधी मी माझ्या मित्रांबरोबर भेळ खायला सहज बाहेर पडू शकत होतो. पण त्यानंतर जेव्हा मी मित्रांबरोबर बाहेर जाऊ लागलो, तेव्हा 'तूच का तो सचिन तेंडुलकर?' असं लोक मला अडवून विचारू लागले. मी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये तेव्हा स्थिरावलो होतो, असं म्हणणं थोडं अपरिपक्वपणाचं ठरलं असतं, तरी त्या खेळीमुळे मी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये माझा पाय घट्ट रोवला होता.

मी घरी आलो तेव्हा माझ्या आई-वडिलांना साहजिकच माझ्या कर्तृत्वाचा अभिमान वाटत होता. पण यश अवास्तव पद्धतीने साजरं करायची आमच्या घरात सवय नव्हती. माझ्या वडिलांना खूप आनंद झालाय व मनातून समाधान वाटतंय हे मला समजत होतं, पण काही झालं तरी ते आपल्या भावना भडकपणे व्यक्त करणार नाहीत हेही मला तितकंच ठाऊक होतं. माझ्या हातून काही चांगली कामगिरी झाली, तर माझी आई फक्त देवासमोर दिवा लावून मिठाई ठेवत असे. त्यापलीकडे काही नाही. अनेकदा लोक माझ्या मैदानातील कामगिरीपेक्षा माझ्या मैदानाबाहेरील वागणुकीचं अधिक कौतुक करतात. माझे पाय जमिनीवर आहेत, असं ते म्हणतात. ते जर खरं असेल, तर त्याचं सारं श्रेय माझ्या कुटुंबाला आहे.

◆

२री आवृत्ती

# जपुन टाक पाऊल!


निवेदक

**भालचंद्र पेंढारकर**

लेखक

**वसंत पुरुषोत्तम काळे**

**किंमत : २२०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




काही सुखद, स्फूर्तिदायक क्षणांसाठी, व्यक्तींसाठी आपण जगतो. संसारातली सुखदुःखं विसरण्यासाठी नाटकाला येणाऱ्या प्रेक्षकांच्या आनंदासाठी आपण जगतो. तास न् तास रांगेत उभं राहून तिकिटं काढणाऱ्या रसिकांसाठी आपण आपले घाव विसरायचे असतात. एखादा कंट्रोलर, कलाकारासाठी जादा गाडी सोडतो आणि ड्रायव्हरही बेफाट वेगानं गाडी चालवतो. कलाकाराला नाटकाच्या वेळेत गावी पोहोचल्याचा आनंद मिळवतो. दौऱ्यावर निघालेल्या 'गोवा हिंदू असोसिएशन'च्या नावाचा फलक रेल्वेच्या डब्यावर दिसताच 'रायगडला जेव्हा जाग येते' या नाटकाची आठवण होऊन, कोण्या एका स्टेशनवरचा वर्तमानपत्रवाला पोऱ्या हातातले सगळे अंक, पैसे न घेता कलाकारांना वाटून टाकतो व स्वतःवरच खूष होऊन प्लॅटफॉर्मवरून पळत जातो. या शुद्ध आनंदासाठी, निरपेक्ष प्रेमासाठी ज्ञानेश, हाच व्यवसाय करायचा असं मी तुला सांगतो.



# सीक्रेट्स ऑफ द लाइट



डॅनियन हे ‘न्यू यॉर्क टाइम्स’ने वाखाणलेल्या आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध असलेल्या ‘सेव्ह्ड बाय द लाइट’ व ‘अॅट पीस इन द लाइट’ या पुस्तकांचे लेखक आहेत. त्यांच्या पुस्तकांच्या, दौऱ्यांच्या आणि पत्नी कॅथरिन यांच्यासमवेत त्यांनी दिलेल्या व्याख्यानांच्या माध्यमातून त्यांनी जगभरातील लोकांच्या आध्यात्मिक जाणिवेत परिवर्तन घडवून आणले आहे. ‘द ट्वायलाइट ब्रिगेड–कम्पॅशन इन अॅक्शन’ ही त्यांची सेवाभावी संघटना आहे. देशातील मृत्युशय्येवरील सैनिकांना त्यांच्या अखेरच्या क्षणांत सोबत करून कसे साहाय्य करावे, याचे प्रशिक्षण या संघटनेकडून स्वयंसेवकांना दिले जाते.


लेखक

**डॅनियन ब्रिंकली**

**कॅथरिन ब्रिंकली**

अनुवाद

**सचिन रायलवार**




*सन १९७५ मधल्या एके दिवशी डॅनियन ब्रिंकली यांच्यावर वीज कोसळली व त्यात त्यांचा मृत्यू झाला. त्यानंतर २८ मिनिटांनी ते शवागारात जागे झाले.*

*या घटनेनंतर त्यांचे आयुष्यच बदलून गेले....*

*त्यानंतर ब्रिंकली यांना एक नव्हे; तर आणखी दोन 'मृत्युसमीप अनुभव' आले. या पुस्तकाच्या रूपाने त्यांनी पारलौकिक आयुष्यात शिकायला मिळालेले धडे व*

*'पवित्र अस्तित्वां'कडून मिळालेली अंतर्दृष्टी तपशीलवारपणे सांगितली आहे.*

*स्वर्गाच्या इच्छेनुसार, सुज्ञपणा, विनोदबुद्धी आणि दुसऱ्यांबद्दलची अनुकंपा यांच्या मदतीने आपण कसे जगावे, हेही ब्रिंकली यांनी विशद केले आहे.*

*या पद्धतीने जीवन व्यतीत केल्यास आपल्याला मृत्यूनंतरच्या जीवनातही समाधानाची प्राप्ती होईल, असे ते म्हणतात. जीवनाचे 'खरे' उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी या 'प्रकाशरूपी रहस्यां'ची नक्कीच मदत होईल!*

**आणखी एकदा आयुष्य धुळीला मिळाले**

*आपले भवितव्य घडविण्यासाठी आपला भूतकाळ सोडून देण्याची आपली तयारी असलीच पाहिजे.*

*– कार्ल श्मिड्ट*

तो १९९७ सालचा ऑगस्ट महिना होता. मला आठवते त्याप्रमाणे उन्हाळ्यातील त्या दिवशी अत्यंत उबदार आणि दमट हवामान होते. पश्चिम किनाऱ्यावरील माझे काम उरकल्यावर प्रतिक्षेत असलेल्या टॅक्सीकडे जाताना समाधानाच्या भावनेने माझे मन भरून गेले होते. लॉस एंजेलिसमधील माझ्या बैठका सुदैवाने अगदी माझ्या नियोजनाप्रमाणे पार पडल्या होत्या. त्या काळात घेतलेल्या कठोर परिश्रमांमुळेच माझ्या आयुष्यातील सर्वांत महत्त्वाच्या टप्प्याचा पाया व्यवस्थित घातला गेला होता. पश्चिम लॉस एंजेलिसमधील सैनिकांच्या रुग्णालयात मी 'ट्वायलाइट बिग्रेड – कंपॅशन इन ॲक्शन' या संस्थेची स्थापना करण्यासाठी आवश्यक असलेल्या सामंजस्य-करारावर स्वाक्षरी केली होती. आयुष्याची शेवटची घटका मोजत असणाऱ्या आपल्या शूर सैनिकांच्या उशा-पायाशी बसून, त्यांना त्यांच्या अखेरच्या क्षणात सोबत करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेची स्थापना करण्याचे काम पूर्णत्वास येत होते. ना-नफा, ना-तोटा तत्त्वावर काम करणाऱ्या या संस्थेचे हे काम मोठे आणि कष्टाचे होते. ते काही सेवाभावी लोकांच्या मदतीनेच पूर्णत्वास येत होते. त्या संस्थेची स्थापना हा माझ्या अगदी जिव्हाळ्याचा विषय होता. हे काम करून मी स्वर्गातील तेरा दैवी अस्तित्वांनी माझ्यावर सोपवलेल्या आणखी एका कामगिरीची पूर्तता केली होती. ती म्हणजे या भूतलावर आध्यात्मिक भांडवलशाहीची स्थापना करणे. याच आध्यात्मिक भांडवलशाहीच्या पायावर मी आरोग्य-केंद्रांची उभारणी करणार होतो.

ॲटलांटाकडे जाणारे माझे विमान साधारणतः दुपारच्या जेवणाच्या वेळी सुटणार होते. एकदा विमानात चढल्यावर मिळालेल्या यशाची चव निवांतपणे मनात घोळवावी, या अपेक्षेने मी माझ्या सीटवर जाऊन बसलो. परंतु अचानक सुरू झालेल्या तीव्र डोकेदुखीच्या वेदनांनी माझे लक्ष स्वतःकडे वेधून घेतले. ती डोकेदुखी खरेतर दिवसभरात अधूनमधून डोके वर काढत होती; परंतु आतापर्यंत मी त्या डोकेदुखीकडे दुर्लक्ष केले होते.

माझे विमान सुमारे ३५ हजार फुटांवर पोचले असेल. त्याच वेळी जोरदार

वेदनांची जाणीव मला खूपच तीव्रतेने झाली. एवढ्या उंचीमुळे माझ्या डोकेदुखीची तीव्रता वाढतच चालली होती. माझ्या डोक्याच्या आत उजव्या बाजूला अचानक काहीतरी फुटल्याची जाणीव मला झाली. त्याच्यानंतर लगेच माझ्या मेंदूच्या आतला दाब कमी झाल्यासारखा वाटला आणि सर्व शरीरभर मला प्रचंड अशक्तपणा जाणवू लागला. अचानक झालेल्या शक्तिपातामुळे मी घाबरून गेलो. त्याच वेळी डोक्यात प्रकाशाचे प्रखर किरण घुसल्यासारखे मला वाटू लागले. भर दिवसाच माझ्या नजरेसमोर अक्षरश: तारे चमकू लागले. त्यानंतर अचानकच ती डोकेदुखी थांबली. परंतु दहा मिनिटांनंतर पुन्हा एकदा माझे डोके खूप दुखू लागले. नव्हे; ते आता तडकू लागले होते. पुढच्या साडेतीन तासांपर्यंत अविश्वसनीय वाटावी, एवढी तीव्र वेदना मी सहन केली. माझे डोके थोडेसेही हलवले किंवा माझ्या पापण्यांची उघडझाप जरी केली; तरीही मला प्रचंड वेदना होऊ लागल्या. त्यामुळे माझ्या डोक्याची नक्कीच शकले होतील, असे मला वाटू लागले.

दक्षिण कॅरोलिनातील आईकेन येथील माझ्या घरी मी मध्यरात्री कसाबसा पोचलो. मात्र मी तिथपर्यंत कसा पोचलो ते मला आज पुसटसेही आठवत नाही. त्या जीवघेण्या यातनांमधून त्या रात्री मी कसा निभावून गेलो, त्याविषयी मी काहीच सांगू शकत नाही. चमत्काराची गोष्ट म्हणजे दुसऱ्या दिवशीची पहाट उगवली. उभे राहण्याचा प्रयत्न करत मी माझा बिछाना जोरात ढकलत होतो. त्याच वेळी समोरच्या दरवाजातून माझे वडील आत आल्याचे मला आठवते. त्याच क्षणी माझ्या मेंदूत आणखी एक स्फोट झाला आणि मी धाडकन जमिनीवर पडलो. त्या वेळी माझे वडील माझ्याकडे आश्चर्यचकित होऊन पाहत असल्याचे माझ्या लक्षात आहे. मी खाली पडलो, तेव्हा माझ्या छातीवर व हातावर बसलेल्या मारामुळे झालेल्या अंतर्गत रक्तस्रावामुळे मला वेदना होऊ लागल्या.

माझ्या वडिलांच्या ते लक्षात आले. श्वास घेण्यासाठी मी प्राणांतिक धडपड करत होतो. शब्द उच्चारण्याच्या माझ्या प्रत्येक प्रयत्नाबरोबर माझी वाणी आणखीच अस्पष्ट होत गेली. पृथ्वीवरचा तो माझा शेवटचा दिवस होता, असे तेव्हा मला मनापासून वाटले. एकतर माझ्या रक्तात गुठळी झाली होती किंवा माझ्या मेंदूतील रक्तवाहिन्यांचा आकार अचानकच अनैसर्गिकरीत्या बदलला तरी होता. दुःखाने माझ्या वडिलांच्या डोळ्यांत निर्माण झालेले भीतीची सावट पाहून माझे मन भरून गेले. मी त्यांना अशा

अवस्थेत दिसू नये, असे मला मनापासून वाटत होते. आतापर्यंत बऱ्याच वेळा हे दु:ख मी त्यांना दिले होते.


माझे वडील नेहमीच माझ्यासाठी हिरो होते. त्या क्षणी त्यांच्या मनात उचंबळून आलेल्या दु:खाच्या भावना माझ्या सहनशक्तीपलीकडच्या होत्या. त्यांच्यापासून माझे दु:ख लपवण्यासाठी मी डोळे मिटून घेतले. अलीकडे मला मिळालेल्या आध्यात्मिक विजयांमध्ये थोडेफार समाधान शोधण्याचा प्रयत्न मी मनातल्या मनात केला. 'ट्वायलाइट बिग्रेड'ची स्थापना करून मी ज्या कार्याला सुरुवात केली होती, त्याचा वेग आता कशानेही थोपवता येणार नव्हता. अमेरिकन सैनिक हे आमच्या देशातील हिरो होते. त्यांच्या मृत्युशय्येशेजारी बसलेल्या व त्यांच्या कर्तृत्वाची जाण असलेल्या आमच्या स्वयंसेवकांच्या रूपाने एक दमदार फळी आता निर्माण झाली होती. खरोखरच जर तो दिवस माझ्या आयुष्यातील अखेरचा दिवस असेल, तर मी आता त्या स्थित्यंतराला अभिमानाने सामोरा जाण्यास सज्ज झालो होतो. कारण मला माहिती होते की, 'ट्वायलाइट ब्रिगेड'च्या स्थापनेमुळे माझा आत्मसन्मान योग्य प्रकारे जोपासला गेला होता.

सुरुवातीच्या धक्क्यातून बाहेर आल्यानंतर, मला रुग्णालयात पोचवण्याची काळजी आता माझे वडील करू लागले. त्यांनी मला जमिनीवरून उठवून झोपण्यासाठी पलंगावर नेले. माझी भोवळ जाईपर्यंत मला तिथेच थोडा वेळ पडू द्यावे, असे मी त्यांना सुचवले. नीट झोपण्यासाठी त्यांनी मला मदत केली. शुद्धीवर राहणे माझ्यासाठी खूपच कठीण बनत चालले होते. माझ्या डोक्यातील वेदनेमुळे माझी दृष्टीही क्षीण झाली होती. मला अंधुक दिसू लागले होते. तरीही चार्लस्टनपर्यंत मला नेऊ शकेल, अशा माझ्या एका मित्राला दूरध्वनी करणे मला कसेबसे जमले. माझे वडील त्या परिस्थितीत काहीही करू शकत नव्हते हे मला कळत होते. चार्लस्टनमधील रुग्णालयात पोचण्यास दोन तास लागले. तो वेळ मला दोन वर्षांसारखा वाटला. आम्ही रुग्णालयात येत असल्याचे त्यांना दूरध्वनीवरून कळवले होते, त्यामुळे डॉक्टर्स आणि अतिदक्षता विभागातील कर्मचारी तयारीत होते.

नंतरच्या दोन-तीन दिवसांत काय घडले याची मला अगदी अंधूक आठवण आहे, कारण मी तेव्हा जागृतीच्या आणि विस्मृतीच्या विविध अवस्थांतून जात होतो. अविरत

२री आवृत्ती

# शेष




## स्वाती चांदोरकर

**किंमत : २००/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

भूक माणसाला किती लाचार बनवते! आम्ही सगळ्या बहिणी दोन वेळचं पोटाला काही मिळावं म्हणून वणवण करत होतो. वय लहान आणि भूक मोठी. जेवणाच्या वेळेला कुणाच्या तरी दारात जाऊन उभं राहायचं. नाइलाज म्हणून त्या घरातली बाई आत बोलवायची आणि मग तिच्या रागासकट, तिच्या जिव्हारी लागणाऱ्या शब्दांसकट जे पानात पडेल ते गिळायचं. त्या घरातल्या पुरुषाची नजर अंगावरून फिरत राहायची. किळस यायची- जणू ती नजर नग्न करत आहे. पण निर्लज्ज व्हायचं; कारण पोटात भुकेचा वणवा पेटलेला असायचा. आणि तोच वणवा त्या पुरुषाच्या नजरेत पेटलेला असायचा.

दोन्ही भुका शारीरिक.....एक भूक वणवा शमवणारी आणि एक भूक वणवा अजून चेतवणारी...

वेदनांमुळे मी सुन्न झालो होतो. त्यामुळे मला सर्व गोष्टींचे आकलन व्यवस्थित होत नव्हते. मला आजही त्याविषयी काहीही नीटसे आठवत नाही. पण वैद्यकीय चाचण्यांनंतर माझ्या मेंदूतील रक्तवाहिन्यांचा आकार अनियमितपणे बदलल्याचे मला सांगण्यात आल्याचे मला आठवते. शिवाय माझ्या मेंदूत झालेल्या रक्तस्रावामुळे माझ्या उजव्या 'टेंपोरल लोब'मध्ये तीन गाठी झाल्या होत्या, हेही स्पष्ट झाले होते. मुळात रक्तवाहिन्यांचा आकार बदलण्याची गोष्ट शस्त्रक्रियेपलीकडची होती. तसेच त्या गाठींमुळे माझ्या जिवाला तातडीने धोका निर्माण झाला होता, असे मला सांगण्यात आले होते. हृदयाच्या प्रत्येक ठोक्याबरोबर माझ्या मेंदूच्या पोकळीत भरपूर प्रमाणात रक्त फेकले जात होते आणि ते तिथेच साचत होते. त्यामुळेच तिथे असह्य ताण निर्माण झाला होता. त्यातून माझा मेंदू कवटीच्या डाव्या बाजूला जोरात ढकलला जात होता. हा ताण जर कायम राहिला असता,

तर माझा मृत्यू अटळ होता. यावरील औषधे पुष्कळ अंशी निष्प्रभ ठरत होती. मात्र तरीही डॉक्टर मला त्या औषधांच्या साहाय्यानेच थोडाफार तरी आराम मिळवून देऊ शकत होते. त्यानंतरचे कित्येक दिवस मी ही नरकयातना भोगत राहिलो होतो. तो ताण कमी करून वेदना दूर करण्यासाठी शस्त्रक्रिया करणे आवश्यक होते. परंतु माझे रक्त खूपच पातळ झाल्यामुळे त्या अवस्थेत ती शस्त्रक्रिया करणेही शक्य नव्हते.

मागे, माझ्या हृदयावर शस्त्रक्रिया (ओपन हार्ट सर्जरी) झाल्यापासून माझे रक्त पातळ करण्यासाठी मला औषधाचा मोठा डोस दिला जात होता. मी रोज ३० मिलिग्रॅमपर्यंतचा डोस घेत होतो. त्यामुळे माझे रक्त एवढे पातळ होत चालले होते की, माझ्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली असती, तर मी अतिरिक्त रक्तस्रावाने नक्कीच शल्यचिकित्सागृहात मरण पावलो असतो. त्यामुळे रक्त पातळ करण्याची औषधे थांबवून पुरेशा प्रमाणात रक्त घट्ट होण्याची वाट पाहण्याशिवाय काहीच गत्यंतर नव्हते.

रुग्णालयात अनेक दिवस कोंडल्यासारखा राहिल्यानंतर थोडाफार तरी विरंगुळा मिळावा, या प्रबळ इच्छेपोटी काही काळ बाहेर पडण्यासाठी मी मनाची तयारी केली. यासाठी एका मित्राला मी राजी केले. रुग्णालयातून बाहेर पडण्यास त्याने मला मदत केली आणि नंतर तो मला थेट समुद्रकिनाऱ्यावर घेऊन गेला. त्या शांत एकांतात अटलांटिक महासागराच्या त्या विशाल, अमर्याद निळ्याशार जलाशयासमोर

बसल्यावर त्या दिवशी काहीतरी चमत्कार घडला. मला भेडसावणाऱ्या सगळ्या चिंता खूप मागे सोडून माझ्या आत्म्याने तिथून खूप उंच भरारी घेतली.

पृथ्वीवर उडण्याचे आणि खऱ्या अर्थाने मुक्तपणे श्वास घेण्याचे स्वातंत्र्य मी पुन्हा एकदा अनुभवले. मनाच्या त्या स्थिर अवस्थेत माझ्या आयुष्याचा प्रामाणिकपणे आढावा घेण्यात मी पुढील काही तास घालवले. माझ्या आयुष्याकडे मागे वळून बघताना मी केलेल्या चांगल्या कामांमुळे माझे मन अभिमानाने भरून आले. काही गोष्टी अशा होत्या; ज्या मी अजून चांगल्या रितीने करू शकलो असतो. प्रामाणिकपणाच्या लख्ख प्रकाशात स्व-परीक्षण करताना दु:खाच्या आणि पश्चातापाच्या क्षणांमधून आयुष्याने सुखाचे क्षणही दिल्याचे मला जाणवले. खरेतर उच्छृंखल तारुण्याच्या त्या दिवसांपासून मी आता खूपच पुढे चालून आलो होतो. तसा मी अजूनही कधीकधी मूर्खासारखा वागत होतो, पण क्वचितच. ते काहीही असो; पण पृथ्वीवरील माझ्या अस्तित्वाच्या त्या वेळी घेतलेल्या आढाव्यातून मला एक प्रकारचे आध्यात्मिक पूर्णत्वाचे शांत, परिपूर्ण समाधान नक्कीच मिळाले. माझा पृथ्वीवरचा वेळ जर खरोखरच संपत आला असेल, तर आत्मचिंतनाच्या त्या दिवसाचा मी ऋणी होतो. मी शांतपणे या जगातून गेलो असतो; पण माझी अंत:प्रेरणा मला सांगत होती की, गोष्टी वाईटाहून अधिक वाईट होण्याकडे चालल्या होत्या.

रुग्णालयातील दुसऱ्या आठवड्यातील माझ्या मुक्कामात माझे काळाचे भान पूर्णपणे हरपले होते. माझी वेदना कशानेही थांबत नव्हती. माझी ताकद मात्र सातत्याने, झपाट्याने खचत चालली होती. मी अशक्त होत चाललो होतो. अविरत वेदना अत्यंत क्रूरपणे माझ्या आत्म्याचे खच्चीकरण करत होती. माझे सर्व मनोव्यापारही तिच्यामुळे थांबत होते. अखेरपर्यंत लढण्याचा निर्धार करून शुद्धीवर राहण्यासाठी व माझ्या शरीरात होत असलेल्या बदलांविषयी पूर्णपणे जागरूक राहण्यासाठी, मी लढत होतो. संघर्ष सुरू होता. त्यासाठी हेडसेटच्या माध्यमातून मी फक्त उपचारात्मक स्वरूपाचे ध्वनी ऐकण्यावर माझे लक्ष केंद्रित केले. माझ्या खोलीच्या दरवाजाबाहेरच सुरू असलेल्या वैद्यकीय गोंधळाचा आवाज ऐकणे मी जवळजवळ पूर्णपणे टाळले होते. मनातल्या मनात मी आत्मिक शांततेच्या पवित्र स्थितीत आणि चिंतनाच्या विश्वात राहण्याचा प्रयत्न करत होतो. माझ्या पहिल्या मृत्युसमीप अनुभवादरम्यान मला त्या अवस्थेचा परिचय झाला होता. आणि जेव्हा जेव्हा शक्य होईल, तेव्हा तेव्हा त्या

अवस्थेत राहण्याचा मी प्रयत्न करत होतो.

स्वत:ला जाणिवेच्या एका वेगळ्या पातळीवर नेल्यावर मी हेतुपुरस्सर एका नव्या मितीमध्ये प्रवेश करू शकत होतो. त्यामुळे किमान काही काळापुरती तरी माझी वेदनांपासून सुटका होऊ शकत होती. माझ्या त्या शरीरबाह्य प्रवासांदरम्यान, माझ्या सूक्ष्म शरीरात असलेली शक्ती माझ्या भौतिक शरीरात ओतण्यास मी शिकलो होतो. सूक्ष्म शरीराबाबत सांगायचे झाल्यास वेदना वा क्लेश; या गोष्टी त्याच्या बाबतीत अस्तित्वातच नव्हत्या. केवळ एका आवाजावर लक्ष केंद्रित करून आणि माझ्या घशात एक प्रकारचा ध्वनी निर्माण करून मी तसे करत असे. त्यानंतर मी एखादा रंग डोळ्यांसमोर आणत असे. माझ्या बाबतीत निळा आणि जांभळा हे सर्वोत्तम रंग होते. कारण त्यांची आध्यात्मिक वारंवारता विशेषत्वाने उच्च प्रकारची होती. त्या रंगाने माझे संपूर्ण अस्तित्व व्यापून टाकेपर्यंत मी त्याला माझ्या मनश्चक्षूंसमोर धरून ठेवत असे. माझे अस्तित्व व्यापून टाकून तो रंग नंतर खाली सांडून जात असे. माझ्यावर उपचार करण्याएवढा आध्यात्मिक वेग त्या रंगात अवतीर्ण झाला, की मग तो रंग सर्वत्र पसरत असे. मी जसजसा ही पद्धत नियमितपणे वापरू लागलो, तसतसे या दोन जगांमधले अंतर कमीकमी होत गेले. मला पैलतीरावरच्या त्या जगात पोचण्यास लागणारा वेळ कमीकमी होऊ लागला.

जिवंत राहण्यासाठी वेदना सहन करत मी जीवघेणा संघर्ष करत होतो. त्या संघर्षाची सुरुवातीची काही आवर्तने सहन करणे मला केवळ शरीरबाह्य प्रवास करण्याच्या या तंत्रामुळे शक्य होत होते. या लढ्यात मी जिवंत राहण्याची फक्त आठ टक्केच शक्यता असल्याचे डॉक्टरांनी मला सांगितले होते. त्यामुळे तशी माझ्या जगण्याची शक्यता जवळजवळ नव्हतीच. मी लवकरच मरणार होतो, याविषयी कोणाच्याही मनात बिलकूल शंका नव्हती. या दरम्यान रेडिओवरील संचालक आर्ट बेल आणि त्यांची पत्नी रेमोना हे दोघे नेवाडासारख्या दूरच्या ठिकाणाहून मला धीर देण्यासाठी चार्लस्टनला आले होते.

ते तिथे आल्याबद्दल मी त्यांचा किती ऋणी आहे, हे मी शब्दांतून कधीच व्यक्त करू शकणार नाही.

◆

नवे कोरे


# प्र ति रू प

**प्रिया कुमार**

अनुवाद

**स्वाती काळे**

**किंमत : १९५/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**




'प्रतिरूप' हे पुस्तक म्हणजे प्रिया कुमार या लेखिकेने असंख्य अडचणींवर मात करीत मिळवलेल्या विजयाची कहाणी आहे. अनेक वर्षांपूर्वी तिला या जगापासून दूर जायचे होते. ती नेदरलँडला जाते. तेथील एका विशिष्ट जमातीने केलेल्या काही विधींमुळे तिला समजते की, चुकीची जागा सुयोग्य होऊ शकते ती फक्त स्वतःच्या अंतर्मनातच! जर आपले अंतर्मन 'योग्य' दिशेने नेले तर बाह्य जगात कोणतीच गोष्ट चुकीची नाही. या पुस्तकातील प्रत्येक पानावर लेखिकेचा प्रामाणिक झगडा आणि त्यावर तिने मिळवलेल्या विजयाचे वर्णन आहे. सत्य घटनेवर आधारित ही कहाणी व्यावसायिक किंवा वैयक्तिक आयुष्यात प्रत्येकाला सन्मार्गाकडे नेईल.


या पुस्तकात अंतर्मुख करायला लावणारे अनेक विचार आणि अनेक सत्यता आहेत. अंतर्मनाला जागृत करून समृद्ध करण्याची शक्ती आहे. हे पुस्तक वाचकाला मार्गदर्शन करेल. हसवेल. स्फूर्ती देईल आणि हृदयाला स्पर्श करेल. अतिशय महत्त्वाचे म्हणजे असंख्य अडचणींवर मात करायला शिकवेल. प्रिया कुमार ही सकारात्मक विचारांवर बोलणारी वक्ता तसेच आघाडीची लेखिका आहे. तिची लेखनशैली संवादात्मक व अतिशय परिणामकारक आहे.

# पुस्तक परिचय



*धैर्याची वहिवाट म्हणजेच सर्वोत्तम परिणामांप्रत पोहोचण्याचा यशस्वी मंत्र*

# फिश!






स्टिफन सी. लन्डिन यांनी बिग ट्युनाची Ph.D प्राप्त केली आहे. ते एक लेखक आणि वक्ते तर आहेतच. जोडीला ते फिल्म्सदेखील बनवतात. त्यांनी दोन उत्कृष्ट सेमिनार्सचं डिझाईन केलं आहे. प्रसिद्ध फिश कॅम्प्स इथे ते मुख्य समुपदेशक म्हणून काम बघतात. फिश बोधकथांच्या रोमहर्षक आणि प्रेरणादायी प्रवासाचे मार्गदर्शक म्हणूनही ते भूमिका निभावतात.

जॉन क्रिस्टेन्सेन हे देखील फिल्म्स बनवितात. ते चार्टहाऊसचे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत आणि चार्ट हाऊस हे फिश फिलॉसॉफीचं जन्मस्थान आहे. जॉनच्या नेतृत्वाखाली चार्टहाऊसने बनविलेल्या फिश या फिल्मला सर्वाधिक प्रेक्षक लाभले आहेत. फिशच्या प्रवासासंदर्भात तयार झालेले सर्व कार्यक्रम जॉनच्या परिपक्वतेचे फलित आहे.

हॅरी पॉल हे एक नावाजलेले वक्ते, लेखक आणि सल्लागार आहेत. ते कॅलिफोर्नियातील पोवे येथे राहतात.

लेखक
**स्टिफन सी. लन्डिन**
**जॉन क्रिस्टेन्सेन**
**हॅरी पॉल**
अनुवाद
**डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके**




*आज परिस्थिती अशी आहे, की लोकांना आनंदाच्या, चैतन्याच्या शोधात इतरत्र जावं लागत आहे. शुक्रवार आला की, सुटकेचा नि:श्वास टाकणाऱ्यांची वाढती संख्या पाहिली की, याची प्रचिती येते. हे सर्व थांबवावंसं वाटतं आहे का? आता ते सहजशक्य आहे. तुम्ही फिश वाचा, तुमच्या सहकाऱ्यांना त्याबद्दल सांगा, त्यांना तुमच्या योजनेत सहभागी करा. या पुस्तकाद्वारा लन्डिन, पॉल आणि क्रिस्टेन्सेन यांनी ज्या चार क्लृप्त्या तुमच्यासमोर ठेवल्या आहेत, त्या आत्मसात करा आणि मग बघाच कमाल! मी तुम्हाला ठामपणे सांगतो की, फिशमुळे प्रत्येक व्यवस्थापकाचा भरभरून फायदाच होईल.*

**रूटीनमध्ये बदल**

मेरी जेननी फोन ठेवला आणि ती दुसऱ्यांदा लिफ्टकडे निघाली. आता ती प्रचंड त्रासली होती, खरंतर भडकली होती. आपल्या तंद्रीत चालताना तिने नेहमीचा रस्ता न पकडता, फर्स्ट स्ट्रीटला येऊन उजवीकडचा रस्ता पकडला. आपल्याला विचार करायला जास्त वेळ हवा आहे, हे तिला जाणवलं. 'विषारी ऊर्जेचा कचरा डेपो' या शब्दांनी तिच्या मनात घर केलं होतं.

'विषारी ऊर्जेचा कचरा डेपो!' आता याच्यापुढे काय? आपल्याच नादात चालत असताना तिच्या मनात एक विचार चमकला. 'तिसऱ्या मजल्यावरच्या या विषारी ऊर्जेचाच तर तुला सर्वांत जास्त तिरस्कार वाटतो, नाही का? काहीतरी करायलाच हवं आहे!'

आज चालण्यासाठी तिने दुसरा रस्ता निवडला होता. शहराच्या या भागात ती कधी आली नव्हती. अचानक तिला अनेकांच्या हसण्याचे आवाज जाणवले. आवाजाच्या रोखाने तिने पाहिलं, तर तिच्या डाव्या बाजूला असलेल्या पब्लिक मार्केटमधून ते हसणं ऐकू येत आहे, हे तिच्या लक्षात आलं. तिला आश्चर्यही वाटलं. ती त्या मार्केटबद्दल ऐकून होती. पण आर्थिक अडचणी आणि दोन लहान मुलं यामुळे ती शक्यतोवर कुठलंही खास मार्केट टाळत असे. जोवर तिच्या नवऱ्याचं मेडिकल बिल संपूर्णपणे भरलं जाणार नव्हतं, तोवर काटकसरीला पर्याय नव्हता. मोह टाळण्याकरता मोहमयी वाटा टाळणंच गरजेचं होतं. अर्थात, या रस्त्यावरून ती गाडीने गेली होती, पण आज पहिल्यांदा ती इथे पायी चालत आली होती.

पाइक प्लेसच्या दिशेने ती वळली आणि तशीच चालत पुढे आली. तिथल्या एका फिश-मार्केटमध्ये खूप गर्दी आहे आणि गर्दीतला प्रत्येक जण खूप हसतो आहे, हे तिच्या लक्षात आलं. त्या गर्दीतले सगळे जण चांगल्या कपड्यांमध्ये होते. तिथे पोहोचल्यावरही तिच्या मनावर तिसऱ्या मजल्याचा इतका प्रचंड ताण होता की, त्यातून बाहेर पडून त्या सगळ्यांबरोबर हसणं तिला नकोसं वाटलं. 'त्यापेक्षा इथून निघून गेलेलं बरं' या विचारांनी ती वळलीसुद्धा, पण तेवढ्यात तिला वाटलं की, इथल्या छानशा वातावरणाने आपल्या मनावरचं मळभ दूर होईल. तिने पुन्हा मार्केटच्या दिशेने पावलं टाकली. तेवढ्यात एका मासे विक्रेत्याने जमलेल्या सगळ्यांना आवाज दिला, ''गुड आफ्टरनून, योगर्ट डूड्स!'' त्याबरोबर साधारण १२-१५ जणांनी आपल्या हातातले योगर्टचे कप उंचावत त्याला सलामी दिली. 'अरे देवा! कुठे येऊन पोहोचले आहे मी?' मेरी जेनने स्वत:ला विचारलं.

जगप्रसिद्ध 'पाइक प्लेस फिश-मार्केट'

'तो मासा हवेतून उडत आला की काय? आपले डोळे आपल्याला फसवताहेत बहुधा!' तेवढ्यात पुन्हा एक मासा उडत आला. तिथल्या सगळ्याच विक्रेत्यांनी एकसारखे पांढरे एप्रन्स बांधले होते आणि काळे रबरी बूट चढवले होते. त्यातल्याच एकाने एक मोठा मासा उचलला आणि तो उभा होता तिथून साधारण वीस फूट

अंतरावर असलेल्या काउंटरच्या दिशेने भिरकावला. तो मासा जणू उडत असल्यागत भासत होता. 'हा पाहा साल्मन निघाला मिनेसोटाकडे!' त्याने आरोळी ठोकली. त्याबरोबर इतर विक्रेत्यांनी त्याची री ओढली. काउंटरजवळ उभ्या असलेल्या दुसऱ्या विक्रेत्याने उडत आलेल्या त्या साल्मनला अचूक झेललं, तेही फक्त एका हाताने. त्याच्या या अप्रतिम झेलाला सर्व लोकांनी टाळ्या वाजवून सलामी दिली. त्यानेही मोठ्या डौलाने मान झुकवून या कौतुकाचा स्वीकार केला. तिथलं वातावरण एका अनोख्या ऊर्जेनं भारलेलं होतं.

तिला तिच्या उजव्या बाजूला एक गमतीदार दृश्य दिसलं. एका विक्रेत्याच्या हातामध्ये एक मोठा मासा होता आणि तो त्या माशाचं तोंड अशा प्रकारे हलवत होता, जेणेकरून तो मासा बोलतो आहे, असा भास व्हावा. हा बोलणारा मासा पाहून तिथे उभा असलेला एक लहान मुलगा अगदी थक्क झाला होता. दुसऱ्या बाजूला थोडासा प्रौढवाटणारा, विरळ पांढऱ्या केसांचा विक्रेता 'प्रश्न आहेत का प्रश्न? माशांवरच्या प्रश्नांची मिळतील तुम्हाला उत्तरं' असं विचारत फिरत होता. कॅश काउंटरजवळ एक तरुण विक्रेता अनेक खेकड्यांचं 'जगलिंग' (हातचलाखी करून जादू एकप्रकारे खेळ करणे.) करत होता. तेवढ्यात कोणीतरी खूप जोरजोरात हसताहेत असं तिला जाणवलं. त्या दिशेने तिने पाहिलं, तर पोट धरून हसणारे कर्मचारी तिला दिसले. त्यांचा विक्रेता त्यांनी विकत घेतलेल्या माशांसमवेत अनोखा संवाद साधत होता. एकंदरीत काय, तर त्या ठिकाणी जबरदस्त धमाल चालू होती. त्या वातावरणात आपल्या मनावरील ताण निवळतो आहे, याची तिला जाणीव झाली.

आपले योगर्टचे कप हातात उंच धरून दाद देणाऱ्या तिथल्या त्या लोकांकडे पाहून तिच्या मनात आलं, 'ऑफिसमध्ये जाणारे हे कर्मचारी मासे विकत घ्यायला इथे येतात की इथे चालणारी धमाल अनुभवायला?'

त्या एवढ्या गर्दीत एका विक्रेत्याचं लक्ष आपल्याकडे वेधलं गेलं आहे, याची मेरी जेनला जाणीवच नव्हती. तिच्या चेहऱ्यावर असलेले प्रामाणिकपणाचे आणि उत्सुकतेचे भाव पाहून तो जणू तिच्याकडे ओढला गेला.

''काय झालं? तुमच्याकडे योगर्ट नाहीये का?''

आपल्याबरोबर कोण बोलत आहे हे पाहण्यासाठी तिने मान वळवली, तर तिला लांब, काळ्या-कुरळ्या केसांचा एक देखणा तरुण दिसला. तो तिच्याकडे एकटक पाहत होता. त्याच्या चेहऱ्यावर एक मोठ्ठं हसू होतं.

''आहे ना, माझ्या बॅगमध्ये!'' तिने जरासं अडखळत, आपल्या बॅगकडे निर्देश करत म्हटलं. ''पण इथे नक्की काय चाललं आहे हे माझ्या तितकंसं लक्षात आलं नाहीये.''

''तुम्ही आधी कधी इथे आला आहात का?''

''नाही. सहसा मी त्या तिकडच्या कारंजाच्या भागात जाते.''

''खरंय! पाण्याच्या बाजूला उभं राहिलं की, किती शांत वाटतं! विशेषत: तुम्ही म्हणताय त्या भागात. इथे मात्र अजिबात शांतता नाही. आज इकडे यायचं काही खास कारण?''

तिच्या उजव्या बाजूला एक विक्रेता मोठ्या आवाजात विचारत होता, ''कुणाला मासे हवे आहेत का मासे?'' एक विक्रेता एका तरुणीला चिडवत होता. तितक्यात मेरीच्या डोक्यावरून एका खेकड्याने झेप घेतली. 'पाहा खेकड्यांना जाताना, सहा निघाले मॉन्टाना' अशी लकेर आणि त्यापाठोपाठ सर्वांनी ओढलेली री ऐकू आली. तिकडे कॅश रजिस्टरजवळ एक लोकरीची टोपी नाचताना दिसत होती. अर्थात, त्या टोपीमागचा कलाकार त्या नाचाचा सूत्रधार होता म्हणा! खरंच! मेरी जेनच्या चारही बाजूंना प्रचंड धमाल चालू होती. परंतु तरीही सर्वत्र शिस्तीची जाणीव होत होती. तिला एकदम जत्रेची आठवण झाली आणि मग वाटून गेलं की, जत्रेहून अधिक मजा या फिश-मार्केटमध्ये आहे. अर्थात, तिच्या मनात एवढे विचार तरळून गेले, तरी तिथल्या त्या गडबडीचा त्या देखण्या माणसावर अजिबात परिणाम झाला नव्हता. त्याचं चित्त मुळीच विचलित झालं नाही. तो अगदी शांतपणे उभा होता, तिच्या उत्तराची वाट पाहत. 'हे तर नवलच आहे! तो माझ्या उत्तरासाठी खरोखरच थांबला आहे आणि ते जाणून घ्यायची त्याला उत्सुकता आहे असं दिसतंय. पण या अनोळखी माणसाला मी माझ्या ऑफिसच्या समस्या मुळीच सांगणार नाही.' असं तिला वाटून गेलं खरं, परंतु तिने त्याला आपल्या सगळ्या समस्या सांगितल्या.

त्याचं नाव होतं, लोनी. ती जेव्हा त्याला तिच्या त्या 'तिसऱ्या मजल्या'बद्दल सांगत होती, तेव्हा त्याने ते अतिशय शांतपणे ऐकून घेतलं. ती हे सांगत असताना एक मासा त्यांच्या बाजूच्या दोरीवर आपटून त्यांच्या बाजूला येऊन पडला, पण तरीही त्याचं चित्त विचलित झालं नाही. आपल्या तिसऱ्या मजल्यावर काम करणाऱ्या विविध कर्मचाऱ्यांच्या तिला जाणवलेल्या समस्या तिने त्याला सांगितल्या. त्याही त्याने नीट ऐकून घेतल्या. सगळं सांगून झाल्यावर मेरीने त्याच्याकडे पाहिलं आणि त्याला

विचारलं, ‘‘तर मग काय मत आहे तुमचं, माझ्या या ‘विषारी ऊर्जेच्या कचरा डेपो’बद्दल?’’

‘‘नक्कीच कुठेतरी पाणी मुरतंय! मी स्वत:देखील काही भयाण ठिकाणी काम केलेलं आहे. अगदी खरं सांगायचं तर तू उभी आहेस ती जागादेखील पूर्वी विचित्र होती. आत्ता या क्षणी तुला या मार्केटबद्दल काय जाणवतंय?’’

‘‘इथे आवाज, ऊर्जा, उत्साह आणि उत्कटता आहे.’’ क्षणाचाही अवधी न लावता ती उद्‌गारली.

‘‘ही ऊर्जा तुला कशी वाटते?’’

‘‘इथली ऊर्जा मला प्रचंड भावली आहे.’’ ती म्हणाली.

‘‘मलासुद्धा. मला तर आता इतर कुठेही काम करणं शक्यच नाहीये. इथलं हे वातावरण माझ्या रोमारोमांत भिनलं आहे. मी आधी म्हटलं तसं या मार्केटमध्ये पूर्वी असं वातावरण नव्हतं. वर्षानुवर्षं इथेसुद्धा ऊर्जेच्या अस्तित्वाची चाहूलसुद्धा नव्हती. मात्र आम्ही सर्वांनी जाणीवपूर्वक ठरवलं की, यामध्ये बदल करायला पाहिजे आणि तसा तो आम्ही केलादेखील. अशा प्रकारची वातावरणनिर्मिती झाली, तर तुमच्या ऑफिसच्या दृष्टीने फायद्याचं ठरेल का?’’

‘‘मला तरी खात्री वाटते आहे. आमच्या कचरा डेपोचं उच्चाटन करण्याचा हाच मार्ग असावा.’’ उत्तर देताना मेरीच्या चेहऱ्यावर छानसं हसू होतं.

‘‘या फिश-मार्केटला आजचं स्वरूप ज्या काही गोष्टींमुळे प्राप्त झालं आहे, ते सगळं मी तुला सविस्तरपणे सांगेन. कदाचित, त्यातून तुला तुझ्या ऑफिसकरता योग्य अशा कल्पना मिळू शकतील.’’

‘‘अरे, पण आमच्याकडे असं फेकण्यासारखं काहीच नाही! आमच्या कामाचं स्वरूप अतिशय रटाळ आहे. आमच्यापैकी बहुतेक जण...’’

‘‘थांब, थांब! हे सगळं माशांच्या फेकाफेकीमुळे शक्य नाही झालेलं. तुमच्या कामाचं स्वरूप वेगळं तर आहेच, शिवाय तिथे बदल घडवून आणणं हे एक मोठं आव्हानच आहे, हेदेखील माझ्या लक्षात आल्यावाचून राहिलेलं नाही. तरीदेखील तुला मदत करायला मला शंभर टक्के आवडणार आहे. पाइक प्लेस फिश-मार्केटला जगप्रसिद्ध करण्याचा चंग आम्ही बांधला होता. त्या प्रक्रियेमध्ये काही महत्त्वाची सूत्रं म्हण, कल्पना म्हण आमच्या हाती लागल्या.


◆

# फिश फॉर लाइफ

## अनुवाद : डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके

### आयुष्य हे अष्टौप्रहर काम नव्हे


आपण करीत असलेलं काम अधिक नेटकेपणानं व्हावं या भावनेनं जगातील लाखो लोक आज फिशच्या पुस्तकांचा आणि व्हिडिओजचा वापर करीत आहेत. ताण, वाढणारं वजन, आर्थिक समस्या यांसारख्या अनेक अडचणी बहुतांशी कुटुंबांना जाणवत असतात. फिश फिलॉसॉफीचा वापर करून या सर्व अडचणींचं निराकरण करणं शक्य आहे.




'फिश फॉर लाइफ' या पुस्तकातून लोनी आणि मेरी जेनची कथा आपल्यासमोर येते. त्यांची पहिली भेट पाच वर्षांपूर्वी सिॲटलच्या सुप्रसिद्ध पाईक प्लेस फिश मार्केटमध्ये झाली होती. मार्केटमध्ये अनुभवलेली सकारात्मक ऊर्जा मेरी जेनच्या प्रयत्नांमुळे तिच्या ऑफिसच्या उदास वातावरणात रुजली आणि फोफावलीदेखील. लोनी व जेन यांना विवाहानंतर आयुष्यातील ताण दूर करण्याचा प्रयत्न करताना जाणवतं की, जी तत्त्वं वापरून लोनीनं फिश मार्केटमधल्या समस्यांवर मात केली होती, मेरीनं कामाच्या जागेचा कायापालट केला होता; ती तत्त्वं वापरून त्यांचा ताण कमी-कमी होत संपलादेखील.

# फिश स्टिक्स

## अनुवाद : डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके





चांगला बदल घडवून आणण्याच्या अनेक पद्धती आहेत. या बोधकथांच्या आधारे तुम्ही हे बदल आत्मसात तर करू शकालच; पण त्यांचा पाठपुरावादेखील करू शकाल. त्यातून होणारी निष्पत्ती ही उत्तमच असेल. घडवून आणलेला बदल सातत्यानं टिकवून ठेवणं हे तसं जिकिरीचं काम आहे; परंतु त्याहून कठीण आहे, ते एखादा परिणामकारक बदल प्रत्यक्षात उतरवणं. फिश आणि फिश

टेल्स मालिका या प्रचंड खपाच्या जगप्रसिद्ध पुस्तकांचे लेखक आणि व्हिडिओ फिल्म्सचे जनक आता आपल्यासाठी

अजून एक स्वतंत्र, नावीन्यपूर्ण कलाकृती घेऊन आले आहेत. त्यामुळेच बदल घडवणं, टिकवणं हे दोन्ही तुम्हाला अधिक सोपं वाटणार आहे.

## फिश टेल्स / अनुवाद : डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके

फिश या पुस्तकातून तुमच्यासमोर उलगडली होती, एक अद्‌भुत कथा. ठाम निश्चयाला सकारात्मकतेची जोड दिली तर इतिहास घडवता येतो, हे सांगणारी ही गोष्ट होती, एका काल्पनिक कंपनीची. सीॲटलच्या पाइक प्लेस फिश मार्केटमध्ये शिकायला मिळालेले धडे गिरवत-गिरवत या कंपनीने स्वत:मध्ये आमूलाग्र बदल केला. आता फिश कथांद्वारा वाचकांकरता अजून एक मनोवेधक, रंजक अनुभव आम्ही देत आहोत. फिशमध्ये सांगितलेली तत्त्वे वापरून दैनंदिन आयुष्यातील गोडी वाढवणारी मंडळी आपल्या भेटीला येतील. त्यांच्या कामाच्या जागादेखील महत्त्वाच्या आहेत.





सतत निरनिराळ्या व्यक्तींच्या संपर्कात, प्रचंड ताणात काम करणारी ही माणसं; पण त्यांनी ठामपणे प्रवाहाची दिशाच बदलली. फिशचे चारही घटक वापरायला सुरुवात करा, मग बघाच कसा बदल होत जातो ते; तुमचा व्यवसाय कोणताही का असेना! तुमच्या घरीसुद्धा यांचा यशस्वी वापर करता येईल तुम्हाला. आणि समजा, तुम्ही फिश वाचलंच नसेल, तरीही काही बिघडणार नाही, कुठे काही अडणार नाही. फिश फिलॉसॉफी समजून घेणं, त्याची अंमलबजावणी करणं, त्याचे अनोखे परिणाम अनुभवणं तितकंच रंजक ठरेल. फिश फिलॉसॉफीची ओळख या पुस्तकातूनदेखील होईल आणि मग इतर लाखो लोकांप्रमाणेच तुमचं आयुष्यदेखील झळाळून उठेल.

◆

# अभिप्राय






| | | |
|---|---|---|
| **मरी मरी जाय सरीर** | : | **योजना यादव** |
| **पृष्ठसंख्या** | : | **११२** |
| **किंमत** | : | **१४०/-रु.** |

## देहनिष्ठ अनुभवांतून साकारलेल्या कविता

*गुंठाभर जमिनीच्या तुकड्यासाठी असते बाई*
*तिच्याभोवती आखावी सीमा सिद्ध करावी मालकी*

या लक्षणीय ओळी आहेत योजना यादव यांच्या 'मरी मरी जाय सरीर' या पहिल्याच कवितासंग्रहातील. या शतकाच्या आरंभकाळातील स्त्रियांची कविता वेधक स्वरूपाची आहे. 'अस्सं सासर द्वाड बाई कोंडुनी मारते', तसेच 'पंढरीच्या पेठे मांडियेली पाल' ते 'किचनपासून बेडरूमपर्यंत निघते बाईची अंत्ययात्रा' अशी स्त्रीविशिष्ट अनुभवरूपे वेगवेगळ्या काळातील कवयित्रींनी व्यक्त केली आहेत. या पार्श्वभूमीवर समकाळातील स्त्री कवितेला नवा स्वर प्राप्त झाला आहे, तो आत्मसन्मानाचा आहे. या कवितेने पारंपरिक व्यवस्थेचा निषेध करून पुरुषी राजकारण उघडे केले. ते तिला भवतालाकडे पाहण्याची नवी नजर प्राप्त झाल्यामुळे.

योजना यादव यांच्या कवितेस या नव्या दृष्टीचा मोठा प्लक आहे. देहनिष्ठ अनुभवातून बघण्याची नजर त्यांच्या कवितेत केंद्रीय स्वरूपात आहे. किंबहुना देहनिष्ठ भाषा हीच या कवितेची आविष्कारभूमी आहे. बाईपण घडविण्यात परंपरा आणि संस्कृतीचा हातभार असतो. या घडण्या-घडविण्यातील खोलवरची वेदना यादव यांच्या कवितेत आहे. शरीर ओढीची उत्कटता, ऊर्जा आणि त्यामधून आलेला दुरावा, अंतराय आणि देहपरात्मभाव त्यामध्ये आहे. संस्कृतिरचितातील  ही युगानुयुगीची दुखरी ठणक या कवितारूपातून निरंतर झरली आहे. देहाचे बहद रूपक या कवितेत केंद्रीय स्वरूपात आहे. देहरूपाशी संबंधित अनेक भावछटा या कवितेत आहेत. 'देहाची चाळण करून, बाहेर येतात शब्द, बोली शब्दांना लागते की देहाला' या केंद्रीय सूत्राने जीवनानुभवाकडे पाहिले आहे. क्रमशः बाईच्या शरीर संवेदनेतून झरणाऱ्या मरणानुभवाची रूपे या कवितेतून प्रकटली आहेत.

'शरीरात रुतून बसलीयत, माणसं दाटीवाटीनं' असे सांगत 'आई मात्र उभीच आहे शरीरात नखशिखान्त' असे बाईचे युगानुयुगाचे 'पर'केपण साकारले आहे. पुरुष हा या नात्यातला अपरिहार्य संदर्भबिंदू आहे. या पुरुषाबद्दलचा प्रदीर्घ संवाद या कवितेत आहे. हा कधी आधाराचा, तर बव्हंशी वेळा विसंवादाचा आहे. त्यामुळे पुरुष प्रतिमानाची निरंतर पाठलाग रूपे या कवितेत आहेत. एका अर्थाने ही पुरुषरूपाची

तृष्णारूपे होत. ‘आयुष्यातला हर पुरुष त्या राखेत बुडवून काढला; पण बापाला चढवता आला नाही देवदूताचा सदरा’ असा पितृपरंपरेचा पुनर्शोध आहे. तसेच बाईच्या एकांतानुभवाने या जगास नव्या मिती प्राप्त झाल्या आहेत. हे एकटेपण गर्दी, स्वानुभव व नात्यातील अनुभवामुळे आलेले आहे. सामाजिक व्यवस्थेविरुद्धची प्रतिकाराची जाणीव आणि स्त्रीमनातील स्वातंत्र्याची अविरत आकांक्षास्वप्ने तीमधून प्रकटली आहेत. ‘समाजाची चाड टांगावी वेशीला, भटकावं सीमेपार’ ही स्वातंत्र्याची आकांक्षा त्यामध्ये आहे. देहानुभवातील उत्कटतेमुळे ‘ती’ भरवसा शोधते. शरीराचे सारे ऐवज ती देते-घेते. त्यामुळे तिला कळू लागते. ‘झिजलंय माझं सारं अंग तुझ्या संगानं की संगाशिवाय’ या जाणिवेमुळे या दुखऱ्या शरीराची निरोपाची भाषा तीमध्ये आहे. पुढे हा पुरुषशोध विरोधाभावात रूपांतरित होतो. ‘तिच्यात बसवण्याजोगा पुरुष हयात नसल्याची’ तसेच ‘आय एम हिअर, बट मे नॉट बी अव्हेलेबल’ या अस्तित्व जाणिवेने ती उजळते. लौकिकातील आणि मिथक रूपातील अनेक स्त्रीरूपे या कवितेत आहेत. सीता, सीमोन द बोवा ते रेखा या तिच्या संगिणी होत. रेखावरील कवितेच्या काही ओळी आहेत. ‘तुझा चेहरा तुझा नाहीए आता, जीर्ण पानगळ आहे ती, कधीकाळीच्या बहराची.’ तसेच या कवितेत उत्खननाचे रूपक वारंवार आले आहे. एका अर्थाने हे उत्खनन समाजरचनेचे आहे, पुरुष संस्कृतीचे आहे.

**—प्रा. रणधीर शिंदे**
**दैनिक लोकमत, १४.६.२०१८**

◆

> एक चांगले पुस्तक शंभर चांगल्या मित्रांच्या बरोबरीचे असते आणि एक चांगला मित्र एका ग्रंथालयाच्या बरोबरीचा असतो.
>
> – डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम

प्रणयाच्या पन्नास छटा...
तीन पुस्तकांच्या मालिकेत..
जगभर खळबळ माजवणाऱ्या

E.L.James च्या

# Erotica.

या तिन्ही कथानकांवर चित्रपट प्रदर्शित










## फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे

## फिफ्टी शेड्स डार्कर

## फिफ्टी शेड्स फ्रीड

अनुवाद :
शोभना शिकनीस


अनुवाद :
डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके

पृष्ठसंख्या : ५४८ पृष्ठसंख्या : ५५२ पृष्ठसंख्या : ६२८

किंमत प्रत्येकी ₹७००/- व पोस्टेज प्रत्येकी ५०/-

# अभिप्राय






**स्पर्शकमळे** : डॉ. आनंद यादव

**पृष्ठसंख्या** : १७६

**किंमत** : १५०/-रु.

**शृंगार, स्त्री सौंदर्यातले बारकावे यांचं लोभस वर्णन**

डॉ. आनंद यादवांचं ‘स्पर्शकमळे’ पहिल्यांदा वाचलं त्याला ४० वर्षे होऊन गेली. त्यातले ललित लेख वाचून अंगावर सुखद रोमांच उठले. शरीरातून सुखाची लहर दौडत गेली. लेखकानं आपल्याच मनातलं त्याच्या लेखणीतून उतरवलंय असं वाटलं. त्या वयात मनामध्ये नाजूक भावभावनांचे तरंग उठणं स्वाभाविकच होतं; पण त्यानंतरही जवळजवळ प्रत्येक वर्षी मी ते आवर्जून वाचतो. गेल्या ४० वर्षांत किमान ३५-४०वेळा मी ते वाचलं असेल. वयाच्या तिशीपासून आज सत्तरीतही ते वाचताना तितकाच आनंद त्या लेखांनी मला दिला आहे. माझ्या अत्यंत आवडीच्या १५-२० पुस्तकांत त्याचा समावेश आहे आणि किमान ३०-४०जणांना आजवर मी ते भेटही दिलंय.

पुस्तक अनेकदा मनापासून वाचल्यावर लेखकाला भेटायची तीव्र इच्छा झाली. डॉ. यादवांची फोनवर वेळ घेऊन मी त्यांना पुण्यातल्या कलानगरमधल्या ‘भूमी’ बंगल्यात भेटलो. त्यांच्याशी खूप गप्पा झाल्या. घरी तेव्हा दुसरं कोणी नसल्यानं त्यांनी प्रेमानं आणि आग्रहानं करून दिलेल्या चहाची लज्जत अनुभवायला मिळाली. ‘स्पर्शकमळे’चा विषय निघाला. त्यांनी प्रांजळपणे सांगितलं, की त्या वयात ते ललित लेख ‘लिहिले गेले. आता प्रयत्न केला तरी तसं लिखाण होणार नाही. ही सुमारे २० वर्षांपूर्वीची गोष्ट आहे.

शृंगार, स्त्री सौंदर्यातले बारकावे यांचं लोभस वर्णन डॉ. यादवांनी या ललित लेखांतून केलं आहे. विविध वस्त्रप्रावरणांत अवगुंठित झालेल्या धीट, तरीही मर्यादशील स्त्रीचं वर्णन त्यांनी खूप लोभसपणे केलंय. स्त्रीकडे भोगवस्तू म्हणून न पाहता तिच्या आवाहनात्मक सौंदर्याचा आस्वाद कसा घ्यावा हे लेखकाने अचूक सांगितलं आहे. नऊवारी साडीचं सौंदर्य नेमकं कुठं असतं हे मर्यादाभंग न करता ते सांगतात. तिळगूळ देताना आवडत्या स्त्रीच्या आपल्या तळव्यावर टेकलेल्या पाच नाजूक बोटांनी अंगभर उठलेल्या झिणझिण्या आणि त्याची आयुष्यभर जपून ठेवलेली आठवण याची वाचकांना हुरहूर लागून राहते. दीर आणि वैनी यांच्यातले भावबंध ही एक खास अनुभवायचीच गोष्ट आहे, हे ते वाचकाला पटवून देतात. गाठीची चोळी ल्यायलेल्या स्त्रीची मादकता आपल्याला वेगळ्याच जगात घेऊन जाते.

स्त्रीदेह आणि स्त्रीसौंदर्य ही ओरबाडून घेण्याची गोष्ट नाही, तर अत्यंत रसिकपणे त्यांचा आस्वाद घेऊन मनाला आणि देहाला तृप्त करायचं असतं. समाजातल्या नीतिकल्पना आणि त्या मोडून निसर्गाचा होणारा विजय ह्यांचं अप्रतिम

वर्णन यादवांनी एका लेखात केलंय. 'चुंबनबन' हा लेख या पुस्तकातला सर्वोत्तम ठरावा. लेखकानं आपल्या आवडत्या स्त्रीच्या मुलाच्या गालाचं घेतलेलं चुंबन आणि त्याचंच तिनं घेतलेलं चुंबन ह्यातली खुमारी जरी आपल्याला माहीत असली तरी त्यातला प्रणय हा यादवांनीच वर्णन करावा. खजुराहोची कामशिल्पे न्याहाळताना पाशवी, उत्तान लैंगिकता आणि तिचे उघडेवाघडे प्रदर्शन बाजूला पडते आणि नर्म शृंगारातून मिळणारा कामपूर्तीचा आनंद कल्पनेतच आपल्याला आनंद देतो. या कामशिल्पांचे इतके संयत वर्णन खचितच कुणी केले असेल. अतिभोग आणि अतित्याग या दोन्ही विकृती असून, निर्भेळ आनंदाची प्राप्ती ही खरी संस्कृती आहे, हे लेखक छान शब्दांत पटवून देतात.

शृंगारिक वाङ्मय हा सर्वांच्याच आवडीचा विषय असतो. विकाराच्या अधीन होऊन स्त्रीदेहाचे किंवा स्त्री/पुरुष संबंधांचे उघडेवाघडे व वासना जागृत करणारे लेखन अनेक लेखक करतात. भोगलालसा ही महत्त्वाची मानून त्यातून अश्लील वाङ्मयाला जन्म दिला जातो; पण विकारांपलीकडे स्त्री आणि स्त्रीदेह यांना एक नितांत सुंदर अस्तित्व आहे आणि त्याचा आस्वाद सौंदर्यपूर्णतेने घेता येतो, ही लेखकाची धारणा आहे. म्हणूनच कामुक पुस्तकांच्या गर्दीत या पुस्तकाचं वेगळेपण जाणवत राहतं. लेखक प्रस्तावनेत म्हणतात, 'गुलाबाच्या फुलाच्या पाकळ्या काढून त्या कुस्करून गुलकंद करून खाणे म्हणजे भोग. त्याच इच्छेने गुलाबपुष्पाकडे पाहणे म्हणजे भोगलालसा. गुलाबाला ते नाजूक, सुंदर फूल आहे या जाणिवेने स्पर्श करणे, त्याचा खोलवर सुगंध घेणे म्हणजे आस्वाद घेणे होय.' भोग आणि आस्वाद यावर इतकं नेमकं कुणी लिहिलेलं वाचनात नाही.


डॉ. यादवांनी आयुष्यभरात कितीतरी पुस्तकं लिहिली. त्यातून त्यांच्या प्रांजळपणाचा अनुभव येतो; पण त्यांचं 'स्पर्शकमळे' हे पुस्तक मला मास्टरपीस वाटतं. म्हणूनच या पुस्तकाला वाचकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. या पुस्तकाच्या आतापर्यंत सहा आवृत्त्या प्रकाशित झाल्या आहेत. चाळीस वर्षांनंतरही ताजेपणा टिकवून राहिलेल्या या कलाकृतीचा आस्वाद ज्या वाचकांनी अजून घेतला नसेल त्यांनी तो अवश्य घ्यावा आणि ज्यांनी घेतला असेल त्यांनी पुन:प्रत्ययाचा आनंद घ्यावा. उत्कटता हरवून बसलेल्या या जगात काळजाला भिडणारं, अंतर्मनाला स्पर्श करणारं वाङ्मय कसं असतं ते हे ललित लेख वाचून समजतं.

**– गिरीश शहा**, ९८६०५६३१००

◆

२री आवृत्ती

# ललितकलेच्या सहवासात




**पु. श्री. काळे**

**किंमत : २५०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

नाट्य- चित्रकलेच्या प्रांतात यश आणि प्रसिद्धीच्या शिखरावर असलेल्या अनेक व्यक्ती 'पुश्रीं'च्या सहवासात आल्या. त्यात केशवराव भोसले ('ललितकलादर्श'चे मालक), बापूराव कोल्हटकर ('ललितकलादर्श'चे उत्तराधिकारी), सवाई गंधर्व (रामभाऊ कुंदगोळकर), नारायणराव राजहंस (बालगंधर्व), मामा वरेरकर (लेखक), बाबूराव पेंटर (चित्रकार), गोविंदराव टेंबे (पेटीवादक), बशीरखाँ (गायक), गोपाळराव गो. फाटक, बाबूराव देवभक्त. अशा कलेच्या प्रांतात विहरत असलेल्या दिग्गजांचे व्यक्तिचित्रच 'पुश्रीं'नी नेमक्या आणि मोजक्या शब्दांत व्यक्त केले आहे. या व्यक्तिचित्रणात त्या त्या व्यक्तीचे गुण दिलखुलासपणे वर्णिले आहेत, तसेच दोषही लपविले नाहीत; तेही परखडपणे स्पष्ट केले आहेत. या सर्व महान व्यक्तींच्या आवर्जून जपलेल्या आठवणी, किस्से थक्क करणारे आहेत...

**नवे कोरे**

# थिंक युवरसेल्फ गॉर्जियस





लेखक
**अनिता नायक**
अनुवाद
**मंजुषा मुळे**

**किंमत : २४०/-रु.**
**पोस्टेज : ५०/-रु.**

'थिंक युवरसेल्फ गॉर्जियस' या पुस्तकात अनुभवी स्तंभलेखिका अनिता नायक यांनी अतिशय प्रामाणिक, व्यावहारिक आणि खात्रीलायक असे मार्गदर्शन केले आहे, ज्याची तुम्हाला तुमची वयात येण्याची वर्षे अगदी सहजपणे पार करण्यास नक्कीच मदत होईल. त्यांनी असे दाखवून दिले आहे की, खालावलेली स्वप्रतिमा आणि वाईट शरीरप्रतिमा असणे, हे प्रत्येकाच्याच बाबतीत घडत असते; मग ती व्यक्ती समाजात कशीही वागत असली (अगदी सुप्रसिद्ध मुलींचाही यात समावेश आहे.) तरीही आणि स्वतःच्या सर्व दोषांसह प्रेम करणे शिकण्यासाठी काय काय आणि का करावे लागते, हेही त्यांनी सांगितले आहे.

सौंदर्य, बारीकसारीक ताणतणाव, आत्मविश्वास, स्वप्रतिमा, शरीरप्रतिमा, वयात येणे आणि भावभावना या सर्वच गोष्टी अंतर्भूत असणारे 'थिंक युवरसेल्फ गॉर्जियस' हे पुस्तक म्हणजे, तुम्हाला स्वतःबद्दलच कमीपणा का वाटतो, कंटाळल्यासारखे वाटणे कसे नैसर्गिक आहे, तुमच्या दिसण्यापासून तुमच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल आणि तुमच्या शरीराबद्दल प्रत्येक गोष्टीत तुम्हाला असुरक्षित का वाटते, हे सर्व समजून घेण्यासाठी तुम्हाला मदत करणारे आहे. तुम्हाला तुमच्या शरीराबद्दल विश्वास वाटावा यासाठीचा सल्ला, अर्थपूर्ण माहिती आणि प्रत्यक्षात आणता येतील असे मार्गदर्शक मुद्दे या सर्व गोष्टींनी परिपूर्ण असे हे पुस्तक, तुमचा आत्मविश्वास डळमळीत करणाऱ्या सगळ्या फसव्या गोष्टी तुमच्या लक्षात आणून देण्यास मदत करेल आणि तुम्हाला अंतर्बाह्य सुंदर वाटावे यासाठीही मदत करेल.













**'आजच्या नियतकालिकांची वाटचाल'** या परिसंवादाचा अध्यक्षीय समारोप करताना भानू काळे. व्यासपीठावर (डावीकडून) डॉ. कीर्ती मुळीक, डॉ. सुधाकर शेलार, डॉ. नानासाहेब सूर्यवंशी, डॉ. रवींद्र शोभणे, जयराम देसाई, बाळासाहेब घोंगडे आणि डॉ. शैलेश त्रिभुवन. ग्रामीण साहित्य चळवळीचे प्रवर्तक डॉ. आनंद यादव यांच्या द्वितीय स्मृतिदिनानिमित्त 'आजच्या नियतकालिकांची वाटचाल' या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादाच्या अध्यक्षपदी 'अंतर्नाद'चे संपादक भानू काळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ कादंबरीकार डॉ. रवींद्र शोभणे उपस्थित होते. मसापचे अध्यक्ष प्रा. मिलिंद जोशीही उपस्थित होते. या परिसंवादात 'अक्षरवाङ्मय'चे डॉ. नानासाहेब सूर्यवंशी, 'साहित्य शिवार'चे जयराम देसाई, 'अक्षरपेरणी'चे बाळासाहेब घोंगडे, 'सक्षम समीक्षा'चे डॉ. शैलेश त्रिभुवन यांनी सहभाग घेतला. या प्रसंगी मेहता पब्लिशिंग हाऊसचे अनिल मेहता उपस्थित होते. पुढच्या वर्षीपासून ग्रामीण कादंबरी आणि ग्रामीण कथासंग्रहासाठी प्रत्येकी पाच हजार रुपयांचे पारितोषिक मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे देण्यात येईल, असे मेहता यांनी यावेळी जाहीर केले. या कार्यक्रमाचे संयोजन जयराम देसाई, डॉ. कीर्ती मुळीक, डॉ. सुधाकर शेलार यांनी केले.












Postal Reg. No. PCW/086/2018 – 2020
RNI. No. MAHMAR/2000/02739
No. SDO/Pune City/SR/3/2018 - Date : 10/01/2018
Posting at Marketyard, PSO, Pune 411037.
Publication Date : 09/12/2018 Posting Date : 11/12/2018

## आवर्जून वाचावे
















**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,